# लोकराज्य

ऑगस्ट २०१३ । किंमत ₹१०

## वेध विकासाचा




RABHA



# शबरी आदिवासी घरकूल

आदिवासींना कायमस्वरूपी हक्काच घर मिळावे यासाठी शबरी आदिवासी घरकूल योजना राबवण्यात येणार आहे. ज्या अनुसूचित जमातीच्या लोकांना राहण्यासाठी स्वत:ची घरे नाहीत अथवा जे आदिवासी कुडा-मातीच्या घरात, झोपड्यांमध्ये किंवा तात्पुरत्या तयार केलेल्या निवाऱ्यात राहतात अशांना ७०,००० रुपये पर्यंतच्या किंमतीचे २६९ चौ.फू. चटई क्षेत्र असलेले, स्नानगृह व शौचालयाच्या सोयीसह पक्की घरकुले या योजनेंतर्गत उपलब्ध करून देण्यात येतील.

या योजनेसाठी २०१२-१३ या वर्षासाठी ५०० कोटी रुपये इतका नियतव्यय राखून ठेवण्यात आला आहे. ही योजना वैयक्तिक लाभाची असल्याने आदिवासीबाहय क्षेत्रातील जिल्ह्यातील पात्र अनुसूचित जमातीच्या लोकांना निवारा उपलब्ध होईल.




सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या रमाई घरकूल योजनेप्रमाणे शबरी घरकूल योजनेची अंमलबजावणी शक्यतो एक गांव, एक नगरपालिका, महानगरपालिका क्षेत्रात एकाच वेळी संबंधित यंत्रणा आणि संस्थेमार्फत करण्यात येईल.

लाभार्थ्यांची पात्रता : राज्यात १५ वर्ष वास्तव्य असणारा आदिवासी, स्वत:ची किंवा शासनाने दिलेली जमीन दिलेली असलेला तसेच स्वत:चे किंवा कुटुंबीयाचे पक्के घर नसलेला लाभार्थी या योजनेंतर्गत पात्र असेल. विधवा, परित्यक्ता, निराधार व दुर्गम भागातील लाभार्थ्यांना प्राधान्य देण्यात येईल.

वार्षिक उत्पन्न मर्यादा : ग्रामीण क्षेत्रासाठी १.०० लाख, नगरपरिषद क्षेत्रासाठी- १.५० लाख, महानगरपालिका क्षेत्रासाठी- २ लाख आणि मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रासाठी- २ लाख रुपये. १ जानेवारी १९९५ या दिनांकास राज्य शासन, महानगरपालिका, नगरपालिका, स्थानिक स्वराज्य संस्था, एम.एम.आर.डी. ए., त्यांच्या जमिनीवर अतिक्रमण करून घरकूल, निवासस्थान बांधून राहत असलेल्यांना आणि त्यांना संरक्षित झोपडीदार म्हणून संरक्षण प्राप्त असल्यास अशा लाभार्थींना या योजनेचा लाभ मिळेल.

म्हाडा, एस.आर.ए. या गृहनिर्माण योजनांतर्गत बांधलेली घरे, मुख्यमंत्र्यांच्या स्वेच्छा निर्णयानुसार वितरित झालेल्या सदनिका इत्यादी योजनेचा लाभ न घेतलेले आदिवासी या योजनेसाठी पात्र असतील.,

सादर करावयाची कागदपत्रे : ७/१२ चा उतारा, मालमत्ता नोंदपत्र (प्रॉपर्टी रजिस्टर्ड कार्ड) ग्रामपंचायतीतील मालमत्ता नोंदवहीतील उतारा यापैकी एक, घरपट्टी, पाणीपट्टी, विद्युत बील या कागदपत्रांपैकी एक, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला. १ जानेवारी १९९५ च्या किंवा मतदार यादीतील नावाचा उतारा, निवडणूक मतदार ओळखपत्र, रेशनकार्ड, सरपंच, तलाठ्याचा दाखला, महानगरपालिका, नगरपालिकेतील मालमत्ता कर भरल्याच्या पावतीची प्रत

बांधकाम खर्चाची कमाल मर्यादा: ग्रामीण क्षेत्रासाठी ७० हजार रुपये, नगरपालिका क्षेत्रात १ लाख ५० हजार रुपये, महानगरपालिका क्षेत्रातील आणि मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रात २ लाख रुपये घराच्या बांधकामाच्या खर्चाची कमाल मर्यादा आहे.

शासनाने ठरवून दिलेल्या क्षेत्राच्या बांधकामासाठी अनुदान दिले जाईल. तथापि लाभार्थीच्या स्वत:च्या मालकीची जागा असेल तर त्यावर त्याच्या मर्जीनुसार अनुदान वापरून त्यावर जास्त बांधकाम स्वखर्चाने करू शकेल.

प्राधान्यक्रम : जातीय दंगलीमध्ये आग व इतर तोडफोडीमुळे घरांचे नुकसान झालेली व्यक्ती, ॲट्रॉसिटी ॲक्ट नुसार पीडित झालेल्या अनुसूचित जमातीच्या पात्र व्यक्ती, पूरग्रस्त क्षेत्र, घरात कोणीही कमवत नाही अशा विधवा महिला यांना घरे बांधताना प्राधान्य दिले जाईल त्यानंतर उर्वरित सर्व क्षेत्र.

लाभार्थ्यांचा हिस्सा : घराच्या बांधकामाच्या खर्चामध्ये नगर पालिका क्षेत्रात ७.५ टक्के तर महानगर पालिका क्षेत्रात १० टक्के लाभार्थ्यांचा हिस्सा आहे.

लॉटरी पध्दतीने लाभार्थ्यांची निवड

– मुक्ता पवार

वर्ष ६५ वे | अंक ५ | ऑगस्ट २०१३

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — प्रमोद त्र्यं. नलावडे
- व्यवस्थापकीय संपादक — प्रल्हाद जाधव
- संपादक — सुरेश वांदिले
- सहसंपादक — किरण केंद्रे
- प्रशासन व वितरण अधिकारी — दिगंबर पालवे
- वितरण अधिकारी — विलास बोडके
- साहाय्य — विद्या कदम
- मुखपृष्ठ — राभा
- मांडणी, सजावट — संदीप पवार
- मुद्रण — एच.टी. मीडिया लि. दिघे, नवी मुंबई

संपादकीय पत्ता
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक, दालन क्र. ३३, तळ मजला, मंत्रालय, मुंबई-३२.
संपादकीय संपर्क : ०२२-२२६२२२१६
email : lokrajya2011@gmail.com
lokrajya@dgipr.maharashtra.gov.in

ई-लोकराज्यसाठी
Website : http://dgipr.maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारणासाठी संपर्क - ०२२-२२०२१५३०
वितरण संपर्क - ०२२-२२६१६९७६

e-mail : lokvitaran@dgipr.maharashtra.gov.in
lokrajyavitaran@gmail.com

# अंतरंग



## प्रगतीच्या दिशेने वाटचाल

आदिवासी विकासाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे. त्यासाठी पुरेसा निधीही दिला जात आहे. महाराष्ट्रातील आदिवासींच्या विकासाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

- मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण ६



## भरीव तरतूद : चौफेर विकास

आदिवासी संस्कृतीला कुठेही ठेच न पोचवता त्यांना मुख्य प्रवाहात आणणे किंबहुना त्यांच्यापर्यंत मुख्य प्रवाह नेणे आपले कर्तव्य आहे. राज्य सरकारने आदिवासी बांधवांना सन्मान मिळवून देण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत.

- उपमुख्यमंत्री अजित पवार ७

## आदिवासी विकासाच्या दिशा आणि वाटा



अनुसूचित जमातींचा विकास करण्याकरिता आदिवासी विकास विभागामार्फत शिक्षण, उच्च शिक्षण, प्रशिक्षण, शिष्यवृत्ती, रोजगार/स्वयंरोजगार, वस्ती सुधार, शेतीपूरक उपक्रम अशा वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या अनेकविध योजना राबवल्या जातात. आदिवासी उपयोजना क्षेत्रात इतर विभागाच्या माध्यमातून योजना राबवल्या जातात. या सर्व योजनांद्वारे आदिवासी उपयोजना क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी व्यक्ती व या क्षेत्राचा विकास करण्यात येतो. १२


| | | |
|---|---|---|
| विकासाकडे भरारी | संपादकीय | ५ |
| सर्वंकष विकासासाठी प्रयत्नशील | मधुकर पिचड | ८ |
| जीवनमान उंचावण्यावर भर | राजेंद्र गावित | १० |
| आदिवासी जननायक | प्रा. वसंत पुरके | ११ |
| जागतिक आदिवासी दिवस | जेलसिंग पावरा | २४ |
| पारंपरिक वनाधिकार | रणजितसिंह राजपूत | २५ |
| आदिवासी लोकगिते : संवेदनशील आणि नादमय | डॉ. शैलजा देवगांवकर | २७ |
| खडतर प्रवास (डॉ. प्रकाश आमटे) | रवि गिते | २९ |
| भिल्ल समाजातील पहिले सनदी अधिकारी | दिनेश चौरे | ३१ |
| लोकशाहीच्या इतिहासातील नवा अध्याय | डॉ.कांतिलाल टाटिया | ३२ |
| जात प्रमाणपत्र पडताळणीचे महत्त्व | शुक्राचार्य गो. दुधाळ | ३५ |
| डोंगर-दऱ्यांतील शैक्षणिक क्रांती | डॉ. लता सुभाष मोरे | ३७ |
| आदिवासी साहित्य : वैश्विक साहित्याचा मूलाधार | प्रा. डॉ. माहेश्वरी गावित | ३९ |
| कोलाम आणि माडिया गोंड | डॉ. श. गो. देवगांवकर | ४१ |
| आम्ही कोरकू | यादव तरटे | ४३ |
| किनवटची आदिम संस्कृती | प्रा. अंकुश सुरवसे | ४७ |
| मेळघाटची स्वामिनी | उषा भालेराव | ४८ |
| जत्र्याबाबा आणि कृषिक्रांती | रमाकांत पाटील | ४९ |
| इगतपुरीचे कारले लंडनला | रवींद्र ठाकूर | ५० |
| भाऊसाहेब वर्तक : निष्काम कर्मयोगी | प्रभाकर पाणसरे | ५१ |
| सातत्यपूर्ण प्रयत्न | अर्चना शंभरकर | ५२ |
| वनवैभव आणि समृद्ध परंपरा | मारोती हरिश्चंद्र मेश्राम | ५३ |
| महाराष्ट्र : भूमि व लोक | चारुशीला बा. चंदनशिवे | ५५ |




## सप्रेम नमस्कार

**सर्वसमावेशक व माहितीपूर्ण**




उच्च शिक्षणाला समर्पित 'लोकराज्य' जून २०१३चा उच्च व तंत्रशिक्षण हा अंक सर्वांगसुंदर झाला आहे. विविध अभ्यासक्रमांची व्यवस्थित व तपशीलवार माहिती एकत्रित असल्याने विद्यार्थ्यांना त्याचा खूप फायदा होईल. या अगोदरही 'वनवृद्धी' व 'दुष्काळाचे आव्हान पेलताना' हे अंक लोकराज्यच्या लौकिकात भर घालणारे आहेत. लोकराज्यने जास्तीत जास्त लोकाभिमुख व्हावे हीच अपेक्षा आहे.

**– सुरेश केतकर,**
चिपळूण, जि. रत्नागिरी

**अनमोल संदर्भ**

लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम म्हणजे लोकराज्य असे म्हटल्यास वावगे ठरू नये. लोकराज्याचा मी नियमित वाचक आहे. नियमित अंकासोबत विशेषांक देऊन आपण महाराष्ट्राची महती महान करीत आहात. प्रत्येक क्षेत्राची खोलवर माहिती आकडेवारीसह फक्त लोकराज्यच देऊ शकतो. सामाजिक प्रबोधन असो, शैक्षणिक मार्गदर्शन, महाराष्ट्राला महान करणाऱ्या सत्पुरुषांचे चरित्र असो किंवा पर्यटन स्थळांचे वर्णन ह्यासह अनेक विविध विषयांवर निघालेले अंक हे केवळ संग्रहासाठीच नसून संदर्भासाठीसुद्धा अनमोल आहेत. जूनचा उच्च व तंत्र शिक्षणावरील विशेषांक तर तरुणांना करिअरमध्ये उंच भरारी मारण्यासाठी दिशा देणारा मार्गदर्शकच आहे. हुशार आणि होतकरू विद्यार्थ्यांनी हा अंक चोखंदळपणे आत्मसात केल्यास निश्चितच त्यांना दिशा मिळेल यात शंका नाही. लोकराज्य या मासिकाला आकर्षक व दर्जेदार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात राजाश्रय असला तरी अंक लोकाभिमुख काढणे हीसुद्धा प्रवृत्ती प्रशासनामध्ये असणे जरुरीचे असते. चकचकीत पाने व रंगछटा जितकी महत्त्वाची तेवढेच किंबहुना त्यापेक्षा जास्त महत्त्वाचे त्यातील लिखाण, विचार व माहिती असते. ती माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडे पुरेपूर आहे.

**– प्रा.भागवतराव गुरव,** जेलरोड, नाशिक रोड

**प्रत्येक अंक महत्त्वपूर्ण**

मी लोकराज्य मासिकाचा नियमित वाचक आहे. आपला प्रत्येक अंक अत्यंत महत्त्वपूर्ण व उपयोगी असतो. आपले मासिक अत्यंत दर्जेदार आहे. विशेषत: आपण मे २०१२ ला प्रसिद्ध केलेला 'टंचाईवर मात' हा विशेषांक अत्यंत महत्त्वाचा होता. त्याचबरोबर मे २०१३ ला प्रसिद्ध केलेला 'दुष्काळाचे आव्हान पेलताना' हा विशेषांक पाणी टंचाई व त्यावरील उपाययोजनांबद्दल सखोल चर्चा करणारा असल्यामुळे आम्हा वाचकांना मौलिक मार्गदर्शन मिळाले.




**– कैलास रघुनाथ पवार**
औरंगाबाद

**ज्ञानकक्षा रुंदावतात**

लोकराज्य हे महाराष्ट्रातील ११ कोटी जनतेसाठी हक्काचे व्यासपीठ आहे. या अंकाच्या माध्यमातून लोकांना माहिती मिळतानाच त्यांच्या ज्ञानकक्षा रुंदावण्याचे कामही होत आहे. महाराष्ट्राने देशाला भरभरुन दिले आहे. महाराष्ट्राचे शासन-प्रशासन जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर राहिले आहे. महाराष्ट्राची विकासाच्या वाटेवरची ही वाटचाल लोकांपर्यंत पोहचविण्याचे मौलिक काम आपण लोकराज्यद्वारे करीत आहात. या विकासात लोकराज्यची भूमिका महत्त्वाची आहे. लोकराज्यशी आमचे नाते सदैव घट्ट राहील.

**– प्रा.हेमंत तिमाडे,** हिंगणघाट, जि. वर्धा

**वास्तव चित्र**

लोकराज्यच्या दुष्काळविषयक अंकातून दिसून आलेले चित्र खूप आशादायी आहे. राज्यात दुष्काळाशी मुकाबला करताना किती मोठ्या प्रमाणात प्रयत्न सुरु आहेत याची जाणीव या निमित्ताने झाली. शासन जीव ओतून पाण्याची समस्या सोडविताना दिसत आहे. दुष्काळाचे वास्तव लोकांसमोर सचित्र मांडल्याबद्दल आपले आभार.

**– सौ.एम.बी. वाणी,** यावल, जि.जळगाव

'लोकराज्य'मधील लेखांचे पुनर्मुद्रण केल्यास आम्हाला आनंदच होईल...

**वार्षिक वर्गणी – वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, बॅरेक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई-४०००२१ या पत्त्यावर मनीऑर्डरने पाठवावी किंवा 'लेखाधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई' यांच्या नावे मुंबई येथे वटणाऱ्या शाखेचा डिमांड ड्राफ्ट पाठवावा. लोकराज्य अंकाच्या वर्गणीदारांनी नूतनीकरणासाठी वार्षिक वर्गणी पाठवताना आपला वर्गणी क्रमांक कळवावा. (प्रति अंक मूल्य १० रुपये, वार्षिक वर्गणी रु. १००/-)**

लोकराज्यची वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी
http://dgipr.maharashtra.gov.in

*या अंकात व्यक्त केलेल्या मतांशी शासन सहमत असेलच असे नाही.

# विकासाकडे भरारी



समस्त भारतीयांसाठी ऑगस्ट महिन्याचे महत्त्व आणि माहात्म्य हे आगळेवेगळे आहे. ऑगस्ट महिन्यात चलेजाव आंदोलनाची क्रांतिज्योत पेटली आणि याच महिन्यात ब्रिटिश सत्तेच्या जोखडातून भारत मुक्त झाला. ९ ऑगस्टचा क्रांतिदिन आणि १५ ऑगस्टचा स्वातंत्र्य दिन हे आपल्यासाठी सदैव प्रेरणादायी ठरणारे राष्ट्रीय सणाचे दिवस ठरले आहेत. भारतीय असंतोषाचे जनक ठरलेले लोकमान्य टिळक यांचे देहावसान १ ऑगस्टला झाले. तसेच साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांची जयंतीदेखील १ तारखेलाच येते. त्यांनी केलेल्या उत्तुंग कार्याचे स्मरण करून देशाला अधिक बलशाली आणि समृद्ध बनविण्याचा दृढसंकल्प करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

असा क्रांतीचा टिळा भाळी लावून आलेल्या ऑगस्ट महिन्यात ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन साजरा व्हावा, हा योगायोग असला तरी त्यास क्रांतिदिनाची पार्श्वभूमी लाभावी, ही बाब वैशिष्ट्यपूर्ण अशी ठरते. या दिनाचे औचित्य साधून लोकराज्यचा ऑगस्ट महिन्याचा अंक आदिवासी विकास विशेषांक म्हणून प्रकाशित करण्यात येत आहे.

ज्यांचा आदिवासी म्हणून उल्लेख केला जातो त्या जमाती महाराष्ट्र आणि भारताच्या मूळ निवासी असल्याचे आता विविध संशोधनांती सिद्ध झाले आहे. महाराष्ट्रापुरते बोलायचे झाल्यास राज्यातील ३ लाख ७ हजार ७१३ चौ.कि.मी. क्षेत्रफळापैकी ५० हजार ७५७ चौ.कि.मी. क्षेत्र हे आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण १६.५ टक्के आहे. २००१ च्या लोकसंख्येच्या गणनेनुसार राज्यात ८५ लाख ७७ हजार आदिवासी असून, ही टक्केवारी एकूण लोकसंख्येच्या ८.८५ इतकी आहे. महाराष्ट्रात ४५ अनुसूचित जमाती आढळतात, त्यामध्ये माडिया गोंड, कातकरी, कोलाम, कोरकू, पावरा, ठाकूर,भिल्ल, गोंड, वारली, आंध यांचा समावेश आहे. यापैकी कोलाम, कातकरी आणि माडिया गोंड या तीन जमाती केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणून अधिसूचित केल्या आहेत. राज्यातील ३५ जिल्ह्यांपैकी धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, ठाणे, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक संख्येने आदिवासी वास्तव्यास आहेत.

आदिवासी समाज व्यवस्थेमध्ये निसर्गाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. निसर्गाच्या सान्निध्यात आदिवासींनी आपली कला, साहित्य, संस्कृती व इतर सामाजिक व्यवहार जोपासले आणि आनंददायी जीवनशैली विकसित केली. विविध प्रकारची श्रेष्ठ मानवी मूल्ये, स्त्री पुरुष समानता, वैचारिक मोकळेपणा या बाबी आदिवासी समाजामध्ये आढळून येतात. आपल्या वैशिष्ट्यपूर्ण शैलीत मनस्वी जीवन जगणारे आदिवासी कालौघात रूढी, प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा, अज्ञान या दुष्टचक्रात अडकले. इतर समाज घटक, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या प्रगतीच्या पुढच्या टप्प्यावर झेप घेण्याची मनोभूमिका स्वीकारत असताना, आदिवासी समाज मात्र दोन पावले मागे राहिला. समाजातल्या दुष्ट प्रवृत्तींनी त्यांच्या साधेपणाचा, भोळेपणाचा फायदा घेऊन त्यांचे शोषण आरंभले. त्यांच्या मूळ निवासस्थानावर म्हणजेच वनांवर आक्रमण केले. त्यांची मूळ, नैसर्गिक स्वाभाविक अशी जीवनशैली प्रभावित झाली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशातील राज्यकर्त्यांनी सामाजिक न्यायाचा उद्घोष केला आणि समाजातील सर्वच उपेक्षित, दुर्लक्षित समाज घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्राधान्यक्रम निर्धारित केला.

महाराष्ट्र शासनानेही आदिवासी विकासाला प्राधान्य देऊन या समाज घटकासाठी शिक्षण, प्रशिक्षण, शेती, लघुउद्योग, कुटिरोद्योग, व्यक्तिगत लाभ अशा विविध बाबींमध्ये साहाय्य पुरवणाऱ्या योजना राबवण्यास प्रारंभ केला. आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येऊ लागली. ही तरतूद इतर कोणत्याही खात्याकडे वळवता येणार नाही यासाठी कायदेशीर बंधन घातले. यंदाच्या अर्थसंकल्पात ४,१७७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या निधीतून आदिवासी उपयोजनेंतर्गत येणाऱ्या क्षेत्रात आश्रमशाळा, वसतिगृहे व इतर बांधकामे, आदिवासी वस्तिसुधार, विद्युतीकरण, आरोग्य विषयक कार्यक्रम, शिष्यवृत्ती आदी बाबींवर खर्च करण्यात येईल. आदिवासी विकासाच्या योजनांची अंमलबजावणी सुव्यवस्थित आणि सूत्रबद्धरीत्या करण्यासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांच्या कार्यालयाची साखळी उभारण्यात आली. आदिवासी उपयोजनेंतर्गतच्या क्षेत्रात राज्य शासनाने आरोग्य व्यवस्था अधिकाधिक बळकट आणि सक्षम करण्याकडे लक्ष पुरवल्याने कुपोषण, माता-बाल मृत्यूचे प्रमाण निश्चितपणे कमी झाले आहे.

आदिवासींच्या वनहक्काबाबत शासनाची सकारात्मक भूमिका असून अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वा वननिवासी (वन हक्कांची) मान्यता अधिनियम २००६ कायदा मंजूर करण्यात आला आणि २००८ पासून तो अमलात आला आहे. या वनाधिकार हक्कात वैयक्तिक आणि सामूहिक असे दोन्ही हक्क प्रदान करण्यात आले आहेत. या कायद्याची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात असून जळगाव, अहमदनगर, सातारा, औरंगाबाद, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, गोंदिया आणि गडचिरोली जिल्ह्यात ३१ मे २०१३ पर्यंत शंभर टक्के वनाधिकार दावे निकाली निघाले आहेत. या कायद्याखाली ८६,४४१ वन जमिनींच्या पट्ट्यांचे वितरण करण्यात येऊन २०२५६२ एकर जमीन आदिवासींना बहाल करण्यात आली.

घनदाट अरण्ये आणि डोंगरदऱ्या असलेल्या महाराष्ट्रातील काही आदिवासी क्षेत्रात नक्षलवादाची समस्या उग्र होताना दिसते. या तरुणांना मूळ प्रवाहाकडे वळविण्याचे मोठे आव्हान आहे. रोजगाराभिमुख शिक्षण देऊन हा सामाजिक प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या क्षेत्रातील सर्व प्रकारच्या विकासावर शासनाने अधिक भर दिला आहे.

शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळामार्फत गेल्या अनेक वर्षांत आदिवासी युवकांसाठी रोजगार-स्वयंरोजगाराच्या विविध योजना राबवल्या जातात व त्यासाठी अतिशय सुलभतेने कर्ज व इतर आर्थिक साहाय्य पुरवले जाते. पुणे येथे असणारी आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था गेल्या अनेक वर्षांपासून राज्यातील आदिवासींच्या साहित्य, संस्कृती, कला आदींबाबत मूलभूत संशोधन प्रकल्पांमध्ये योगदान देत आहे.

लोकराज्यच्या या अंकात आदिवासी विकासाच्या विविधांगी बाबींचे सविस्तर लेख समाविष्ट करण्यात आले आहे. हा अंक सर्वसमावेश असावा याकडे पूर्ण लक्ष पुरवण्यात आले असले तरी काही विषयांना स्थान मिळू शकलेले नाही याची आम्हास जाणीव आहे. तरीसुद्धा हा अंक लोकराज्यच्या इतर अंकाप्रमाणेच वाचनीय, संग्राह्य आणि सर्वांनाच उपयुक्त ठरेल असा करण्याचा आमचा प्रयत्न राहिला आहे. पूर्वीच्या अंकाप्रमाणेच हाही अंक वाचकांना आवडेल अशी आम्हाला खात्री वाटते.


**प्रमोद त्र्यं. नलावडे**
मुख्य संपादक तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क महासंचालनालय)
संपर्क : ०२२-२२०४१५८५/२२०२७९५६
dg@dgipr.maharashtra.gov.in

# प्रगतीच्या दिशेने वाटचाल



समाजातील दुर्बल घटक विशेषत: अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या लोकांचे शैक्षणिक व आर्थिक हितसंबंध जपण्यासाठी आणि त्यांच्यावरील सामाजिक अन्याय तसेच इतर पिळवणुकींपासून संरक्षण करण्यासाठी भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार राज्य शासनावर जबाबदारी टाकण्यात आली आहे. यासाठी विविध प्रकारच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यासाठी पुरेसा निधीही दिला जात आहे. महाराष्ट्रातील आदिवासींच्या विकासाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांचे मनोगत.

राज्यात एकूण ४५ अनुसूचित जमाती आहेत. त्यात मुख्यत्वे भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. राज्यातील धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक, ठाणे, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती व यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये आदिवासींची संख्या अधिक आहे.

भारताच्या माजी पंतप्रधान स्व. इंदिराजी गांधी यांनी आदिवासी उपयोजनेची संकल्पना सर्वप्रथम मांडली. त्यामुळेच संपूर्ण देशभर आदिवासी क्षेत्रात क्षेत्रविकासाची कामे सुरू झाली. महाराष्ट्रातही त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक उपाययोजना शासनाने हाती घेतल्या, त्यामुळे या समाजाची प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. काळाबरोबर विकासाच्या संकल्पना बदलतात. काळाबरोबर घडणारे बदल लक्षात घेऊन राज्य शासनामार्फत वेगवेगळे निर्णय व योजना हाती घेण्यात आल्या.

**८ लाख ४२ हजार एकर जमिनीचे वाटप**

अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वन निवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम (२००६), ३ डिसेंबर २००७ पासून राज्यामध्ये लागू करण्यात आला. या अधिनियमाची अंमलबजावणी करत असताना राज्यात मे २०१३ अखेर ग्रामसभेकडे प्राप्त झालेल्या वैयक्तिक ३ लाख ४१ हजार २० व सामूहिक ५ हजार ११२ अशा एकूण ३ लाख ४६ हजार १३२ वन हक्क दाव्यांपैकी ३ लाख ४३ हजार १२५ दावे निकाली काढण्यात आले असून त्याचे प्रमाण सुमारे ९९.१३ टक्के एवढे आहे. राज्यात आतापर्यंत प्राप्त झालेल्या प्रकरणांपैकी एकूण १ लाख ४६ हजार ५५९ दावे अंतिमत: मंजूर करण्यात आले आहेत. मंजूर केलेल्या १ लाख ४६ हजार ५५९ वनहक्क दाव्यांपैकी १ लाख ३८ हजार ९८८ दाव्यांमध्ये टायटल्सचे वाटप करण्यात आले आहे. वनहक्क वाटप केलेल्या टायटल्समधील एकूण वनक्षेत्र ८ लाख ४२ हजार एवढे आहे.

**आदिवासी विकासासाठी निधी**

आदिवासी बांधवांच्या विकासासाठी शासनामार्फत अनेक योजना राबवण्यात येतात. आदिवासी विभागासाठी राज्यात स्वतंत्र विभाग आज कार्यरत आहे. आदिवासी शेतजमीन संरक्षण कायदा, आदिवासी महामंडळाची निर्मिती, एकाधिकार खरेदी, आदिवासींसाठी वेगळे बजेट, आदिवासींच्या कायद्याचे संरक्षण आणि खोटे दाखले घेणाऱ्यांना शिक्षा करणारा कायदा. 'शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ' अशा विविध योजना राज्य शासनामार्फत राबवण्यात येतात. राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या नऊ टक्के लोकसंख्या ही आदिवासींची आहे. त्यामुळे ही लोकसंख्या विचारात घेऊन लोकसंख्येच्या प्रमाणात निधी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय आम्ही घेतला आहे.

**आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहांची बांधकामे**

आदिवासी विकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या ४३७ आश्रमशाळांच्या इमारतींच्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. आतापर्यंत २९२ इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले असून १०५ इमारतींचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. आणखी १८६ वसतिगृहांच्या बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, आतापर्यंत ८० इमारतींचे बांधकाम पूर्ण तर ५६ इमारतींचे बांधकाम अंतिम टप्प्यात आहे. चालू वर्षी आश्रमशाळा व वसतिगृह व इतर बांधकामासाठी ५०१ कोटी ३८ लाख रुपयांची तरतूद आहे.

**सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती योजना**

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांची शाळेतील गळती रोखण्यासाठी इयत्ता पहिली ते १० वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. या योजनेसाठी चालू वर्षी २०३ कोटी ६८ लाख रुपये उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

**आदिवासी वस्तिसुधार योजना**

आदिवासी भागातील गावे, वाड्या व वस्त्यांच्या विकासासाठी ' ठक्कर बाप्पा आदिवासी वस्तिसुधार योजना' लागू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत पिण्याच्या पाण्याची सोय, विद्युतीकरण, रस्ते व गटारांचे बांधकाम तसेच इतर मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात येतात. यासाठी चालू वर्षासाठी २४५ कोटी २३ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

यशाची नवनवीन शिखरे पादाक्रांत करीत असताना समाजातील सर्व घटकांना न्याय दिला पाहिजे. त्यांची कामे सर्वोच्च प्राधान्याने झाली पाहिजेत, अशी राज्य शासनाची भूमिका असून त्या दृष्टीने वाटचाल सुरू आहे.

**शब्दांकन - सतीश पाटणकर,**
मुख्यमंत्र्यांचे माहिती अधिकारी
**संपर्क: ९७५७१६५८३३**

# भरीव तरतूद : चौफेर विकास

मूळ भारतीय संस्कृतीचे जतन करण्याचे काम आमचे आदिवासी बांधव करीत आहेत. निसर्गाच्या साक्षीने ते आपली संस्कृती जोपासत आहेत. या संस्कृतीला कुठेही ठेच न पोचवता त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचे किंबहुना त्यांच्यापर्यंत मुख्य प्रवाह नेण्याचे आपले कर्तव्य आहे. राज्य सरकारने आदिवासी बांधवांना सन्मान मिळवून देण्यासाठी विविध उपाययोजना केल्या आहेत.

आदिवासी बांधवांनी सामुदायिक हितसंबंध जोपासणाऱ्या संस्कृतीचे संवर्धन केले आहे. व्यक्तिगत हितसंबंध जोपासणाऱ्या संस्कृतीला त्यांच्या जीवनात कधीच थारा नव्हता. मानवी मूल्यांवर आधारित आदिवासी संस्कृती धर्मपूर्व संस्कृती आहे, असेही काही अभ्यासकांचे मत आहे; परंतु आदिवासी जीवन, रीती, परंपरा काळाला समांतर आहेत. अलीकडच्या काळात सर्वच समाजांत मोठमोठे मेळावे भरवून वधू-वर निवडण्याचा कार्यक्रम केला जातो. आदिवासी समाजात वेगवेगळ्या सण-उत्सवांच्या माध्यमांतून वधू-वर निवडण्याची परंपरा खूप जुनी आहे. त्यांची 'लाहे' बोलाविण्याची परंपरा मानवी मूल्यांवरचा विश्वास दृढ करणारी आहे. एखाद्या आदिवासी बांधवाचे शेत नांगरायचे असले किंवा घर बांधायचे असल्यास तो 'लाहे' बोलवितो-म्हणजे मदत मागतो. अशावेळी इतर सर्व आदिवासी बांधव स्वत:ची कामे सोडून त्याच्या मदतीला धावून जातात, हे लोकहित जोपासणाऱ्या संस्कृतीचे प्रतीक आहे.

आदिवासी संस्कृतीचे हे महत्त्व लक्षात घेऊन आदिवासी बांधवांच्या जीवनात आनंद फुलविण्याचे प्रयत्न शासन करीत आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आर्थिक, भौतिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक स्तरावर वेगवेगळ्या योजनांची अंमलबजावणी सुरू केली आहे.

काही वर्षांपूर्वी राज्य शासनाने माजी मुख्य सचिव द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. या समितीच्या शिफारशींनुसार १९९३-९४ पासून सुधारित 'आदिवासी उपयोजना' लागू करण्यात आली; तसेच आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली.



यंदाच्या अर्थसंकल्पात आदिवासी उपयोजनेसाठी ४ हजार १७७ कोटी ४८ लाख रुपयांची तरतूद केली आहे. आदिवासी आश्रमशाळा, वसतिगृहे व इतर बांधकामांसाठी ५०१ कोटी ३८ लाख, सुवर्ण महोत्सवी आदिवासी शिष्यवृत्ती योजनेसाठी २०३ कोटी ६८ लाख, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजनेसाठी २४५ कोटी २३ लाख, आदिवासी भागातील विद्युतीकरणासाठी ८२ कोटी ८९ लाख; आदिवासी भागांतील आरोग्यविषयक कार्यक्रमांसाठी २४४ कोटी २३ लाख, अशी भरीव तरतूद यावर्षी करण्यात आली आहे. सांगताहेत उपमुख्यमंत्री अजित पवार.

आदिवासी कल्याणाच्या दृष्टीने हा निर्णय मैलाचा दगड ठरला आहे.

आदिवासी बांधवांच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीला वेग यावा म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाला बळकटी देण्यात येत आहे. त्याद्वारे आदिवासी भागांत सहकारी तत्त्वांवरील उद्योग उभे राहण्यास मदत होत आहे. शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाच्या माध्यमातून आदिवासी बांधवांचे आर्थिक जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे महामंडळ आदिवासी बांधवांना वेगवेगळ्या प्रकारचा कर्ज पुरवठा उपलब्ध करून देण्याचे काम करते. त्यामुळे रोजगार, स्वयंरोजगार निर्मितीस चालना मिळाली आहे.

शिक्षणातून समृद्धी आणण्याच्या हेतूने शाळा, महाविद्यालये, आश्रमशाळा यांच्याही पुढे जाऊन इंग्रजी माध्यमाची पब्लिक स्कूल सुरू करण्यात आली आहेत. आदिवासी बांधवांमध्ये शिक्षणाच्या प्रसारासाठी शासन जाणीवपूर्वक पावले उचलत आहे. विद्यार्थ्यांकरिता विविध शैक्षणिक सवलतींसोबतच शिष्यवृत्ती योजनाही सुरू केल्या आहेत.

बहुतांश आदिवासी लोकसंख्या शेती व्यवसायाशी संबंधित आहे. त्यात शेतकरी आणि शेतमजुरांचा समावेश आहे. त्यामुळे आदिवासींच्या कृषी विकासाच्या योजनांना सरकारने अधिक प्राधान्य दिले आहे. प्रशिक्षण, रोजगार, स्वयंरोजगार, वस्तिसुधार अशा वैयक्तिक लाभाच्या विविध योजनाही राबवल्या जातात. आदिवासी उपयोजना क्षेत्रात वेगवेगळ्या विभागांच्या माध्यमातून कृषी व संलग्न सेवा, वाहतूक व दळणवळणाची व्यवस्था, विशेष क्षेत्रीय कार्यक्रम, पाटबंधारे व पूरनियंत्रण, विद्युत विकासासारख्या सामूहिक योजना राबवल्या जात आहेत. आदिवासी उपयोजनाबाह्य क्षेत्रांत आदिवासी बांधवांसाठी वैयक्तिक लाभाच्या वेगवेगळ्या योजना राबवण्यात येतात.

व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्याने किंवा निसर्गाच्या सान्निध्यात अन्य पर्यटन व्यवसाय विकसित करताना स्थानिकांना प्राधान्य देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळे आज अनेक स्थानिक तरुणांना गाइड, वाहन व निवास व्यवस्था; तसेच उपहारगृहांसारख्या आवश्यक सेवासुविधांतून रोजगार उपलब्ध होताना दिसत आहे. त्यात मोठ्या संख्येने आदिवासी तरुणांचा समावेश आहे. व्याघ्र प्रकल्प किंवा राष्ट्रीय उद्यानांमधील आदिवासींच्या पाड्यांसंदर्भात काही प्रश्नही आहेत, त्याची आम्हाला जाणीव असून तेही तातडीने मार्गी लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत. आदिवासी बांधवांचे व्यापक हित लक्षात घेतल्याशिवाय कुठल्याही परिस्थितीत विकासाची प्रक्रिया पुढे नेली जाणार नाही. सरकारच्या गेल्या काही वर्षांपासूनच्या प्रयत्नांमुळे आज आदिवासी समाजात आमूलाग्र बदल होताना दिसत आहेत. शेकडो वर्षे दुर्गम जंगलात वास्तव्यास असणाऱ्या आदिवासी बांधवांची मुले आता आधुनिक जगाचा भाग बनताना दिसत आहेत.

**शब्दांकन : जगदीश मोरे,**
उपमुख्यमंत्र्यांचे जनसंपर्क अधिकारी ✶✶

# सर्वंकष विकासासाठी प्रयत्नशील



आदिवासी हा दऱ्याखोऱ्यात राहणारा व समाजापासून अलिप्त असणारा घटक होता. त्याला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आजवर अनेक उपाययोजना शासनाने हाती घेतल्या. मूळवासी असणाऱ्या या घटकाला विकासाच्या दिशेने नेण्यासाठी आदिवासींच्या सर्वंकष विकासासाठी विशेष प्रयत्न म्हणून स्वतंत्र विभागाची निर्मिती करण्यात आली. आदिवासी विकास मंत्री मधुकर पिचड यांचे मनोगत.

समाजाच्या मुख्य प्रवाहापासून निर्जनस्थळी राहणाऱ्या आदिवासी जमातींना महाराष्ट्र शासनाने क्रांतीकारी पावले उचलत सन्मान मिळवून दिला आहे. या सर्व अनुसूचित जमातींचा विकास करण्याकरिता शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा या मूलभूत गरजांसह या समाजाच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधांच्या निर्मितीतून आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनस्तरावर विविध उपक्रम राबवले जात आहेत.

**अर्थसंकल्प**

देशात सर्वप्रथम राज्यातील आदिवासींची लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्राप्रमाणे अर्थसंकल्पात वेगळी तरतूद करण्याचे भाग्य त्यावेळचे मुख्यमंत्री श्री. शरद पवार यांच्या प्रयत्नाने व आदिवासी विकासमंत्री म्हणून मला लाभले. त्यामुळे राज्याच्या अर्थसंकल्पात लोकसंख्येप्रमाणे व भौगोलिक क्षेत्राप्रमाणे आदिवासींच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे शक्य झाले. आजमितीस राज्यात असलेल्या लोकसंख्येच्या प्रमाणात एकूण अर्थसंकल्पीय तरतूदीच्या ९% प्रमाणे रु. ४१७७ कोटी एवढा निधी आदिवासींकरिता उपलब्ध करून देण्यात आला आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे.

आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी आणि कल्याणासाठी ज्या योजना स्थलकालानुरूप आवश्यक आहेत आणि त्या योजनांचा अर्थसंकल्पात समावेश नाही अशा अभिनव स्वरूपाच्या स्थानिक महत्त्वाच्या योजना आवश्यक असूनही तांत्रिक कारणांमुळे त्याचा लाभ आदिवासींना देता येत नाही, अशा योजना स्थानिक पातळीवर तातडीने व प्रभावीपणे कार्यान्वित करून गरजू अदिवासींना प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी केंद्रावर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट) ही योजना राबवण्यात येत आहे. या योजनेची प्रति लाभार्थी अनुदान मर्यादा रुपये १५,०००/- वरुन रुपये ५०,०००/- करण्यात आली आहे. हा एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शिक्षण**

शिक्षणामुळे नियोजित सामाजिक बदलाच्या प्रक्रियेबरोबर विकासालाही गती मिळते. आदिवासीमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून शिष्यवृत्या, वसतिगृहे आणि आश्रमशाळा या महत्त्वाच्या योजना शासनाने हाती घेतल्या आहेत.

आदिवासी मुलांना उत्तम शिक्षणाची संधी निर्माण व्हावी म्हणून राज्यात ५५२ शासकीय आश्रमशाळा तर ५५६ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. या सर्व शाळांमध्ये एकूण ४,१९,५७२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. याशिवाय ४८१ शासकीय वसतिगृहांमध्ये ३३,३६४ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शासकीय आश्रमशाळांमध्ये शिकणारा विद्यार्थी जेवणापासून वंचित राहू नये, आश्रम शाळांना अन्नधान्य वेळेत मिळावे यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था (P.D.S.) अंतर्गत धान्य पुरवठा करण्यास मान्यता देण्यात आली . शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना टुथपेस्ट व खोबरेल तेलाकरिता रोख स्वरूपात अथवा धनादेशाने थेट बँक खात्यात रक्कम जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रकल्प अधिकारी यांना शाळा व वसतिगृह व कार्यालयीन कर्मचाऱ्यावर प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले.

सुवर्णमहोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना राज्यात सुरू करण्यात आली आहे. शाळेतील विद्यार्थ्यांची गळती थांबावी यासाठी ही शिष्यवृत्ती सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला. इयत्ता पहिली ते चौथी, पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. त्याचप्रमाणे जिल्हा परिषद व खाजगी शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती लागू आहे. यामुळे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. तसेच गळतीचे प्रमाणही कमी झाले आहे.

आदिवासी मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची संधी मिळावी यासाठी राज्यात ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर या प्रादेशिक कार्यक्षेत्रात प्रत्येकी एक याप्रमाणे सी.बी.एस.ई. धर्तीवर चार एकलव्य रेसिडेन्शियल पब्लिक स्कूलमध्ये इयत्ता ६ वी ते १२ वी चे वर्ग सुरु करण्यात आले आहेत. या शाळांमध्ये प्रवेश देताना आश्रमीय आदिवासी विद्यार्थी असलेल्या तसेच शासकीय अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा इत्यादी शाळांमध्ये इयत्ता ५ वी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा घेऊन या स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांमधून गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो

**शिष्यवृत्ती**

शिष्यवृत्तीची हमखास प्रतिपूर्ती होण्यासाठी ई-विकास या कार्यक्रमांतर्गत ई-शिष्यवृत्ती हा उपक्रम राबवण्यात येत आहे. विद्यार्थी आणि शिक्षण संस्था यांना वेळेत शिष्यवृत्ती रक्कम उपलब्ध व्हावी यासाठी etribal.gov.in ही वेबसाइट सुरू करण्यात आली आहे. या वेबसाईटवर विद्यार्थी आणि शिक्षण संस्था शिष्यवृत्तीसाठी ऑनलाइन अर्ज करीत आहेत. तसेच वसतिगृह प्रवेश पात्र परंतु वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना उच्चशिक्षण घेणे सुलभ होण्याकरिता निर्वाह भत्ता मंजुरी प्रस्तावित आहे.

### आरोग्य

अदिवासींच्या आरोग्यविषयक बाबी हाताळताना आरोग्याच्या समस्यांबाबत संवेदनशीलतेने विचार करून दुर्गम भागात वैद्यकीय सेवा वेळेवर उपलब्ध होण्याकरिता पौष्टिक आहाराचा पुरवठा व इतर आरोग्य सेवांसंदर्भात अनेक समस्यांना सातत्याने तोंड द्यावे लागत असल्याने विशेषत: उन्हाळा व पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या समस्यांना तोंड



देण्याकरिता विशेष कृती कार्यक्रम नवसंजीवन योजना या नावाने राबवण्यात येत आहेत. पाडा स्वयंसेवकांची नियुक्ती करणे, गर्भवती मातांची तपासणी, कुपोषणातील तिसऱ्या व चौथ्या स्तरामधील बालकांचे सर्वेक्षण करून आजारी बालकांना रुग्णालयात अथवा प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्याची व्यवस्था केली जाते. पावसाळ्याच्या कालावधीत आवश्यक असणारा औषधांचा साठा प्राथमिक आरोग्य केंद्रात व उपकेंद्रात उपलब्ध ठेवण्यात येतो. आदिवासी भागातील बालकांचे कुपोषण ही समस्या तीव्र बनत चालली आहे. या समस्येला हाताळण्यासाठी राज्याने काही चांगल्या उपाययोजना केल्या आहेत.

### निवारा

कुडा-मातीच्या घरात, झोपड्यांमध्ये किंवा तात्पुरत्या तयार केलेल्या निवाऱ्यात राहतात अशा आदिवासींना कायमस्वरूपी हक्काचे घर मिळावे यासाठी शबरी आदिवासी घरकूल योजना राबवण्यात येणार आहे. या योजनेसाठी रु. ८४ कोटी निधी देण्यात आला आहे. योजनेंतर्गत एक बैठकीची खोली, बेडरुम, स्वंयपाक घर, स्नानगृह व शौचालय याचा समावेश असलेले घरकूल उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### वस्तीसुधार

आदिवासी उपयोजना बाह्य भागांमध्ये ज्या ठिकाणी मोठ्या संख्येने आदिवासींचे वास्तव्य आहे. तेथे शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी उपयोजनेच्या निधीमधून तरतूद उपलब्ध करून देण्यास प्रतिबंध आहे. यामुळे अशा भागांचा विकास इतर भागांच्या तुलनेने कमी प्रमाणात होत आहे किंवा अशा वस्त्या दुर्लक्षित राहिलेल्या आहेत. अशा ठिकाणी ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा कार्यक्रमांतर्गत विकासासाठी आवश्यक असलेल्या सामूहिक विकासाच्या सुविधा पुरवण्याची योजना राबवण्याचे धोरण लागू झालेले आहे.

### खावटी कर्ज

पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधित आदिवासींना रोजगार उपलब्ध होत नसल्यामुळे आदिवासी उपयोजना क्षेत्रातील आदिवासी अल्प भूधारक, भूधारक, भूमीहीन व शेतमजूर यांना आर्थिक अडचण निर्माण होऊ नये म्हणून खावटी कर्ज देण्यात येते. पूर्वी खावटी कर्जाचे वाटप ७० टक्के वस्तू स्वरूपात व ३० टक्के रोख स्वरुपात होत होते. आदिवासी लाभार्थ्यालाच ही कर्जाची रक्कम मिळावी तसेच भ्रष्टाचाराला आळा बसावा या दृष्टिकोनातून या खावटी कर्जाची रक्कम लाभार्थ्यांला धनादेशाद्वारे देण्याचा निर्णय शासनाने अलीकडे घेतला आहे. आता आदिवासींना खावटी कर्जाचे वाटप १०० टक्के रोखीने करण्यात येणार आहे.

### रोजगार व स्वयंरोजगार

अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या उद्देशाने राज्यात परिवहन महामंडळ व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने मोटार वाहन चालक प्रशिक्षण देण्यासाठी पांढरकवडा व गडचिरोली येथे प्रशिक्षण केंद्र सुरू आहे. शारीरिक व शैक्षणिकदृष्ट्या योग्य असणाऱ्या आदिवासी तरुण, तरुणींना त्यांच्या कुटुंबाची आर्थिक व सामाजिक प्रगती होईल व त्यांचे जीवनमान उंचावेल म्हणून सैन्यदल किंवा पोलीसदलात भरती होण्यासाठी भरतीपूर्व प्रशिक्षण देण्यात येते. आदिवासी भागातील सुशिक्षित तरुणांना आदिवासी विकासाच्या विविध योजनांची तसेच समाजाचे नेतृत्त्व करण्याकरिता आवश्यक त्या बाबींचे प्रशिक्षण आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे आयोजित करण्यात येते. वाढत्या स्पर्धेच्या युगात आश्रमशाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने आदिवासी युवकांना संगणक प्रशिक्षण देण्यात येते.

रोजगारक्षम होण्यासाठी आदिवासी उमेदवारांना नामांकित प्रशिक्षण संस्थामार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येते. कौशल्य विकास योजनेंतर्गत उत्पादन व प्रक्रिया, टेक्सटाईल्स, ॲग्रोप्रोसेसिंग, ऑटोमोबाईल्स, रिटेल मार्केटिंग, माहिती तंत्रज्ञान (आय.टी), हॉस्पीटॅलिटी, मनुष्यबळ विकास, आरोग्य संवर्धन, बांधकाम इत्यादी अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण देण्यात येते.

ब्रेंचमार्क सर्व्हे, पेसा ॲक्टची प्रभावी अमंलबजावणी करण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्याचे निश्चित केले आहे. बदलत्या काळानुसार सर्व योजनांची परिणामकारक अमंलबजावणी करण्यासाठी विभागाची पुनर्रचना करण्याचे देखील निश्चित केले आहे.

### संस्कृती

शासनाच्या विविध योजनांमुळे आदिवासींचा आर्थिक विकास घडत आहे. या आर्थिक विकासांबरोबरच त्यांच्यात सामाजिक, सांस्कृतिक बदल घडणे अपरिहार्य आहे. या



दृष्टिकोनातून आदिवासींच्या हस्तकला, चित्रकलाच्या स्पर्धा घेण्यात येतात. आपल्या राज्यातील आदिवासींनी विकसित केलेली वारली चित्रकला प्रसिद्ध आहे. पाश्चिमात्य देशात या कलेचे प्रदर्शने भरविण्यात आले होते. कलेला उत्तेजन मिळावे यासाठी वारली कलेच्या प्रदर्शनाची संधी शासनातर्फे उपलब्ध करुन दिली जाते. वारली चित्रकला, लाकडांवरील कोरीव काम करणाऱ्या या कलावंताना मदतीचा हात देऊन आदिवासी संस्कृतीचा वारसाही शासन जपत आहे.

**शब्दांकन : अर्चना शंभरकर, मुक्ता पवार**

✶✶

# जीवनमान उंचावण्यावर भर

आदिवासी विकासासाठी महाराष्ट्र शासनाने स्वतंत्र खात्याची निर्मिती १९८३ साली केली. आदिवासींच्या शेतजमिनी अहस्तांतरणीय करणारा कायदा, वनजमीन हक्क, आदिवासी विकास महामंडळाची निर्मिती, एकाधिकार खरेदी योजना, स्थानिक स्वराज्यसंस्थामध्ये आदिवासींसाठी राखीव जागा, आदिवासींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राज्याच्या अर्थसंकल्पात तरतूद, आदिवासींच्या जातीच्या कायद्याचे संरक्षण व खोटे दाखले घेणाऱ्यांना शिक्षा करणारा कायदा, शबरी महामंडळाची निर्मिती, आदिवासी उपयोजना, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अशा अनेक माध्यमांतून आदिवासींच्या विकासाला शासनाने सुरुवात केली.

आदिवासीींच्या सर्वांगीण विकासासाठी शासन सर्वतोपरी मदत करीत आहे. कन्यादान योजनेच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. कौशल्य विकासासाठी आर्थिक मदत केली जात आहे. त्यासाठी आदिवासी बांधवांनीही पुढे आले पाहिजे. आरोग्य आणि कुपोषणाच्या समस्या दूर करण्याचा शासनाचा युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहे. शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सेवा उपलब्ध केल्या जात आहेत. सांगताहेत आदिवासी विकास राज्यमंत्री राजेंद्र गावित



आदिवासी बांधवांचा गैरफायदा अनेकजण विविध पद्धतीने घेत होते. याला चाप लावण्यासाठी जातीचे खोटे प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा निर्णय शासनाने अलीकडेच घेतला आहे. त्यांच्या कृषी उत्पादनाला चांगली किंमत मिळावी म्हणून आदिवासी शबरी विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. गरिबी व अज्ञानामुळे बाल कुपोषण व बालमृत्यूचे प्रमाण पूर्वी खूप होते. गेल्या तीन वर्षाच्या कालखंडात हे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. एकात्मिक बाल विकास सेवा, राजमाता जिजाऊ मिशन, महिला व बाल विकास विभाग आणि आरोग्य विभाग यांच्या समन्वयातून कुपोषण आपण आठ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात यशस्वी झालो आहोत. आज आदिवासीबहुल सहा जिल्ह्यांत ६०० पाळणाघरे सुरू केली जात आहेत. या सर्व उपाययोजना करीत असताना एकदम सर्व समस्या मिटल्या, असे मी म्हणणार नाही कारण विकास ही निरंतर प्रक्रिया आहे. हजारो वर्षांचे मागासलेपण एकाएकी जात नाही. त्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे आणि हे प्रयत्न आम्ही शासनाच्या ६ विभागांमध्ये समन्वय साधून करीत आहोत. आदिवासीबहुल भागात रस्ते, वीज, पाणी, रोजगार, प्राथमिक आरोग्य केंद्र, स्वस्तधान्य दुकाने उपलब्ध केली जात आहेत. कौशल्य आधारित शिक्षणासाठी आयटीआयपासून अनेक अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जात आहे.

शिक्षण असेल तर रोजगार मिळणे सोपे जाते. यासाठी आदिवासी युवक-युवतींना अनेक प्रकारच्या शैक्षणिक सुविधा दिल्या जात आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देणे, शासकीय व अनुदानित आश्रमशाळांना विशेष प्रोत्साहन देणे, केंद्र पुरस्कृत पब्लिक स्कूल, व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, शालांत व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बक्षीस योजना, भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना, राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थेत वैद्यकीय शिक्षण व संलग्न शिक्षणाकरिता खाजगी शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती करणे, ८ वी ते १२ वीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती व वाहतूकभत्ता, परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, सैनिकी शाळांमध्ये ज्यादा तुकडी, सैनिक शाळेत शिक्षण घेणाऱ्यांना विद्यावेतन, सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना, अनुदानित आश्रमशाळा, आदिवासी मुलांमुलींकरिता शासकीय वसतिगृहे, या योजनांमुळे आज आदिवासी विद्यार्थी चांगले शिक्षण घेत आहे.

## आधी केले मग सांगितले...



माझेच एक उदाहरण देतो. हळद आणि पुष्पशेतीचा प्रयोग करण्यासाठी मी जव्हार, वाडा, मोखाडा आदी ठिकाणी शेतकऱ्यांना प्रवृत्त केले. त्यांनी लाखोंचे उत्पन्न मिळविले. तो एक यशस्वी प्रयोग ठरला. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी बांधवांनी नगदी पिके घ्यावीत यासाठी ठाणे जिल्ह्यातील १६ पाणलोट क्षेत्राची कामे पूर्ण करण्यासाठी ९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. योजनांचा फायदा घेण्यासाठी आदिवासींनीही पुढे आले पाहिजे. प्रशासनात आदिवासी बांधवांची मुले यावीत व समाजात त्यांचे प्रेरणास्रोत निर्माण व्हावे यासाठी यूपीएससी व एमपीएससी स्पर्धा परीक्षेसाठी प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्याचे माझे स्वप्न होते. गेल्या दोन वर्षांपासून यासाठी प्रयत्न सुरू होते. ते सत्यात उतरत असून यासाठी ३.६५ रुपये कोटींची तरतूद करण्यात आली असून त्यात ५०० तरुण-तरुणींना प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार आहे.

✶✶

# आदिवासी जननायक

**प्रा.वसंत पुरके,**
उपाध्यक्ष
महाराष्ट्र विधानसभा

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. आपल्या २५ वर्षाच्या अल्पजीवन कालावधीमध्ये त्यांनी आदिवासींमध्ये स्वदेशी व भारतीय संस्कृतीच्या प्रती अतुलनीय प्रेरणा जागवली. बिरसा मुंडा यांनी त्रिस्तरीय पध्दतीने समाजाच्या उन्नतीसाठी कार्य केले. आदिवासी समाजाचे होत असलेले शोषणाचे मूळ, परकीय राजकीय व्यवस्थेत असल्याची बाब बिरसा मुंडा यांनी ओळखली. त्याविरुध्द आदिवासी समाजास संघटित करून ब्रिटिश सत्तेविरुध्द वेळोवेळी आंदोलन पुकारले. परंपरेने चालू असलेल्या अघोरी आणि अनिष्ट प्रथांचे निर्मूलन होण्याची प्रक्रियादेखील समाजात सुरू झाली. त्यामुळे धर्मांतर, शोषण व अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रवृत्ती समाजात वृध्दिंगत झाली.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात आदिवासी जननायक बिरसा मुंडा यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. त्यांचा जन्म १५ नोव्हेंबर, १८७५ रोजी रांचीजवळील लिहतू खेडेगावात सुगमा मुंडा आणि करमी हातू या दाम्पत्याच्या पोटी झाला. याच बालकाने लढवय्या वृत्तीने आदिवासींच्या न्याय हक्कासाठी मोठा लढा उभारून जे महान कार्य केले त्याला तोड नाही. त्यामुळेच बिरसा मुंडा यांना आदिवासी जननायक हा किताब जनतेनेच बहाल केला.



त्यांचे वडील शेतमजूर होते. घरच्या गरिबीमुळे त्यांना इंग्रजी माध्यमाच्या चाईबासा इंग्लिश मिशनरी स्कूलमध्ये शिक्षणाची संधी मिळाली. इंग्रजी शिक्षणामुळे त्यांच्यावर आधुनिक विचारांचा प्रभाव पडला. परंतु त्यांना भारतीय संस्कृतीचा मनस्वी अभिमान होता व तो त्यांनी निरंतर जपला. नैतिक आचरणाची शुद्धता व एकेश्वरवादाचा त्यांनी पुरस्कार केला. ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये आदिवासींच्या वनसंपत्तीवर असलेल्या अधिकारावर बाधा येण्यास सुरुवात झाली. ती रोखण्याकरिता आदिवासींनी न्यायालयात याचिका दाखल केली व आदिवासींचे वनाधिकार पुनर्स्थापित करण्याची मागणी केली. परंतु सरकारने ती फेटाळल्यामुळे आदिवासी समाजात प्रचंड रोष निर्माण झाला.

सन १८९४ मध्ये बिहार राज्यात भीषण दुष्काळ पडला होता. या दुष्काळामध्ये उपासमारी व महामारीने अनेक लोक मृत पावले. त्यावेळी त्यांनी गरीब आदिवासी समाजाची नि:स्वार्थी अंत:करणाने सेवा केली. ब्रिटिश सरकारने आकारलेला अवाजवी शेतसारा माफ करून दुष्काळावर मात करण्याकरिता त्यांनी जनआंदोलन केले. हे आंदोलन जहागीरदार व जमीनदार यांच्या शोषणाविरुद्ध होते. त्यामुळे सामाजिक संतुलन बिघडून अशांतता निर्माण होत असल्यामुळे ब्रिटिशांनी जहागीरदार व जमीनदारांच्या माध्यमातून बिरसा मुंडा यांना रोखण्याचा प्रयत्न केला. १८९५ मध्ये बिरसा मुंडा यांना दोन वर्षाचा कारावास झाला. त्यांना हजारीबाग तुरुंगात पाठविले. त्यामुळे, सरकारविरुद्ध असंतोष वाढत गेला व ब्रिटिश सत्ता उखडून टाकण्याचा संकल्प त्यांनी केला. दोन वर्षाचा सश्रम कारावास उपभोगून परत आल्यानंतर आदिवासींच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी राजकीय स्वातंत्र्याची आवश्यकता त्यांनी ओळखली. त्यासाठी संपूर्ण आदिवासी समाजाला संघटित करण्यासाठी प्रयत्न करून त्यांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध स्वातंत्र्यलढा पुकारला.

सन १८९७ नंतर बिरसा मुंडा यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाने ब्रिटिश सरकारविरुद्ध अनेक लढाया करून त्यांना जेरीस आणले. त्यांनी पारंपरिक शस्त्रांद्वारे म्हणजे धनुष्यबाण, भाले इत्यादींच्या साहाय्याने डोंगराळ भागातून ब्रिटिशांवर हल्ले चढवले. ब्रिटिश सरकारकडे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे होती. तरीदेखील १८९८ मध्ये तांगा नदीच्या काठावर बिरसा मुंडा यांनी ब्रिटिश सैन्याला नामोहरम केले. नंतर अतिरिक्त कुमक आल्यामुळे ब्रिटिशांनी आदिवासी नेत्यांना रोखण्यात यश मिळवले. त्याप्रसंगी सुमारे ४०० आदिवासी शहीद झाले. यात बिरसा मुंडा यांचे योगदान मोठे होते. सन १९०० मध्ये बिरसा मुंडा डोमबाडी पहाडांमध्ये आदिवासी जनतेस मार्गदर्शन करीत असताना, ब्रिटिश सैन्याने हल्ला चढविला व त्या ठिकाणी भीषण लढाई झाली. त्यांना चक्रधरपूर येथे बंदी करून रांची कारागृहात त्यांची रवानगी करण्यात आली. त्याठिकाणी त्यांच्यावर अनन्वित अत्याचार करण्यात आले व त्याठिकाणी ९ जून,१९०० मध्ये त्यांचे निधन झाले.

आपल्या २५ वर्षाच्या अल्पजीवन कालावधीमध्ये त्यांनी आदिवासींमध्ये स्वदेशी व भारतीय संस्कृतीच्या प्रती जी प्रेरणा जागवली ती अतुलनीय आहे. आजसुद्धा झारखंड, बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश मधील आदिवासी समाज बिरसा मुंडा यांना आपले आद्य दैवत मानतो. बिरसा मुंडा यांनी त्रिस्तरीय पद्धतीने समाजाच्या उन्नतीसाठी कार्य केले. आदिवासी समाजाच्या शोषणाचे मूळ, परकीय राजकीय व्यवस्थेत असल्याची बाब बिरसा मुंडा यांनी ओळखून त्याविरुद्ध आदिवासी समाजास संघटित करून ब्रिटिश सत्तेविरुद्ध वेळोवेळी आंदोलन पुकारले. आदिवासी समाजाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी त्यांनी प्रचलित असलेल्या जमीनदारी व जहागीरदारी पद्धतीविरुद्ध लढा पुकारला.

कुठलाही समाज किंवा देश प्रबोधनाशिवाय खऱ्या अर्थाने प्रगत तसेच क्रियाशील होत नाही. याची जाणीव बिरसा मुंडा यांना त्या काळी होतीच. त्यामुळे शिक्षण, स्वच्छता आणि अंधश्रद्धा निर्मूलन यावर विशेष भर देऊन त्यांनी समाज प्रबोधन केले. याचाच परिणाम म्हणून आदिवासी जनजमातीने शिक्षण, स्वच्छता यांचा मोठ्या प्रमाणावर अंगीकार केला आहे.

✶✶

## आदिवासी विकासाच्या

# दिशा आणि वाटा



राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३,०७,७१३ चौ.कि.मी. एवढे असून त्यापैकी ५०,७५७ चौ.कि.मी. क्षेत्र आदिवासी उपयोजनेखाली येते. याचे प्रमाण १६.५ टक्के एवढे होते. राज्यात एकूण ४७ अनुसूचित जमाती आहेत. त्यात मुख्यत्वे भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली या प्रमुख आदिवासी जमाती आहेत. कोलाम (यवतमाळ जिल्हा), कातकरी (मुख्यत: रायगड व ठाणे जिल्हा) आणि माडिया गोंड (गडचिरोली जिल्हा) या केंद्र शासनाने आदिम जमाती म्हणुन अधिसूचित केलेल्या अशा तीन जमाती आहेत. राज्यात आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणात धुळे, नंदुरबार, जळगांव, नाशिक व ठाणे (सहयाद्री प्रदेश) चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती, व यवतमाळ (गोंडवन प्रदेश) या पूर्वेकडील वनाच्छादित जिल्हयांमध्ये आहे.

या सर्व अनुसूचित जमातीचा विकास करण्याकरिता आदिवासी विकास विभागामार्फत शिक्षण, उच्च शिक्षण, प्रशिक्षण, शिष्यवृत्ती, रोजगार/स्वयंरोजगार, वस्ती सुधार, शेतीपूरक उपक्रम अशा वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या अनेकविध योजना राबवल्या जातात. आदिवासी उपयोजना क्षेत्रात इतर विभागाच्या माध्यमातून वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या विविध योजना राबवल्या जातात. या सर्व योजनांद्वारे आदिवासी उपयोजना क्षेत्रात राहणाऱ्या आदिवासी व्यक्ती व आदिवासी उपयोजना क्षेत्राचा विकास करण्यात येतो. आदिवासी उपयोजना बाह्यक्षेत्रात मात्र केवळ व्यक्ती विकासाच्या तथा वैयक्तिक लाभाच्या योजना राबवण्यात येतात.

### शासकीय आश्रमशाळा

राज्यात डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या अनुसूचित जमातींची सामाजिक व शैक्षणिक प्रगती होण्यासाठी १९७२-७३ पासून क्षेत्रविकासाचा दृष्टिकोन स्वीकारण्यात आला. त्या अनुषंगाने शासकीय आश्रमशाळेत आदिवासी विद्यार्थ्यांची इयत्ता १० वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय करण्यात आली.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरूण पांघरूण, पुस्तके व इतर लेखन साहित्य इ. सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येतात.

**पात्रता :** विद्यार्थी हे आदिवासीच असावे, मुला-मुलीस ३१ जुलैला ५ वर्ष पूर्ण असावी, प्रत्यक्ष प्रवेश देतेवेळी जाती/जमातीचा दाखला, जन्मतारखेचा दाखला, आई-वडीलांचे प्रतिज्ञापत्र, पहिली व्यतिरिक्त इतर वर्गातील प्रवेशाकरिता पूर्वीच्या शाळेचा शाळा सोडल्याचा दाखला सादर करावा लागेल. आश्रमशाळेच्या १ कि.मी. परिसरातील मुले-मुली अनिवासी म्हणून व त्या क्षेत्राच्या बाहेरील निवासी विद्यार्थी म्हणून प्रवेश दिला जातो. आश्रमशाळेत प्रत्येक वर्गात निवासी ४० व बहिस्थ १० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. आश्रमशाळेमध्ये मुला-मुलींचे प्रमाण ५० : ५० प्रमाणे व ५० टक्के मुली मिळाल्या नाहीतर विद्यार्थीनींची क्षमता किमान ३३ टक्के आवश्यक आहे. जर ही टक्केवारी पूर्ण झाली नाही तर आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देवून क्षमता पूर्ण केली जाते. आश्रमशाळांमध्ये प्रत्येक वर्गात शारीरिकदृष्ट्या अपंग विद्यार्थ्यांसाठी ३ टक्के आरक्षण ठेवले जाते व दारिद्र्य रेषेखालील आदिवासी जमातीच्या भूमिहीन/अल्पभूधारक विद्यार्थ्यांना प्राधान्य.



**संपर्क:** संबंधित मुख्याध्यापक, शासकीय आश्रमशाळा.

**स्वेच्छा संस्थांच्या आश्रमशाळांना अर्थसाहाय्य**

आदिवासींच्या शैक्षणिक विकासाकरिता कार्यरत असलेल्या स्वेच्छा संस्थांमार्फत स्थापन करण्यात आलेल्या आश्रमशाळांना १९५३-५४ पासून अनुदान देण्यात येते.

या आश्रमशाळांत आदिवासी विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेष, शैक्षणिक साहित्य व इतर सवलती मोफत उपलब्ध करून देण्यात येतात.

**प्रवेशाच्या अटी:** शासकीय आश्रमशाळेत प्रवेशाकरिता असलेल्या सर्व अटी लागू.

**संपर्क :** संबंधित आश्रमशाळांचे मुख्याध्यापक / संस्था चालक.

**अनुदानित आश्रमशाळेच्या मान्यतेकरिता अटी**

१. संस्था नोंदणीकृत असली पाहिजे.

विहीत नमुन्यात आश्रमशाळा सुरू करण्याच्या ठिकाणाचे सर्वेक्षण, उपलब्ध विद्यार्थी संख्या, संस्थेची आर्थिक स्थिती, आदिवासी क्षेत्रातील कार्य इ. च्या माहितीसह अर्ज करणे आवश्यक.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

# समृद्धी, संपन्नता

**आदर्श आश्रमशाळा**

शासकीय / अनुदानित आश्रमशाळांतून शिक्षण घेणाऱ्या हुशार/प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्या निकेतनच्या धर्तीवर विशेष स्वरूपाची शाळा. राज्यात भंडारदरा व देवमोगरा या दोन ठिकाणी १९९०-९१ या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यास शासनाने मंजुरी दिली आहे. आदिवासी विद्यार्थ्यांची इ. ५ वी ते १० वी पर्यंतच्या शिक्षणाची सोय उपलब्ध आहे.

या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरूण पांघरूण, पुस्तके व लोकसंख्येच्या प्रमाणात केंद्र शासनाने राज्यासाठी ९ निवासी शाळा अनुज्ञेय ठरविल्या आहेत. त्यापैकी पहिल्या टप्प्यात सन २०००-२००१ या वर्षात अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर या प्रादेशिक कार्यक्षेत्रात प्रत्येकी एक याप्रमाणे एकलव्य निवासी शाळा कांबळगांव, ता. पालघर, जि. ठाणे., पेठरोड, नाशिक, ता. जि. नाशिक, चिखलदरा, जि. अमरावती, खैरीपरसोडा, ता. रामटेक, जि. नागपूर या ठिकाणी सुरू करण्यात आल्या. या एकलव्य निवासी शाळेत ६ वी ते १२ वीचे वर्ग सुरु आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, आंथरूण, पांघरूण, पुस्तके व इतर लेखन साहित्य इ. सुविधा शासनाकडून मोफत पुरवण्यात येतात.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**उच्च शिक्षण**

आदिवासी मुलां / मुलींकरिता शासकीय वसतिगृहे, अनुसूचित जमातीच्या मुलां / मुलींना उच्च शिक्षणाची सोय व्हावी व त्यांची शैक्षणिक उन्नती व्हावी या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. शासकीय

## इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण

अनुसूचित जमातीच्या २,५०० विद्यार्थ्यांना दरवर्षी जवळच्या शहरातील इंग्रजी माध्यमाच्या नामांकित निवासी शाळांमध्ये पहिलीपासून इयत्ता बारावीपर्यंत शिक्षण दिले जाते.

**अटी व शर्ती :** या योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा, विद्यार्थ्यांच्या पालकाने विद्यार्थ्यांच्या नावे सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या अनुसूचित जमातीच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे. या प्रतीची मूळ प्रमाणपत्रासोबत तपासणी करून ते सुयोग्य असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. जर विद्यार्थी दारिद्र्य रेषेखालील असेल तर त्यासंबंधीच्या यादीतील अनुक्रमांक नमूद करण्यात यावा, पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा १.०० लाख इतकी राहील, इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांची स्वतंत्र तुकडी न करता त्यांना इतर मुलांसोबत एकत्रित शिक्षण द्यावे, निवासाची व्यवस्था वेगवेगळी न करता इतर मुलांसोबत एकत्रित करण्यात येईल.




या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी नियमानुसार शालेय गणवेश, वह्या पुस्तके, बूटमोजे, रेनकोट, अंडर गारमेंटस, भोजन निवास खर्च, ट्यूशन फी, प्रवेश फी, सुरक्षा अनामत, शिक्षण शुल्क इत्यादीसाठी देय रक्कम शासनाकडून संबंधित नामांकित निवासी शाळेस देण्यात येईल. विद्यार्थी इयत्ता १२ वी उत्तीर्ण होईपर्यंत हे शुल्क देय राहील. मात्र विद्यार्थी दरवर्षी उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

इतर लेखन साहित्य इ. सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येतात.

**पात्रता :** इयत्ता ४ थी उत्तीर्ण विद्यार्थ्यामधून होणाऱ्या प्रवेश परीक्षेत यशस्वी झालेला आदिवासी विद्यार्थी.

**संपर्क:** स्पर्धा परीक्षेकरिता संबंधित शाळांचे मुख्याध्यापक, प्रकल्प अधिकारी, प्रवेशाकरिता संबंधित आदर्श आश्रमशाळेचे मुख्याध्यापक.

**एकलव्य निवासी शाळा**

राज्यातील अनुसूचित जमातीच्या आहेत.

**अटी व शर्ती :** आश्रमीय विद्यार्थी हे आदिवासीच असावे, शासकीय, अनुदानित आश्रमशाळा, जिल्हा परिषद शाळा इ. शाळांमध्ये इ. ४ थी ची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षा घेण्यात येईल. ही परीक्षा एप्रिल मे मध्ये संबंधित जिल्ह्यातील आदिवासी प्रकल्प क्षेत्रात घेण्यात येईल. स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यामधून गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो. या वसतिगृहात गुणवत्तेनुसार प्रवेश देऊन त्यांना निवास, भोजन, आंथरूण, पांघरूण, पाठ्यपुस्तके, शैक्षणिक व इतर आवश्यक साहित्य मोफत पुरविण्यात येते.

**पात्रता :** विद्यार्थी आदिवासी व महाराष्ट्राचा रहिवासी असावा, २. विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये २४,०००/- पेक्षा कमी असावे, विहीत नमुन्यात शाळा सोडल्याचा व प्रवेश घेतल्याचा दाखला, गुणपत्रिका, जातीचा, उत्पन्नाचा व वर्तणुकीचा दाखला आणि फोटोसह अर्ज मुदतीत सादर केला पाहिजे.

कनिष्ठ महाविद्यालयीन व उच्च महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी, टक्केवारी जिल्हा व

# सर्वांगीण विकास

तालुकास्तरावर खालीलप्रमाणे: कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणारे -२५% , उच्च महाविद्यालयात शिक्षण घेणारे - ६५% , माध्य.शिक्षण घेणारे -१०%

**विभागीय स्तरावर** : कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणारे २०% , उच्च महाविद्यालयात शिक्षण घेणारे ८०%

**संपर्क :** संबंधित वसतिगृहाचे गृहपाल.


**सैनिकीशाळा आणि विद्यावेतन**

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सैनिकी शाळांमध्ये शिक्षण मिळून पुढे राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीमध्ये प्रवेश मिळावा या हेतूने या योजनेंतर्गत विद्यावेतन दिले जाते. सैनिकी शाळेत शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न, भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्तीकरिता, निर्धारित केलेल्या उत्पन्नमर्यादेत असल्यास, अशा विद्यार्थ्यांना शिक्षणाचा संपूर्ण खर्च दिला जातो. शालेय शिक्षण विभागाने निर्धारित केल्यानुसार वार्षिक शुल्क रुपये १५,०००/- मंजूर करण्यात येते. ही योजना समाज कल्याण विभागाकडून राबवण्यात येत असून या अंतर्गत आदिवासी मुलांच्या शिक्षणावरील खर्चाची रक्कम समाज कल्याण विभागाकडे हस्तांतरित करण्यात येते.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्ती**

ही शिष्यवृत्ती देण्यामागचा उद्देश, शालांत परीक्षेनंतर किंवा माध्यमिक शाळेच्या पुढील अभ्यास करणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना, त्यांचे शिक्षण पूर्ण होण्यास साहाय्य करण्याकरिता आर्थिक मदत देणे हा आहे. जे विद्यार्थी कला/विज्ञान/ वाणिज्य या शाखेतील पदवीपूर्व/पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण किंवा अनुत्तीर्ण झाल्यावर मान्यताप्राप्त व्यावसायिक किंवा तांत्रिक प्रमाणपत्र / पदविका / पदवी अभ्यासक्रम सुरू करतात, ते जर इतर बाबतीत पात्र असतील तर त्यांना शिष्यवृत्ती देण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न विहित आर्थिक उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न असेल अशा विद्यार्थ्यांना या योजनेंतर्गत निर्वाह भत्ता दिला जात नाही. मात्र अशा विद्यार्थ्यांना शिक्षण फी व परीक्षा फी दिली जाते.




जे विद्यार्थी पूर्णवेळ सेवेत असतील तर ते शिष्यवृत्तीस पात्र ठरत नाहीत. पात्रतेकरिता उत्पन्नाच्या कमाल मर्यादेत सुधारणा करण्यात आली आहे. सध्या अस्तित्वात असलेली चालू मर्यादा आणि सुधारित मर्यादा खालीलप्रमाणे आहे-

आई / वडील / पालक यांची कमाल उत्पन्न मर्यादा प्रतिवर्ष सध्या १,०८,००० रुपये सुधारित १,४५,००० रुपये.

या योजनेंतर्गत शिक्षणशुल्क, परीक्षाशुल्क इ. शुल्कांचा समावेश आहे तसेच या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम गटवारीप्रमाणे निर्वाह भत्तादेखील अदा करण्यात येतो. दरमहा निर्वाह भत्ता दर पुढीलप्रमाणे आहेत.

वैद्यकिय / अभियांत्रिकी निवासी दर ७४० रुपये, अनिवासी दर ३३० रुपये, तांत्रिक / आयुर्वेदिक / होमीओपॅथिक आभियांत्रिकी प्रमाणपत्र, वास्तुकला, उपयोगिता शास्त्र प्रमाणपत्र निवासी दर ५१० रुपये, अनिवासी दर ३३० रुपये, पदवीचे सामान्य अभ्याक्रम द्वितीय वर्षापासून पुढे निवासी दर ३५५ रुपये, अनिवासी दर १८५, इयत्ता ११ वी १२ वी पदवीचे प्रथम वर्ष निवासी दर २३५ रुपये, अनिवासी दर १४० रुपये.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांने महाविद्यालयातून आवेदन पत्र घेऊन त्यासोबत आवश्यक ती प्रमाणपत्रे जोडून शैक्षणिक संस्थेस सादर करावयाची असतात. अशी प्राप्त झालेली आवेदनपत्रे संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांच्या कार्यालयाकडे पाठवितात. आवेदन पत्राच्या छाननीनंतर प्रकल्प अधिकारी हे शिष्यवृत्तीची रक्कम मंजूर करण्याची कार्यवाही करतात. मात्र विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये आणि शिष्यवृत्ती वेळेवर प्राप्त व्हावी यासाठी ही शिष्यवृत्ती विद्यार्थ्यांना मंजूर करण्याचे अधिकार शासकीय व अनुदानित मान्यताप्राप्त विद्यापीठ संलग्न उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय / महाविद्यालयाचे प्राचार्य यांना देण्यात आले आहेत.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**शिक्षणशुल्क, परीक्षाशुल्क योजना**

उत्पन्न मर्यादेमुळे भारत सरकार शिष्यवृत्तीसारख्या योजनांचा फायदा मिळू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता, शिक्षण विभागाने ठरवून दिलेल्या दराने मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणशुल्क व परीक्षाशुल्काची शिक्षण संस्थेस प्रतिभूती करण्यात येते.

**संपर्क :** इ.१ली ते इ.१०वी - शाळांच्या मुख्याध्यापकांमार्फत समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद आणि महाविद्यालयीन विद्यार्थी - प्राचार्यांमार्फत संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती**

वैद्यकीय शिक्षण व संलग्न शिक्षणाकरिता खाजगी शिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या

## परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती




शासनाने राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतलेल्या १० विद्यार्थ्यांना पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना २००५-२००६ या वर्षापासून मंजूर करण्यात आलेली आहे. या शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाची वार्षिक उत्पन्न मर्यादा जास्तीत जास्त रुपये ४.५० लक्षपर्यंत ठेवलेली आहे.

**लाभार्थी पुढीलप्रमाणे राहतील**

एम.बी.ए, लाभार्थी - २, वैद्यकीय अभ्यासक्रम, पदवी १ / पदव्युत्तर १, बी.टेक. (इंजिनिअरिंग) पदवी १/ पदव्युत्तर १, विज्ञान पदवी १/ पदव्युत्तर १, कृषी पदवी १, पदव्युत्तर १, इतर विषयांचे अभ्यासक्रम पदवी २, पदव्युत्तर २.

शिष्यवृत्तीसाठी प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी सचिव,आदिवासी विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती २००६-०७ पासून मंजूर करण्यात आली आहे. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क समिती, प्राधिकरण किंवा परिषदेने निर्धारित केलेल्या दराप्रमाणे शिक्षणशुल्क व परीक्षाशुल्कांची प्रतिपूर्ती करण्यात येते.

(व्यवस्थापन कोट्यामार्फत प्रवेशार्थी व अभिमत विद्यापीठात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लाभ देय राहणार नाही.)

**संपर्क** : संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**निर्वाह भत्ता**

व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणाऱ्या जादा खर्चाची तोंडमिळवणी करता यावी म्हणून निर्वाह भत्ता देण्याची योजना राबवण्यात येते.

४ ते ५ वर्षांच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रुपये ७०० दरमहा व वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रुपये १,०००/- दरमहा., २ ते ३ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रुपये ५०० दरमहा व वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रुपये ७,००/- दरमहा, २ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रुपये ५०० दरमहा व वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रुपये ५००/- दरमहा निर्वाह भत्ता दिला जातो.

**पात्रता** : विद्यार्थ्याने वैद्यकीय, अभियांत्रिकी, आयुर्वेद / होमिओपॅथी इत्यादी व्यावसायिक मान्यताप्राप्त अभ्यासक्रमात प्रवेश घेतलेला असावा, त्याची वर्तणूक, हजेरी व प्रगती समाधानकारक असावी, विहित प्रपत्रात जातीचे, नागरिकत्वाचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला इ. आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत अर्ज केलेला असावा.

**संपर्क** : संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यामार्फत प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.



## रोजगार व स्वयंरोजगार

**सैन्य तथा पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण**

राज्यात एकूण ९ ठिकाणी पोलीस तथा सैन्य दल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. आदिवासी प्रशिक्षणार्थींना जेवण, राहणे, गणवेश, खेळाचे साहित्य, बूटमोजे, अंथरूण, पांघरूण इत्यादी सुविधा मोफत पुरविल्या जातात.

सैन्य तथा पोलीस दल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्रातील एका प्रशिक्षण सत्राचा कालावधी ४ महिन्यांचा असून प्रथम सत्र एप्रिल ते जुलै, द्वितीय सत्र ऑगस्ट ते नोव्हेंबर व तृतीय सत्र डिसेंबर ते मार्च या कालावधीत आयोजित करण्यात येते. एका प्रशिक्षण सत्रात ५० युवक व युवतींना प्रशिक्षण देण्यात येते.

**पात्रता** : उमेदवाराचे वय १८ ते जास्तीत जास्त २६ वर्षे, शैक्षणिक पात्रता इयत्ता १२ वी पास, शारिरिक पात्रता युवक उंची १६५ सें.मि., छाती ७९ सें.मि., युवती उंची १५५ सें.मि.

**संपर्क** : संबंधित केंद्राचे प्रभारी प्रमुख व आपल्या प्रकल्प क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,

**नेतृत्व प्रशिक्षण व स्पर्धापूर्व प्रशिक्षण**

आदिवासी समाजाचे नेतृत्त्व करण्याकरिता, आवश्यक त्या बाबींचे प्रशिक्षण आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे येथे आयोजित करण्यात येते. त्याचप्रमाणे महाविद्यालयांत शिक्षण घेणाया / पूर्ण झालेल्या आदिवासी तरुणांकरिता विविध स्पर्धा परीक्षांची तयारी कशी करावी, त्याकरिता असलेला अभ्यासक्रम / स्पर्धा परीक्षांचे स्वरुप, स्पर्धा परीक्षांना आवश्यक असणाऱ्या पात्रता इत्यादींबाबत प्रशिक्षणाद्वारे माहिती देऊन त्यांना स्पर्धा परीक्षांकरिता तयार करणे हा या प्रशिक्षणाचा उद्देश. या योजनेंतर्गत मोफत निवास व भोजन पुरविण्यात येते व प्रशिक्षणाचा खर्च शासनाकडून करण्यात येतो.

**पात्रता** : प्रशिक्षणार्थीचे आवश्यक ते शिक्षण झालेले असावे, प्रशिक्षणार्थींचे नांव प्रकल्प अधिकाऱ्यांनी संस्थेकडे पाठविलेले असावे.

**संपर्क** : संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

**कौशल्य विकास**

कौशल्य विकास धोरणानुसार आदिवासी उमेदवारांना नामांकित प्रशिक्षण संस्थामार्फत

## मोटार वाहनचालक प्रशिक्षण योजना

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वाहन चालक संदर्भातील रिक्त पदांचा अनुशेष भरून निघावा व पर्यायाने अनुसूचित जमातीच्या युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने परिवहन महामंडळ व राज्य शासनाच्या संयुक्त विद्यमाने पांढरकवडा व गडचिरोली येथे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. मोटार वाहनचालक प्रशिक्षण सत्राचा कालावधी प्रथम सत्र एप्रिल ते सप्टेंबर व द्वितीय सत्र ऑक्टोबर ते मार्च या कालावधीत प्रशिक्षणार्थींना तांत्रिक, अतांत्रिक चालकविषयक बाबींवर प्रशिक्षण देण्यात येते. तसेच प्रशिक्षणार्थ्यांकडून, वाहन चालवण्याचा सराव करण्यात येतो.



**पात्रता** : २. वय २३ ते २५ वर्षे. उंची किमान १६३ सें.मी. शिक्षण ७ वी उत्तीर्ण, उमेदवार शारीरिक व मानसिकदृष्ट्या वाहनचालकाचे काम करण्यास सक्षम असावा. अवजड वाहन चालविण्याचा परवाना व कमीत कमी २ वर्षांचा अवजड वाहन चालविण्याचा अनुभव.

**संपर्क** : संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.



## संगणक प्रशिक्षण

आश्रमशाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावणाच्या दृष्टीने शासकीय आश्रमशाळांमध्ये संगणक कक्षाची निर्मिती करण्यात येऊन सन २००४-२००५ अखेरेपर्यंत ३१८ शासकीय आश्रमशाळांमध्ये संगणक पुरवठा करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने शासकीय आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी व शिक्षकांसाठी संगणक प्रशिक्षण देण्यास मंजुरी देण्यात आली आहे. संगणक पुरवण्यात आलेल्या शासकीय/माध्यमिक आश्रमशाळांमध्ये इ. ८ वी ते १२ वीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना व याच आश्रमशाळेतील ४ शिक्षक व १ मुख्याध्यापक आणि ३१ कनिष्ठ महाविद्यालयातील प्रत्येकी ७ शिक्षक यांना संगणक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. प्रशिक्षणाचा कालावधी ६ महिन्यांचा असून महिन्यातून कमीत कमी २० दिवस प्रशिक्षण द्यावयाचे आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांसाठी रु. २०-/ व शिक्षकांसाठी रु. २५/- प्रती महिना या प्रमाणे प्रशिक्षण शुल्क अनुज्ञेय आहे.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

# शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ

अनुसूचित जमातीच्या व्यक्तीच्या आर्थिक विकासासाठी व कल्याणासाठी स्वत:च्या जबाबदारीवर किंवा सरकार, संवैधानिक संस्था, कंपन्या, भागिदारी संस्था, व्यक्ती यांच्या सहयोगाने किंवा अशा संघटना, अभिकरणे यांच्यामार्फत कृषी उद्योग, लघु उद्योग, वाहतूक, वैद्यकीय, अभियांत्रिकी सारखा इतर धंदा/व्यवसाय, व्यापार किंवा कार्यालय यांच्या माध्यमातून योजना आखणे, प्रचलित करणे, मदत करणे, सल्ला देणे, साहाय्य करणे, वित्तीय साहाय्य देणे, संरक्षण देणे आणि विविध उपक्रम हाती घेणे, ही कामे महामंडळामार्फत केली जातात.

आर्थिक स्थिती/पद्धती आणि उत्पादन निर्मिती, व्यवस्थापन आणि विपणन यांच्या तंत्राचा विकास करण्यासाठी आणि त्यात सुधारणा करून अनुसूचित जमातीच्या व्यक्तीस समर्थ बनविण्यासाठी कामधंदा, व्यवसाय, व्यापार किंवा कार्य सुरू करण्यासाठी भांडवल कर्ज मिळविण्याची साधनसामग्री आणि तांत्रिक व्यवस्थापकीय साहाय्य देण्याची तरतूद हे महामंडळ करते.

**राज्यातील एकूण कार्यालये**

मुख्य व नोंदणीकृत कार्यालय, नाशिक, शाखा कार्यालय व त्यांच्या अधीनस्थ जिल्हे - नाशिक, जव्हार (जि.ठाणे) ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, मुंबई व उपनगरे, जुन्नर (जि.पुणे) पुणे, अहमदनगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, लातूर, उस्मानाबाद, बीड, नंदुरबार, धुळे, यावल (जि.जळगांव) जळगांव, औरंगाबाद, जालना, बुलढाणा, धारणी (जि.अमरावती), अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम, किनवट (जि.नांदेड) नांदेड, परभणी, हिंगोली, देवरी (जि.गोंदिया), भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा

**कर्जयोजनांसाठी अटी**

लाभार्थी अर्जदार आदिवासी समाजाचा असावा, लाभार्थीचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न दारिद्र्यरेषा उत्पन्न मर्यादेच्या दुप्पटीपेक्षा अधिक नसावे, ग्रामीण भागासाठी सध्या उत्पन्नाची मर्यादा रु. ८१,०००/- आहे. तर शहरी भागासाठी उत्पन्नाची मर्यादा रु. १,०४,०००/- एवढी आहे, लाभार्थीची वयोमर्यादा सर्व योजनांसाठी १८ वर्ष ते ४० वर्ष यादरम्यान असावी, आदिवासी महिला सशक्तीकरण योजनेखाली मंजूर झालेल्या कर्जासाठी जास्तीत जास्त रु.५०,०००/- पर्यंतच्या प्रकल्प योजना मंजूर करता येतात, महिला सशक्तीकरण योजनेसाठी लाभार्थ्यांकडून कोणताही वैयक्तिक सहभाग मार्जिन मनी अपेक्षित नाही.महिला सशक्तीकरण योजनेव्यतिरिक्त अन्य कर्ज योजनाखाली १०% मार्जिन मनी द्यावा लागतो, महिला सशक्तीकरण कर्जावर द.सा.द.शे.४% एवढया अल्प दराने सरळ व्याज आकारले जाते, अन्य रु.५ लक्ष रुपयाचे कर्जावर द.सा.द.शे.६% पर्यंत सरळ व्याज आकारले जाते. तर रु. ५ लक्षवरील कर्जास द.सा.द.शे.८% पर्यंत सरळ व्याज आकारणी केली जाते.

**पात्रता :**

- राष्ट्रीय अनुसूचित जमाती वित्त व विकास महामंडळ, नवी दिल्ली (एन.एस.टी.एफ.डी.सी.) - पुरस्कृत मुदत कर्ज योजना- एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा ७५%, शबरी महामंडळ मार्जिन कर्ज हिस्सा १५%, लाभार्थी वैयक्तिक सहभाग १०%

या योजनेंतर्गत प्रवासी वाहने, ट्रॅक्टर ट्रॉली, हेवी ट्रक, जनरल स्टोअर, मालवाहू रिक्षा, किराणा दुकान, दुग्धव्यवसाय, ढाबा, ऑटो वर्कशॉप, वीटभट्टी, मिनीट्रक लहान व मोठा, सिमेंट मिक्सर मशीन इत्यादींचा समावेश आहे.

प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगारक्षम करण्यात येते. या योजनेंतर्गत उत्पादन व प्रक्रिया, टेक्सटाइल्स, ॲग्रोप्रोसेसिंग, ॲटोमोबाइल्स, रिटेलमार्केटिंग, माहिती तंत्रज्ञान (आय.टी), हॉस्पिटॅलिटी, मनुष्यबळ विकास, आरोग्य संवर्धन, बांधकाम यामधील प्रशिक्षण देण्यात येते.

**पात्रता :** प्रशिक्षणार्थीचे आवश्यक ते शिक्षण झालेले असावे, इ. १० वी व १२ वी नापास उमेदवारांना विशेष प्राधान्य

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**सेवायोजन नोंदणी**

गरजू, सुशिक्षित अनुसूचित जमातीच्या उमेदवारांची नावे नोंदवून तो विविध भरती अधिकाऱ्यांकडे शिफारस करून पाठविणे व त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.




**अटी :** विहित नमुन्यात जन्मतारखेचा दाखला, शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र इत्यादी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज केला पाहिजे.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

❍ **एन.एस.टी.एफ.डी.सी.नवी दिल्ली पुरस्कृत महिला सशक्तीकरण योजना** : एन.एस.टी.एफ.डी.सी.कर्ज हिस्सा ८०%, शबरी महामंडळ मार्जिन कर्ज हिस्सा २०%, लाभार्थी वैयक्तिक सहभाग निरंक.

या योजनेंतर्गत दुग्ध व्यावयाय घरगुती खानावळ, एस.टी.डी. बूथ, पीठ गिरणी, वडापाव, फळे व भाजीपाला, चहा, थंड पेय इत्यादींचा समावेश आहे.

**राष्ट्रीयकृत बँक सहकार्याने कर्ज योजना :-**

**१)** रुपये ५०,०००/- पर्यंत प्रकल्प मर्यादा

राष्ट्रीयकृत बँक कर्ज हिस्सा ७५%, शबरी महामंडळ मार्जिन कर्ज हिस्सा २०%, लाभार्थी वैयक्तिक सहभाग ५%.

**२)** रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त प्रकल्प मर्यादा: राष्ट्रीयकृत बँक कर्ज हिस्सा ७५%, शबरी महामंडळ मार्जिन कर्ज हिस्सा १५%, लाभार्थी वैयक्तिक सहभाग १०%.

या योजनेंतर्गत लाभार्थींच्या निवडीनुसार व बँकेच्या सहमतीने कर्ज योजना देण्यात येते.

**शबरी महामंडळ स्वनिधी**

या योजनेखाली ग्रामीण/शहरी आदिवासी होतकरू व्यवसाय इच्छुकास विविध व्यवसायाकरीता रु.२५०००/- कर्ज ४% द.सा.द.शे व्याजाने उपलब्ध करून दिले जाते. या योजनेखाली लाभार्थी सहभाग निरंक आहे. या कर्ज योजनांचा परजफेड कालावधी हा तीन वर्षाचा आहे.

**संपर्क :** संबंधित शाखा व्यवस्थापक, शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळ शाखा कार्यालय

**शिष्यवृत्ती** : अपंग विद्यार्थ्यांस शिष्यवृत्ती व वाहतूक भत्ता.

२००३-२००४ या शैक्षणिक वर्षापासून अनुसूचित जमातीच्या इयत्ता ८ वी ते १२ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ५००/- या दराने शिष्यवृत्ती व शाळेत जाण्यायेण्याकरिता रुपये १००/- प्रमाणे वाहतूक भत्ता दिला जातो.

**संपर्क** : संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना विद्यावेतन**

औद्योगिक प्रशिक्षण घेण्यास आदिवासी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने ही योजना राबवण्यात येते. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. १२०००/- पेक्षा कमी आहे, अशा अनिवासी विद्यार्थ्यांना दरमहा रु. ६०/- संस्थेतील निवासी विद्यार्थ्यांना दरमहा रु. १००/- दराने विद्यावेतन देण्यात

## सबळीकरण व स्वाभिमान योजना

दारिद्रय रेषेखालील भूमिहीन कुटुंबाना उदरनिर्वाहाचे साधन नसल्यामुळे रोजगार हमी योजना किंवा खाजगी व्यक्तीकडे मजुरी करावी लागते. त्यांचे मजुरीवरील अवलंबित्व कमी व्हावे व त्यांना कायमस्वरूपी उत्पन्नाचे साधन प्राप्त व्हावे, यासाठी ही योजना राबवण्यात येते. यामुळे रोजगारानिमित्त होणारे परराज्यातील स्थलांतर कमी होईल.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीमार्फत प्रस्ताव परिपूर्ण महसुली दस्तऐवजासह प्रस्ताव संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी तयार करून अपर आयुक्त, आदिवासी विकास यांच्या मान्यतेसाठी सादर करावा लागेल. लाभार्थींची निवड समितीच्या बैठकीत चिठ्ठीद्वारे केली जाईल.

खरेदी करावयाची जमीन शेतीयोग्य असल्याबाबत कृषी विभागाचे अभिप्राय असणे आवश्यक आहे, जमिनीची विक्री अथवा हस्तांतरण करता येणार नाही. लाभार्थी कुटुंबास देण्यात येणारे कर्ज बिनव्याजी व १० वर्षे मुदतीकरिता मिळेल. कर्जफेडीची सुरुवात कर्ज मंजुरीनंतर (२ वर्षानंतर) सुरु केली जाईल. या योजनेंतर्गत ५० टक्के अनुदान व ५० टक्के बिनव्याज कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध करून दिला जाईल. १ जानेवारी २००० रोजी भूमिहीन असणारा आदिवासी लाभ घेण्यास पात्र ठरेल. भूमिहीन कुटुंबास ४ एकर कोरडवाहू व २ एकर ओलिताखाली जमीन जास्तीत जास्त २० गुंठेपर्यंत जमीन वाटप करता येईल. जमिनीच्या किंमतीत २० टक्केपर्यंत वाढ करण्याचे अधिकार समितीस राहतील. जमिनीची विक्री अथवा हस्तांतरण करता येणार नाही. खरेदी करण्यात येणारी जमीन पती/पत्नीच्या नांवाने खरेदी करावी लागेल. जमीन स्वत: कसणे आवश्यक आहे. आदिम जमाती / विधवा स्त्रिया परित्यक्ता स्त्रियांना प्रथम प्राधान्य दिले जाईल.




पात्रता : अर्जदाराचे वय २५ ते ६० इतके असावे व तो भूमिहीन असावा, अर्जदार हा दारिद्रयरेषेखालील असावा.

**संपर्क :** प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

येते.

**संपर्क** : संबंधित प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था.

**आदिवासी वस्ती सुधार कार्यक्रम**

ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम

आदिवासी उपयोजना बाह्य भागामध्ये ज्या ठिकाणी मोठ्या संख्येने आदिवासींचे वास्तव्य आहे, तेथे शासनाच्या सध्याच्या धोरणानुसार पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी, आदिवासी उपयोजनेच्या निधीमधून तरतूद उपलब्ध करून देण्यास प्रतिबंध आहे. यामुळे अशा भागांचा विकास इतर भागांच्या तुलनेने कमी प्रमाणात होत आहे किंवा अशा वस्त्या दुर्लक्षित राहिलेल्या आहेत.

आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेरील ज्या वस्त्यांमध्ये / गांवामध्ये ५० टक्क्यांच्या आसपास आदिवासी लोकसंख्या आहे. परंतु त्यांचा माडा / मिनीमाडा पॉकेटमध्ये समावेश झालेला नाही, अशा गांवांच्या मूलभूत सुविधा विकासासाठी ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम २००४-०५ सालापासून राबवण्यात येत आहे.

२६ जून २००७ च्या शासन निर्णयानुसार ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा विस्तारित कार्यक्रम ग्रामीण/नागरी भागातील अनुसूचित आदिवासी क्षेत्र, अतिरिक्त आदिवासी क्षेत्र, माडा / मिनीमाडा क्षेत्र, प्रस्तावित माडा / मिनीमाडा क्षेत्र, तसेच आदिवासी उपयोजनाबाह्य क्षेत्रातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त आदिवासींची लोकसंख्या असलेल्या वस्त्या/पाडे / वाड्या / गावांच्या महानगरपालिका, नगरपरिषदेचे प्रभाव, तेथील विकासासाठी आवश्यक असलेल्या सामूहिक विकासाच्या सुविधा पुरविण्याची योजना राबवण्याचे धोरण लागू झाले आहे.

**घटक कार्यक्रम** : या योजनेंतर्गत मुख्य वस्तीपासून जोडरस्ते, सिमेंट कॉंक्रिट/डांबरीकरणाचे अंतर्गत रस्ते, शाळेचे कंपाऊड, पिण्याच्या शुद्ध पाण्याची सोय करणे, जुन्या विहिरीची दुरुस्ती, बंद गटार बांधणे, आदिवासी वस्तीचे विद्युतीकरण, समाजमंदिर, सार्वजनिक शौचालय, स्मशानभूमी बांधकाम, नदीकाठ संरक्षण भिंत, घाट बांधकाम, नदीकाठची संरक्षण भिंत, तीर्थक्षेत्र व पर्यटन विकास, ग्रामपंचायत कार्यालय/ग्रामसचिवालय इ. कामे घेता येतात.

**संपर्क** : संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

## शेतीपूरक योजना

**शेतकऱ्यांना वीजपंप/तेलपंप पुरवठा,**

आदिवासी शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर वीजपंप / तेलपंप पुरवण्याची योजना राबवण्यात येत आहे. या योजनेखाली सर्वसाधारणपणे ३ किंवा ५ अश्वशक्तीचे वीजपंप / तेलपंप मंजूर करण्यात येतात. आदिवासी उपयोजना क्षेत्र व क्षेत्राबाहेरील ज्या आदिवासी शेतकऱ्यांकडे किमान ६० आर (दीड एकर) आणि कमाल ६ हेक्टर ४० आर (१६ एकर) इतकी लागवडीयोग्य जमीन उपलब्ध आहे. असे शेतकरी या योजनेचा लाभ घेवू शकतात.



**पात्रता** : वीजपंप मंजूर करतांना शेतकऱ्यांच्या शेतातील पाण्याचे साधन असलेल्या विहिर / नाल्यास कमीत कमी सहा महिने पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. आदिवासी शेतकरी स्वत: जमीन कसत असला पाहिजे. ६० आरपेक्षा कमी जमीन ज्यांच्या नावाने असेल अशा किंवा ३ लगतच्या जमीनधारकांनी एकत्रित येऊन करार लिहून दिला तर एकापेक्षा अधिक लाभधारक एकत्रितपणे या योजनेचा लाभ घेऊ शकतील. मात्र अशा एकत्रित आलेल्या शेतकऱ्यांची एकूण जमीन ६० आरपेक्षा जास्त असली पाहिजे. या योजनेखाली ज्या गावात/शेतात वीजपुरवठा केला जाऊ शकतो त्या गावच्या शेतकऱ्यास वीजपंप व जेथे वीजपुरवठा केला जात नाही अथवा नजीकच्या ३ वर्षात केला जाण्याची शक्यता नाही अशा ठिकाणी तेलपंप पुरवण्यात येतात.

**संपर्क** : संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आणि प्रादेशिक व्यवस्थापक / उपप्रादेशिक व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ.

**पी.व्ही.सी. पाईपचा पुरवठा**

ही योजना १०० टक्के अनुदानावर वीजपंप व तेलपंप या योजनेशी संलग्न आहे. दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांना पी.व्ही. सी. पाईपचा पुरवठा केला जातो. बायफ संस्थेमार्फत राबवण्यात येणाऱ्या प्रकल्पासाठी ज्या गावाची निवड करण्यात आली आहे, त्या क्षेत्रामध्ये योजनेचा लाभ दिला जातो. नाशिक, ठाणे, गडचिरोली जिल्ह्यातील ३० टक्के लाभार्थी आदिम जमातींमधून, नंदुरबार जिल्ह्यातील ३० टक्के लाभार्थी वनग्रामातून व अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुक्यातील कोरकू जमातीच्या लाभार्थींची निवड केली जाते. एका लाभार्थीस २.५ इंचाच्या ८ पी.व्ही.सी. पाईपचा पुरवठा केला जातो. आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप मंजूर करताना त्यांच्या शेतातील पाण्याचे साधन असलेल्या विहीर/नाल्यास कमीत कमी सहा महिने पाणी उपलब्ध असणे आवश्यक आहे. ६० आरपेक्षा कमी जमीन ज्यांच्या नावाने असेल अशा किंवा ३ लगतच्या जमीनधारकांना एकत्र येऊन करार लिहून दिला तर एकापेक्षा अधिक लाभधारक एकत्रितपणे या योजनेचा लाभ घेऊ शकतील.

**पात्रता** : राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्र व क्षेत्राबाहेरील ज्या आदिवासी शेतकऱ्यांकडे किमान ६० आर (दीड एकर) आणि कमाल ६ हे.४० आर (१६ एकर) इतकी लागवडीयोग्य जमीन उपलब्ध आहे, असे शेतकरी या योजनेचा लाभ घेऊ शकतात.

**संपर्क** : प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**प्रोत्साहनपर योजना**

**सामाजिक कार्यकर्ते/संस्था यांना पुरस्कार**

आदिवासी क्षेत्रात आदिवासींच्या विकासाकरिता उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थांची निवड पुरस्कारासाठी केली जाते. आदिवासी सेवक/आदिवासी सेवा संस्था पुरस्कार देण्याची योजना १९८५ पासून कार्यान्वित करण्यात आली. हा पुरस्कार,

प्रतिवर्षी ठक्करबाप्पा यांच्या जयंतीदिनी (२९ नोव्हेंबर) निवड झालेल्या व्यक्ती/संस्थांना देण्यात येतो.

**पुरस्काराचे स्वरूप :** आदिवासी सेवक रु.१०,००१/- रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, प्रशस्तिपत्रक व सत्कार, सेवा संस्था रु.२५,००१/- रोख, स्मृतिचिन्ह, प्रशस्तिपत्रक व संस्थेच्या प्रमुखाचा सत्कार.

**पात्रता :** अर्जदाराचे वय ४५ वर्षांपेक्षा जास्त असावे, अर्जदार खासदार / आमदार / जिल्हा परिषद अध्यक्ष अथवा कोणत्याही अधिकारपदावर नसावा, अर्जदार / स्वयंसेवी संस्था राजकारणापासून अलिप्त असावा, अर्जदार व्यक्ती व संस्था यांच्याविरुध्द फौजदारी स्वरूपाचे गुन्हे नोंदविलेले नसावेत किंवा शिक्षा झालेली नसावी, पुरस्कार्थींनी आदिवासी संस्कृती, संवर्धन, शिक्षण, अत्याचार निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन इ. प्रकारच्या क्षेत्रात आदिवासींच्या विकासाकरिता किमान १० वर्षे विशेष भरीव कार्य केलेले असावे, अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज त्यांनी केलेल्या कार्याबद्दलच्या माहितीसह (संस्थांच्या बाबतीत संस्था पब्लिक ट्रस्ट / सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टखाली पंजीबध्द असल्याबाबतची प्रमाणपत्रे, घटनेची प्रत व मागील ५ वर्षांचे अहवाल) पाठविणे आवश्यक.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प. व जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.,

**आश्रमशाळांना विशेष प्रोत्साहनपर बक्षीस**

शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या कामकाजात कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढीस लागावा याकरिता आश्रमशाळांमध्ये स्पर्धा निर्माण व्हावी म्हणून चांगल्या तीन आश्रमशाळांना प्रथम, द्वितीय, तृतीय बक्षीस देण्याची योजना २००३-२००४ पासून राबवण्यात येत आहे. प्रथम पारितोषिक रु. पाच लाख, द्वितीय पारितोषिक रुपये तीन लक्ष व तृतीय पारितोषिक रु. दोन लक्ष देण्यात येते.

**अटी :** आश्रमशाळांचा गेल्या तीन वर्षाचा शालांत परिक्षेचा निकाल किमान ९० टक्के असावा. न्यायालयीन/फौजदारी कारवाई संस्था/शाळेच्या विरुध्द झालेली वा प्रस्तावित नसावी. गेल्या तीन वर्षाची मुलांची उपस्थिती ९० टक्के असावी. पिण्याचे पाणी, शौचालय, स्नानगृहे, क्रीडांगण, शाळेची पक्की इमारत, स्वयंपाकगृह, फर्निचर, अंथरूण, पांघरूण, खेळाचे साहित्य इत्यादी सुविधा शाळेत उपलब्ध असाव्यात. मुलांचे जेवण, नाश्ता वगैरे वेळच्या वेळी दिले गेले पाहिजे. वृक्ष लागवड कार्यक्रम यशस्वीरीत्या राबवलेले असावेत. मुलांमध्ये नैतिक शिक्षण, सर्वांगीण विकास, शाळेचे सामाजिक कार्य, जवळच्या गावांना विकासप्रक्रियेत शाळेचा सहभाग आणि मुला - मुलींचे लैंगिक, शारीरिक, मानसिक शोषण केल्याच्या तक्रारी नसाव्यात.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**विशेष प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी बक्षिसे**

आदिवासी शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील इयत्ता १० वी व १२ वी मधील शालांत व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत विशेष गुणांसह प्रावीण्य मिळविणाऱ्या

## आदिवासी हस्तकला प्रदर्शन






आदिवासींनी तयार केलेल्या वस्तू नागरी भागात प्रदर्शित करून त्यांच्या विक्रीद्वारे या कलाकारांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

या योजनेंतर्गत प्रदर्शनात भाग घेणाऱ्या आदिवासी हस्तकलाकारांना जाण्या-येण्याचा खर्च, प्रदर्शन काळातील भत्ता, त्यांनी तयार केलेल्या वस्तूंचा प्रदर्शन स्थळापर्यंतच्या वाहतुकीचा खर्च अर्थसाहाय्याच्या स्वरूपात देण्यात येतो. त्याचप्रमाणे प्रदर्शनाच्या व्यवस्थापनाचा संपूर्ण खर्च शासनाकडून करण्यात येतो.

**पात्रता:** हस्तकलाकार आदिवासी असला पाहिजे, त्याने प्रदर्शनात भाग घेण्याची तयारी दाखविली पाहिजे.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

## वारली चित्रकला स्पर्धा योजना

ठाणे जिल्ह्यातील वारली चित्रकलेचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने प्रौढ गट व शालेय गट असे दोन करून दरवर्षी स्पर्धा घेण्यात येतात व त्यातील गुणवत्तेनुसार येणाऱ्या पहिल्या ३१ निवडक चित्रांना बक्षिसे देण्यात येतात.

**पात्रता :** स्पर्धेत भाग घेणाऱ्या स्पर्धकास वारली चित्रकला येत असावी.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प व आयुक्त आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे.

## आदिवासी पारंपरिक नृत्यस्पर्धा



आदिवासी जमातीनुरूप नृत्यांचे विविध प्रकार अस्तित्वात आहेत. या नृत्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने ही योजना तयार करण्यात आली आहे. या योजनेत विविध जमातींच्या नृत्यपथकांच्या स्पर्धा घेण्यात येतात. या स्पर्धेकरिता कलाकारांना त्यांच्या गावापासून स्पर्धेच्या गावापर्यंत जाण्या-येण्याचा खर्च, हजेरी भत्ता, तसेच पारंपरिक वेषभूषा व वाद्यांसाठी अनुदान देण्यात येते. स्पर्धा आयोजनाचा खर्चही शासनाकडून केला जातो.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

विद्यार्थ्यांसाठी बक्षीसपर योजना २००३-०४ पासून सुरू करण्यात आली आहे.

आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या शासकीय व अनुदानित आश्रमशाळांतील ८ विभागीय शिक्षण मंडळातून राज्यात प्रथम आलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत प्रथम ३ मुले व ३ मुली याप्रमाणे १२ विद्यार्थ्यांना पुढीलप्रमाणे बक्षीस देण्यात येते. प्रथम क्र. रु. ३५,०००/- द्वितीय क्र. रु. २५,०००/- व तृतीय क्र.१५,०००/- दरमहा रुपये १०००/- प्रमाणे प्रावीण्य अनुदान देण्यात येते.

प्रत्येक विभागीय शिक्षण मंडळामधून प्रथम येणाऱ्या ३ मुले व ३ मुली (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांचेसाठी प्रोत्साहनपर बक्षीस प्रथम क्रमांक रु. २५,०००/- द्वितीय क्रमांक रु. १५,०००/- व तृतीय क्रमांक रु. १०,०००/- देण्यात येणार आहे. दरमहा रु. १०००/- प्रमाणे १० महिन्यांसाठी प्रावीण्य अनुदान प्रत्येक विद्यार्थ्यांस देण्यात येते.

**संपर्क :** संबंधित क्षेत्राचे प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

**सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना**

अनुसूचित जमातीच्या १ ली ते १० वीमध्ये आश्रमशाळेव्यतिरिक्त शिक्षण घेत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्सहित करणे. या अनुषंगाने शैक्षणिक व इतर किरकोळ खर्च भागवण्यासाठी केरळ व राजस्थान राज्याच्या धर्तीवर पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती देणे.

**या योजनेंतर्गत पुढीलप्रमाणे शिष्यवृत्ती मिळते** - इयत्ता इ. १ ली ते इ. ४ थी शिष्यवृत्ती रुपये १०००/, इ. ५ वी ते इ. ७ वी शिष्यवृत्ती रुपये १,५००/-, इ. ८ वी ते इ. १० वी शिष्यवृत्ती रुपये २,०००/-

**अटी :** ज्या विद्यार्थ्यांचे पालक शासकीय, निमशासकीय (केंद्र व राज्य शासन) व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (केंद्र व राज्याच्या) तसेच शासन अनुदानित संस्थांमध्ये सेवा करीत आहेत. तसेच ज्यांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. १.०८ लाख किंवा त्यापेक्षा जास्त आहे, अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळणार नाही. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांची उपस्थिती प्रतिमाह ८० टक्के असणे आवश्यक राहील. शासकीय, अनुदानित आश्रमशाळा, नामांकित शाळांमध्ये, सैनिकी शाळांमध्ये, इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या, ज्यामध्ये शासनाकडून त्यांच्या शिक्षणाचा खर्च अदा करण्यात येतो, अशा अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.

## नवसंजीवन योजना

आदिवासींच्या आरोग्यात सुधारणा करणे व प्राधान्याने आरोग्यविषयक सोई पुरविणे, विविध रोजगार कार्यक्रमांतर्गत वर्षभर पुरेल एवढा रोजगार उपलब्ध करून देणे, आदिवासींना पिण्याचे शुद्ध व पुरेसे पाणी उपलब्ध करून देणे, अन्नधान्य पुरवठा सुनिश्चित करून पूरक आहार देणे, विविध उपयोजनांद्वारे आदिवासींचे क्रियाशील आयुष्य वाढविणे

आदिवासी उपयोजना क्षेत्राचा बहुसंख्य भाग दुर्गम व अतिदुर्गम आहे. परिणामी शैक्षणिक सोई, पौष्टिक आहाराचा पुरवठा, आरोग्यसेवा, रोजगार इ. संदर्भात अनेक समस्यांना सातत्याने तोंड द्यावे लागते. विशेषत: उन्हाळा व पावसाळ्यात उद्‌भवणाऱ्या समस्यांना तोंड देण्याकरिता, १५ जिल्ह्यांमध्ये शासनामार्फत राबवण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणीत एकसूत्रीपणा व प्रभावीपणा येण्याकरिता सर्व घटक कार्यक्रमांना एकत्र आणले. हा एकत्रित उपक्रम नवसंजीवन योजना या नावाने २२ जून १९९५ अन्वये अमलात आणलेला आहे. या योजनेबाबत मुख्य अंमलबजावणी अधिकारी म्हणून नवसंजीवन योजना क्षेत्रातील जिल्हाधिकारी यांना घोषित केलेले आहे. ते जिल्ह्यातील इतर सबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यावर सनियंत्रण ठेवतील. त्याचप्रमाणे नवसंजीवन योजनेंतर्गत समाविष्ट असलेल्या घटक योजनांची अंमलबजावणी, संनियंत्रण व आढावा घेण्याकरिता उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली. मुख्य सचिव हे या समितीचे अध्यक्ष आहेत. या कार्यक्रमांतर्गत पावसाळ्यापूर्वी उपाययोजना करणे अपेक्षित आहे.



**नवसंजीवन योजना राबवणारे विभाग**

**महसूल विभाग** : रोजगार हमी योजना, जवाहर रोजगार योजना, आश्वासित रोजगार योजना, स्वस्त धान्य दुकानांमार्फत शिधावाटप, बळकटीकृत सार्वजनिक वितरण व्यवस्था, पर्जन्यपूर्व साठा द्वार वितरण व्यवस्था

**आरोग्य विभाग :** प्राथमिक आरोग्य सेवा पुरविणे, शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा


**महिला व बालकल्याण विभाग** : एकात्मिक बालविकास योजना,

**ग्रामविकास विभाग** : शालेय पोषण आहार योजना, धान्य पुरवठा


**आदिवासी विकास विभाग** : खावटी कर्ज योजना, धान्यकोष योजना

**पावसाळ्यापूर्वी करावयाच्या उपाययोजना**

**पोषण :-** पोषणांतर्गत आवश्यक असणारा पोषण आहार संपर्क तुटणाऱ्या गावांमध्ये/ पाड्यांमध्ये पोहचविणे, अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना आरोग्य व पोषण आहाराची निगा राखण्याचे प्रशिक्षण देणे, पावसाळ्यापूर्वी ग्रेड ३ व ग्रेड ४ च्या बालकांचे, गरोदर मातांचे सर्वेक्षण करणे, त्याकरिता योग्य आहार/पोषण कार्यक्रम ठरवून त्याची अंमलबजावणी करणे त्या अनुषंगाने पोषण आहार कार्यक्रमात खंड पडणार नाही यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क ठेवणे इत्यादी बाबींकडे लक्ष पुरविणे आवश्यक आहे.




**खावटी कर्ज योजना :** आदिवासींना कर्ज



**शुद्ध पाणीपुरवठा :** पावसाळ्यात साथीचे आजार बळावू नयेत म्हणून शुद्ध पाणीपुरवठा करण्यासाठी आदिवासी पाड्यांवर/गावांमध्ये टी.सी.एल पावडर ब्लिचींग पावडर इत्यादींचे साठे योग्य प्रमाणात उपलब्ध करून दिले जातील. संबंधित क्षेत्रात उपलब्ध असणारे पाण्याचे स्रोत, विहिरी, तलाव व बोडी, इत्यादींमार्फत शुद्ध पाणीपुरवठा होण्याबाबत योग्य ती कार्यवाही केली जाईल.

पावसाळ्यात दळणवळणाचे जाळे सुधारण्यात येऊन बळकट करण्यात येईल. दुर्गम क्षेत्रांना जोडण्यात येणारे रस्ते नादुरुस्त असतील तर तात्काळ दुरुस्तीच्या कार्यवाहीची पावले उचलावीत. एखाद्या गावाचा संपर्क तुटला असेल तर तेथील भागात संपर्क साधण्यासाठी पोलिसांच्या बिनतारी संदेश यंत्रणेचा वापर करण्यात येईल. ग्रामपंचायती, पंचायतराज तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांना साथीच्या रोगाचे प्रादुर्भाव व सुविधांच्या तुटवड्याबाबत जागरूकतेने सतत माहिती दिली जाईल.

**संपर्क :** संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.

मिळणे सुलभ व्हावे यासाठी खावटी कर्ज देण्याची योजना राबवण्यात येते. ही योजना राबवण्याकरिता आदिवासी विकास महामंडळास प्रमुख अभिकर्ता म्हणून नेमण्यात आले आहे.

### आरोग्य

**करावयाची कामे :** आरोग्यविषयक बाबी हाताळताना जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांनी पावसाळ्यातील चार महिन्यातील कामांचे नियोजन करावे. रिक्त पदे तातडीने भरण्याची दक्षता घ्यावी. या क्षेत्रातील आरोग्य अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रतिनियुक्तीवर अन्यत्र नियुक्त करण्यात येऊ नये. पाडा स्वयंसेवकांची नियुक्ती, गर्भवती मातांची तपासणी, कुपोषणातील तिसऱ्या व चौथ्या स्तरांमधील बालकांचे सर्वेक्षण करून आजारी बालकांना रुग्णालयात अथवा प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्याची व्यवस्था, पावसाळ्याच्या कालावधीत आवश्यक असणारा औषधांचा साठा प्राथमिक आरोग्य केंद्रात/उपकेंद्रात उपलब्ध ठेवावा. बंद असलेल्या वाहनांचा आढावा घेऊन त्या अनुषंगाने वाहन व्यवस्था अद्ययावत ठेवावी. आदिवासी उपयोजना क्षेत्रात दुर्गम भागात वैद्यकीय सेवा वेळेवर उपलब्ध होण्याकरिता पाडा स्वयंसेवकांची नियुक्ती केली जावी. तसेच सर्व ग्रेड ३ व ग्रेड ४ च्या बालकांची महिन्यातून किमान एकदा आरोग्य तपासणी बालरोग तज्ज्ञांकडून केली जावी. इतर बालकांची तीन महिन्यांतून किमान एकदा आरोग्य तपासणी करावी.

### सार्वजनिक वितरण व्यवस्था

पावसाळ्यापूर्वी आवश्यक धान्याचा साठा सर्व स्वस्त धान्य दुकानांमध्ये उपलब्ध करून देण्यात येईल.

**रोजगार :** पावसाळ्याच्या काळात रोजगार मिळवून देण्यासाठी घरगुती स्वरूपाचे उद्योग हाती घेतले जातील. वन विभागाच्या ग्रामोद्योग व केंद्रशासनाच्या रोजगार विषयक कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जाईल.

## इतर विभागाची आदिवासी उपयोजना

### नवसंजीवन योजनेंतर्गत येणारे १५ जिल्हे

(व्याप्ती आदिवासी उपयोजना, अतिरिक्त उपयोजना, माडा व मिनी माडा क्षेत्र ) - १) नाशिक, २) नंदुरबार, ३) धुळे, ४) जळगांव, ५) अहमदनगर, ६) ठाणे, ७) रायगड, ८) पुणे, ९) अमरावती, १०) यवतमाळ, ११) नांदेड, १२) नागपूर, १३) चंद्रपूर, १४) गोंदिया, १५) गडचिरोली.

**पीकसंवर्धन :** कृषी विभागामार्फत

आदिवासी उपयोजनेखाली, आदिवासी उपयोजनाबाहेरील व माडाक्षेत्रात प्रामुख्याने आदिवासी उपयोजनेखालील ठाणे, रायगड, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, अहमदनगर, पुणे, नांदेड, नागपूर, यवतमाळ, अमरावती, भंडारा, गोदिंया, चंद्रपूर व गडचिरोली या १६ जिल्ह्यात योजना राबवण्यात येते. या योजनेंतर्गत आदिवासी कुटुंबांना विविध बाबींसाठी पुढीलप्रमाणे अर्थसाहाय्य देण्यात येते.

**कमाल अनुदान :** जमीन विकास कामे : ११,००० रुपये, निविष्ठाचे वाटप: १,५०० रुपये, रोपसंरक्षक साधने आणि सुधारित शेती अवजारे : ६,००० रुपये, जुन्या विहिरींची दुरुस्ती : ४,००० रुपये, बैल जोडीचा पुरवठा: ३,५०० रुपये, बैल गाड्यांचा पुरवठा: २,७०० रुपये, ३०० मीटर पाईपलाइन : ८,००० रुपये, नलिका विहिरी : ८,००० रुपये, पंपसंच : १०,००० रुपये, नवीन विहिरी : ६१,५०० रुपये, पुष्पोत्पादन विकास कार्यक्रम : २,००० रुपये, परसबाग २०० रुपये, ताडपत्री पुरवठा: १०,००० रुपये, तारेचे कुंपण : १५,००० रुपये, धान्यकोठी (केंद्र शासनाच्या धान्य वाचवा योजनेनुसार): १५,००० रुपये, तुषार/ठिंबक सिंचन संच पुरवठा : २५,००० रुपये.

**फलोत्पादन :** फलोत्पादन रोप संरक्षण व बागायती रोपमळ्यांची स्थापना / बळकटीकरण या कार्यक्रमाद्वारे लहान व सीमांकित आदिवासी शेतकऱ्यांना या योजनेद्वारे १०० टक्के अनुदान देण्यात येते.

**मृद व जलसंधारण :** पाणवहाळ विकास कार्यक्रमाखाली पुढील कामे हाती घेण्यात येतात. - **समतल/श्रेणीबध्द बांध:** झाडाझुडुंपाचे बांधासह, बांधबंदिस्ती, समतल व्हेजिटेटिव्ह की लाइन्स, नालाबांध, ब्रशवूड धरणे, झाडाझुडूपांच्या बांधासह मातीचे बांधकाम, सुट्यासुट्या धोंड्यानी केलेले बांधकाम, अपवाहन बंधारे, वळणावरील बंधारे, भूमिगत बंधारे, लाईव्ह चेक धरणे, शेतातले तळे

**पशुसंवर्धन :** पुढील योजना राबवण्यात येतात. (१) पशुवैद्यकीय केंद्राची स्थापना, पायांच्या व तोंडाच्या रोगांचे नियंत्रण, पशुवैद्यकीय दवाखाने / पशु प्रथमोपचार केंद्रे

बांधणे / पशु वैद्यकीय सर्व चिकित्सालयाचे बांधकाम, कृत्रिम रेतन सुविधांचे बळकटीकरण, दुभत्या जनावरांना खाद्य पुरवठा, दुग्धविकास

**मत्स्यव्यवसाय** : पुढील योजना राबवण्यात येतात– मत्स्यबीज उत्पादन, अवरुध्द पाण्यात मत्स्यसंवर्धन, मच्छिमार सहकारी संस्था विकास, मासेमारी साधनांच्या खरेदीसाठी अर्थसाहाय्य, मत्स्यसंवर्धन विकास यंत्रणेची स्थापना.

**वने** : पुढील योजना राबवण्यात येतात.

औद्योगिक व व्यापारी उपयोगासाठी लागणाऱ्या प्रजातिची वृक्ष लागवड, निकृष्ठ वनांचे पुनर्वनीकरण, किरकोळ जंगल उत्पन्नाचा विकास, संयुक्त वन व्यवस्थापन, वन कामगार व सेवक वर्ग यांच्यासाठी सुखसोई, वन दळणवळण, रोपवन कार्यक्रम, अग्नीपासून वनांचे संरक्षण, वैरण, साधनसंपत्तीचा विकास, दगडी चेक डॅम बांधणे, सामाजिक वनीकरण

**सहकार** : पुढील योजना राबविण्यात येतात.

बुडीत कर्ज राखीव निधीसाठी अर्थसाहाय्य, निरनिराळ्या योजनांखाली व्याज अनुदान देणे, पीक उत्पादन प्रोत्साहन योजना, सहकारी ग्राहक भांडारांचे भागभांडवल खरेदी करण्यासाठी ७ वर्षीय व्याजमुक्त कर्जे, सहकारी साखर कारखान्याच्या भाग खरेदीसाठी अर्थसाहाय्य कर्जे, आदिवासी सहकारी संस्थांच्या स्वस्त भावांचे दुकानासाठी व्यवस्थापकीय अनुदान, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्थांच्या पुनरुज्जीवनासाठी व्यवस्थापकीय अनुदान व भागभांडवल.

**ग्रामीण विकास**

१. सुवर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार २. अवषर्णप्रवण कार्यक्रम ३. जवाहर रोजगार योजना ४. रोजगार हमी योजना ५. भुसुधार ६. सामुहिक विकास ७. नक्षलग्रस्त भागासाठी विविध योजना राबवणे. ८. आदर्श गांव योजना ९. ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम.

**पाटबंधारे व पूरनियंत्रण** : मोठे व मध्यम पाटबंधारे (मंडळ), लघुपाटबंधारे (जलसंपदा), लघुपाटबंधारे (ग्रामीण विकास विभाग), लघुपाटबंधारे (जलसंधारण विभाग), लघुपाटबंधारे (सहकार व वस्त्रोद्योग विभाग), आयाकट विभाग, पुनवर्सन.

**विद्युत विकास** : ग्रामीण विद्युतीकरण, अपांरपरिक ऊर्जा– आश्रमशाळेत नित्यनूतनशील ऊर्जा कार्यक्रम

**उद्योग व खनिजे** : मोठे व मध्यम उद्योग (वस्त्रोद्योग), ग्रामीण व लघुउद्योग (उद्योग) सुशिक्षित बेकारांना बीज भांडवल साहाय्य, ग्रामीण व लघुउद्योग (सहकार व वस्त्रोद्योग), सहकारी सूतगिरणींना भागभांडवल


**रस्ते विकास** : राज्य महामार्ग, जिल्हा रस्ते, बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन (बी.आर.ओ.) मार्फत रस्ते विकास

**सामान्य आर्थिक सेवा** : वन पर्यटन, स्थानिक विकास कार्यक्रम : सामाजिक व सामूहिक सेवा.

**सामान्य शिक्षण** – प्राथमिक शाळा इमारतीचे बांधकाम करण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास प्राधिकरणास अनुदान, नैसर्गिक वर्गवाढीनुसार प्राथमिक शिक्षकांच्या नियुक्त्या, १ ली ते २ रीमध्ये शिकत असणाऱ्या मुलांसाठी शिक्षणोपयोगी साहित्य तयार करणे, साक्षरता मोहीम

## समाजकल्याण (महिला व बालकल्याण)

इ. ५ वी ते १० वीत शिकणाऱ्या विद्यार्थीनींना सायकली देणे, नवीन बालवाड्या सुरू करणे, आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांना विनामूल्य शिवणयंत्रे देणे, महिला मंडळांनी ग्रंथालये व प्रौढ शिक्षण शिबिरे चालविणे, ग्रामीण महिला व बालकांसाठी रोगनिदान शिबिरांची व्यवस्था करणे, ग्रामीण महिलांसाठी शौचकूपाचे बांधकाम करणे, आदर्श अंगणवाड्या/ बालवाड्यांमधील सेविकांना पुरस्कार देणे, अंगणवाड्या/ बालवाड्या यांना साधनसामग्री / साहित्यसामग्री देणे, महिला व बालकांना उत्तेजन देण्यासाठी ग्रामस्तरावर निरनिराळ्या स्पर्धांचे आयोजन करणे, पंचायत संस्था यासंबंधात महिला प्रतिनिधींना प्रशिक्षण देणे, महिला व बालकल्याण समितीमार्फत चालविण्यात येणाऱ्या बालवाड्यांमधील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक व क्रीडाविषयक साधनसामग्रीची खरेदी करणे, महिला प्रतिनिधींसाठी अभ्यास दौरे आयोजित करणे, अपंग मुले / स्त्रिया यांचे पुनर्वसन करणे व त्यांना कृत्रिम अवयवारोपण करणे, विद्यार्थ्यांना गणवेश पुरविणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील स्त्रियांना साड्या पुरविणे, गाई/म्हशी/शेळी इत्यादी खरेदी करण्यासाठी (स्वयंरोजगारासाठी) गरजू महिलांना वित्तीय साहाय्य देणे, आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील मुलींच्या लग्नासाठी रु. २,०००/- पर्यंत वित्तीय साहाय्य देणे, औद्योगिक प्रशिक्षणाच्या प्रयोजनासाठी महिला मंडळे / स्वेच्छा संस्थांना वित्तीय साहाय्य देणे, आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकातील मुलांना तंत्रशिक्षणासाठी वित्तीय साहाय्य देणे, आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील महिलांना बालसंगोपनासाठी वित्तीय साहाय्य देणे, आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांतील गरजू महिलांना गृहोपयोगी वस्तू पुरविणे, विद्यार्थ्यांना इतर जिल्ह्यातील शिक्षणासाठी ठोक अनुदान देणे, आर्थिकदृष्टया कमकुवत घटकातील विधवा, घटस्फोटित महिला यांना कृषी अवजारे खरेदी करण्यासाठी वित्तीय साहाय्य देणे, परितक्त्या स्त्रियांना घरासाठी वित्तीय साहाय्य देणे.



**तांत्रिक शिक्षण** – द्विलक्षी व्यवसाय अभ्यासक्रम, किमान कौशल्यावर आधारित व्यवसाय अभ्यासक्रम, शालांत पूर्व व्यावसायिक शिक्षणात सुविधांची वाढ करणे, महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र अभ्यासक्रम

**क्रीडा व युवक कल्याण** – प्रत्येक गावात व्यायामशाळा व क्रीडांगण विकास, क्रीडांगणाचा विकास व तालुका पातळीवरील क्रीडागंणाचे बांधकाम, व्यायामशाळांचा विकास, समाजसेवा शिबिरांचे आयोजन, ग्रामीण/शहरी क्षेत्रातील स्वयंसेवी संघटनांना वित्तीय सहाय्य


**सार्वजनिक आरोग्य :** पुढील योजना राबवण्यात येतात : राष्ट्रीय हत्तीरोग नियंत्रण कार्यक्रम, व्हीटॅमिन ए आणि ओरल रिहायड्रेशन सॉल्ट यांची खरेदी, राष्ट्रीय हिवताप निर्मूलन कार्यक्रम, पल्स पोलिओ प्रतिक्षम कार्यक्रम, ग्रामीण रुग्णालयातील व प्राथमिक आरोग्य केंद्रातील आंतररुग्णांना आहार सुविधा पुरविणे, दृष्टिदान योजना, प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र/ग्रामीण रुग्णालय बांधकाम, आरोग्य संस्थांना औषधी अनुदाने

**जिल्हास्तरीय योजना :** यंत्रसामग्रीची त्रुटी भरून काढणे, प्रशासकीय इमारत व कार्यशाळा इमारत बांधकाम आणि वसतिगृह बांधकाम, विद्यमान औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवीन अभ्यासक्रम सुरू करणे, नवीन औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची स्थापना करणे, कमी मागणीच्या ऐवजी जादा मागणीचे व्यवसाय अभ्यासक्रम सुरू करणे, प्रोजेक्ट युनायटेड अंतर्गत अनुसूचित जमातीच्या उमेदवारांसाठी व्यवसायाभिमुख व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, मूलभूत प्रशिक्षण तथा आनुषंगिक सूचना केंद्राची स्थापना करणे

**पोषण :** मृत्युसंख्या कमी करणे व आरोग्य राखणे आणि समाजातील दुर्बल घटकांची कार्यक्षमता व उत्पादकता वाढविणे हा पोषण कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

**एकात्मिक बालविकास सेवा :** पुढील सुविधा पुरविण्यात येतात.– पूरक आहार, प्रतिक्षमत्व, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा, पोषण व आरोग्य शिक्षण, अनौपचारिक शिक्षण, स्थानिकरीत्या उपलब्ध धान्य व कडधान्यापासून तयार केलेला पूरक आहार.

## महत्त्वाचे निर्णय




एक लाख आदिवासी उमेदवारांना रोजगारक्षम करण्यासाठी कौशल्य विकास कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू.

- केंद्रवर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट योजना) या योजनेची प्रति लाभार्थी अनुदान मर्यादा रुपये १५,०००/– वरून रुपये ५०,०००/– करण्यात आली आहे.
- ठक्कर बाप्पा वस्ती सुधार कार्यक्रमांतर्गत प्रतिगाव अनुदान मर्यादा वाढवण्यात आली आहे.



- खावटी कर्ज योजनेतील अनुज्ञेय रक्कम थेट बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय.
- शासकीय आश्रमशाळांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य पुरवठा करण्यास मान्यता.
- शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना टुथपेस्ट व खोबरेल तेलाकरिता रोख स्वरूपात अथवा धनादेशाने थेट बँक खात्यात रक्कम जमा करण्याचा निर्णय. शासकीय आश्रमशाळा मुख्याध्यापकास अधिकार प्रदान.
- प्रकल्प अधिकारी यांना शाळा / वसतीगृह व कार्यालयीन कर्मचाऱ्यावर प्रशासकीय कारवाई करण्याचे अधिकार प्रदान.
- अपर आयुक्त / प्रकल्प अधिकारी यांच्या आकस्मिक खर्च मर्यादेत वाढ, गृहपाल / मुख्याध्यापक यांना आकस्मिक खर्चाचे अधिकार प्रदान.



- आदिवासींना सेवा पुरविणे सुलभ होण्याकरिता नवीन ५ प्रकल्प कार्यालय निर्मिती व विद्यमान प्रकल्प कार्यालयातील कर्मचारी संख्येत वाढ.
- शासकीय वसतीगृह ऑनलाइन प्रवेश पद्धती स्थगित करून ऑनलाइन/ऑफलाइन दोन्ही पद्धती लागू.
- आदिवासी लाभार्थ्याला कोणत्याही योजनेचा अर्ज सादरीकरण करण्याकरिता त्यांच्या गावानजीकच्या बाजारपेठेच्या ठिकाणी अर्ज स्वीकृती केंद्र तथा माहिती सुविधा केंद्र.
- आदिवासी विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेली शिष्यवृत्ती देण्यासाठी ऑनलाइन पद्धती.
- वसतिगृह प्रवेश पात्र परंतु वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेणे सुलभ होण्याकरिता निर्वाह भत्ता मंजुरी प्रस्तावित.

### प्रस्तावित सुधारणा

शबरी घरकूल योजना, स्वाभिमान सबळीकरण योजना, कन्यादान योजना, पोलीस व सैन्य दल भरतीपूर्व प्रशिक्षण केंद्र योजना.



# जागतिक आदिवासी दिवस




जेलसिंग पावरा

संयुक्त राष्ट्र संघटनेने (UNO) सन १९९३ हे वर्ष आदिवासी वर्ष म्हणून घोषित केले. जागतिक स्तरावर विश्व आदिवासी दिवस साजरा करण्यामागे आदिवासींचे अस्तित्व, अस्मिता, विशिष्ट ओळख, संस्कृती, आत्मसन्मान, जल, जंगल व जमीन यात त्यांच्या जीवनाशी निगडित अनेक प्रश्न दडलेले आहेत.

आज आदिवासींच्या संदर्भात अनेक संज्ञा प्रचलित आहेत. आदिवासी हा शब्द इंग्रजीतील बॉरिजिनीज या शब्दाला पर्याय असणारा शब्द आहे. आदिवासींना वनवासी किंवा वन्यजाती संबोधणे म्हणजे त्यांच्या अस्तित्वाला नाकारण्यासारखे आहे. किंबहुना मानहानी करण्यासारखे आहे. अनुसूचित जमाती किंवा जनजाती या संज्ञातूनही त्यांची मूळ आदिवासी ओळख (इंडिजिनस आयडेंटिटी) स्पष्ट होत नाही. बॉरिजिनीज या शब्दाव्यतिरिक्त इंग्रजीत 'प्रिमीटीव्ह' हा शब्द आहे. म्हणजेच मूळचे आदिम किंवा अप्रगत लोक.

संयुक्त राष्ट्रसंघटना आणि तिची संलग्न संस्था आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने आदिवासींना इंडिजिनीस अर्थात देशज, मूळनिवासी असे संबोधावे अशी शिफारस केली आहे. भारत देशाच्या संदर्भात 'आदिवासी' तर जागतिक स्तरावर इंडिजिनस किंवा बॉरिजीनीज (म्हणजे देशज लोक) हेच शब्द प्रचलित आहेत.

जागतिक पातळीवरील विशिष्ट प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी २४ ऑक्टोबर, १९४५ स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेने सन १९७२ पासून आदिवासींच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला सुरुवात केली. मधल्या कालखंडात कॅनडा, संयुक्त राष्ट्र अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि स्पेन या देशांतील सरकारे आणि तेथील आदिवासी यात जमीन व प्राकृतिक संसाधनांच्या उपयोगावरून संघर्ष पेटला. हा संघर्ष पेटला असतानाच क्रिस्टोफर कोलंबसने अमेरिकेचा शोध लावल्याला ५०० वर्षे पूर्ण होत होती. त्याप्रीत्यर्थ आनंदोत्सव साजरा करण्याबाबत स्पेन सरकारने १९९२ मध्ये युनोकडे प्रस्ताव मांडला. हा प्रस्ताव युनोने फेटाळून लावला. कारण या देशांच्या वसाहतवाद नीतीमुळे तेथील 'देशज' म्हणजे आदिवासींमध्ये जो असंतोष वाढत होता तो रोखणे युनोला कठीण झाले होते. तथापि असा उत्सव साजरा न करता आदिवासींच्या समस्या जगासमोर मांडण्याचे ठरविले. वाढत्या संघर्षामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आर्थिक आणि समाजिक परिषदेने संयुक्त राष्ट्र मानवाधिकार आयोगाकडे आदिवासींच्या समस्यांचा अभ्यास करण्याची जबाबदारी सोपविली. पुढे १८ डिसेंबर, १९९० च्या युनोच्या आमसभेत आदिवासींच्या सन्मानार्थ १९९३ हे वर्ष इंटरनॅशनल इयर ऑफ द वर्ल्ड इंडिजिनीस पीपल अर्थात जागतिक आदिवासी वर्ष म्हणून जाहीर करण्यात आले.

९ डिसेंबर, १९९३ या मानवाधिकार दिवसापासून हे वर्ष सुरू झाले आणि जिनेव्हा येथे समारंभही झाला.

आदिवासींच्या विविध प्रश्नांना जगासमोर मांडण्यासाठी जून १९९३ मध्ये 'व्हिएन्ना' येथे मानवाधिकार विश्व संमेलन झाले. या संमेलनात विविध देशांनी आपापल्या देशातील समस्यांबाबत निवेदन सादर केली. या संमेलनात आदिवासी प्रतिनिधींनी आपली मते परखडपणे मांडली. संयुक्त राष्ट्र संघटनेद्वारा परिभाषेत देशज लोक हे आदिवासी किंवा अनुसूचित जमाती नाहीत तर भारतातील सर्व लोक हे देशज आहेत, अशा प्रकारचे निवेदन भारत सरकारने दिले होते. म्हणजे देशज लोक हे आदिवासी नाहीत अशा प्रकारचा भारताचा संभ्रम असल्याने भारतातील आदिवासींमध्ये असंतोष उठला आणि अस्मितेचा प्रश्न उभा ठाकला.

त्यामुळे भारतात ठिकठिकाणी कार्यक्रम, चर्चासत्र, कार्यशाळा घेऊन आदिवासी प्रतिनिधींनी युनोच्या 'इंडिजिनस' या शब्दाच्या परिभाषेवर चर्चा घडवून आणली. याच मुद्यावर २५ ते २९ जुलै, १९९४ मध्ये जिनिव्हा (स्वित्झरलँड) येथे आदिवासी लोकसंख्या संयुक्त राष्ट्र कार्यगटाची चर्चा सत्र- बैठक झाली. या बैठकीत भारत सरकारने आदिवासी अभ्यासक, विचारवंत व कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाला पाठविले. त्यात त्रिपुराचे श्री. पी. के. देब्बारमा, सेंधवा (म.प्र.)चे श्री. गजानन ब्राम्हणे, डहाणू (महाराष्ट्र)चे प्रदीप प्रभू, चाईबासाचे, श्री. देवेंद्रनाथ हसदा, यांचा समावेश होता. या प्रतिनिधींनी या बैठकीत युनोची 'देशज' या शब्दाविषयीच्या परिभाषेवर आधारित शिफारशी सादर **(पान ५० वर)**

९ ऑगस्ट, १९९५ पासून जगभरात 'जागतिक आदिवासी दिवस' महोत्सव साजरा करण्यात येतो. ९ ऑगस्ट हाच दिवस निश्चित करण्याचे कारण म्हणजे १९८२ या वर्षी याच दिवशी जिनिव्हा येथे आदिवासी लोकांच्या मानवी हक्क संरक्षण व प्रगतीसाठी काम करणाऱ्या संयुक्त कार्यगटांची पहिली बैठक झाली होती. त्या दिवसाची आठवण म्हणून हा आदिवासी दिवस साजरा करण्याचे ठरले. महाराष्ट्रात आदिवासीबहुल जिल्ह्यांत ठिकठिकाणी या दिवशी कार्यक्रम होतात. ९ ऑगस्ट हा क्रांती दिवस आहे. त्यामुळे या दिवसाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शेवटच्या माणसापर्यंत या दिवसाचे महत्त्व समजावे म्हणून तालुका व गाव पातळीवरदेखील आता जागृती मेळावे होत आहेत.

# पारंपरिक वनाधिकार

संयुक्त वनव्यवस्थापन, आदिवासी स्वयंशासन, पिकांचे वाण आणि शेतकऱ्यांचे अधिकार, जैवविविधता आणि आदिवासी आणि पारंपरिक वननिवासीयांचे वनावरील हक्क (अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वा वननिवासी (वन हक्कांची मान्यता) अधिनियम २००६), (अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वननिवासी (वन हक्कांची मान्यता) नियम २००८) अशा वेगवेगळ्या कायद्यांतून शतकानुशतके परंपरागत जल, जमीन, जंगल, जीव राखणाऱ्या वननिवासींना निसर्ग साधन-संपत्तीवर भक्कम हक्क मिळाले आहेत. ह्या हक्कांबरोबरच त्यांच्यावर या संपत्तीचा शहाणपणाने टिकाऊ पद्धतीने वापर करण्याची जबाबदारीही आहे. राष्ट्रीय रोजगार हमी कार्यक्रमातून निसर्ग संपत्तीचे संरक्षण, संगोपन, पुनरुज्जीवन करण्याची चांगली संधी निर्माण झाली आहे. या सर्व कायद्यांचा एकात्मिक विचार करून प्रयत्न केल्यास भरीव व एकसंध काम शक्य होईल आणि परिसर सुस्थितीत राखून स्थानिक लोकांना खरा लाभ होईल.

रणजितसिंह राजपूत

१९८० च्या वनसंवर्धन कायद्यासोबत अधिक निसर्गाभिमुख आणि लोकाभिमुख वननीती घडविण्याची शिकस्त सुरू केली. या वननीतीत उरलेली नैसर्गिक वनं संरक्षित ठेवण्यावर गावकरी आणि आदिवासींच्या वनोपजांच्या गरजा पूर्ण करण्यावर आणि या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी मोठ्या प्रमाणावर जनमत तयार करण्यावर भर देण्यात आला आहे. १९८१ मध्ये केंद्रीय पर्यावरण विभागाची स्थापना झाली. पर्यावरणाच्या जाणिवा अधिक ठळक झाल्या. १९८५-८६ पासून भारतात या जाणिवा महत्त्वाची भूमिका बजावू लागल्या आहेत. अनेक प्रश्नांवर यातून कारवाई होऊ लागली आहे. वनात राहणाऱ्या लोकांचे जमिनीवर हक्क, सवलती निश्चित करावेत यासाठी १९९५ साली सरकारने काळजीपूर्वक हे हक्क, अधिकार आणि सवलती राबवण्याचा कार्यक्रम हाती घेतला. पारंपरिक वननिवासी यांच्या सवलती हक्कातून जल, जमीन, जंगल, जीव आणि माणूस यांच्या सहजीवनाने समृद्ध अशा शाश्वत, संतुलित पर्यावरणाच्या निसर्गदत्त संकल्पनेने शासन, प्रशासनात जन्म घेतला.

### संयुक्त वनव्यवस्थापन

१९७२ च्या सुमारास लोकांच्या साहाय्याशिवाय वनसंगोपन शक्य नाही, हे ओळखून पश्चिम बंगालमधल्या आराबारी ब्लॉकमध्ये वनखात्यातर्फे लोकांचे सहकार्य घेण्यात येऊन आधुनिक संयुक्त वनव्यवस्थापनेची मुहूर्तमेढ रोवण्यात आली. १९९० मध्ये या संदर्भात केंद्र शासनाने आदेश दिले. यानंतर १९९६ साली 'पेसा' आदिवासी स्वयंशासन कायदा आला. त्यानुसार अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना गौण वनोपजावर तसेच सरपण आणि चराईवर पूर्ण हक्क मिळाला. पण गौण वनोपजावर मूल्यवर्धक प्रक्रिया करण्यास, बाजारपेठेत पाठविण्यास, विकण्यास वाव मिळत गेला नाही. राखीव जंगलांवर त्यांचा हक्क मानला गेला नाही. त्यामुळे लोक वंचितच राहिले. या पुढचं एक पाऊल म्हणजे २००२ मध्ये झालेला जैवविविधता कायदा. जैवविविधतेचं संरक्षण, चिरस्थायी वापर आणि लाभांशाचे न्याय्य वाटप ही या कायद्याची उद्दिष्टं आहेत.

### वनाधिकार कायदा

१९८० च्या वनसंवर्धन कायद्यांतर्गत वनजमिनीवरील कोणतेही हक्क मंजूर करताना केंद्र सरकारची पूर्वपरवानगी आवश्यक ठरली. सर्वोच्च न्यायालयाने गोदा वरमन प्रकरणात वनांमध्ये आदिवासींना काहीही हक्क देण्यास बंदी घातली. त्याविरुद्ध दाद मागून घेण्यासाठी शोषित जनआंदोलन वगैरे अनेक राष्ट्रीय पातळीवरील जनसंघटनांची आघाडी उभी राहिली आणि त्यांनी वन अधिकाराचा मुद्दा सातत्याने लावून धरला. या सर्व प्रयत्नांचे फळ म्हणून वनाधिकार (अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वा वननिवासी (वन हक्कांची मान्यता अधिनियम २००६) कायदा मंजूर झाला आणि २००८ च्या आरंभापासून तो (अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वननिवासी (वन हक्कांची मान्यता नियम २००८) अंमलात यायला सुरुवात झाली.

या कायद्याच्या उपोद्घाताप्रमाणे आदिवासी आणि इतर पारंपरिक वनवासी यांच्या हक्कात जैववैविध्याचे संवर्धन, शाश्वत उपयोग आणि अरण्यांच्या परिसराचे संतुलन याबाबतचे अधिकार आणि जबाबदाऱ्यांचा अंतर्भाव आहे. यातून अरण्यसंपत्तीचे संवर्धन अधिक बळकट व्हावे, त्याबरोबरच वनवासी यांची उपजीविका आणि सुरक्षित पोषण यांचीही निश्चिती होईल अशी अपेक्षा आहे. या वनाधिकार हक्कात वैयक्तिक आणि सामूहिक असे दोन्ही प्रकारचे पक्के हक्क आहेत. ते राखीव जंगल, अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान अशा सर्व प्रकारच्या वनभूमीवर बजावता येतील. वनाधिकार कायद्यानुसार




लोक जी वनजमीन १३ डिसेंबर, २००५ च्या पूर्वीपासून, तीन पिढ्यांपासून कसत आहेत म्हणजे आदिवासी आणि पारंपरिक वनवासी जी वनजमीन कसत आहेत, त्यांचा ३१ डिसेंबर, २००७ रोजीही या वनजमिनीवर त्यांचा ताबा आहे. उपजीविकेच्या खऱ्याखुऱ्या गरजा त्या वनजमिनीवर अवलंबून असतानाही जिच्यावर त्यांना कायदेशीर हक्क नाही अशी ४७ हेक्टरच्या कमाल मर्यादेपर्यंतची जमीन त्यांच्या मालकीची होईल. मात्र या कायद्यातून कोणतेही जंगल नव्याने तोडून जमिनीवर हक्क दिले जाणार नाहीत. वनाधिकार कायद्यानुसार स्थानिक समाज ज्या भूमीचा पूर्वापार वापर करत आले आहेत अशा जमिनीवर लोकांना सामूहिक हक्क मिळतील. या सामूहिक हक्कात इमारती लाकूड वगळता इतर वनस्पतिजन्य उत्पादनं बांबू, काठ्या, बुंधे, वेल, टसर, रेशमाचे कोष, मध, मेण, लाख, तेंदू, औषधी वनस्पती, कंदमुळे या सर्वांचा समावेश होईल. तसेच सामूहिक हक्कात मासे व इतर जलाशयातील उत्पादन स्थानिक व फिरस्ती चराई जैवविविधता गोळा करण्याचा, त्यावरील

व पारंपरिक ज्ञानावरील तसेच सांस्कृतिक वैविध्यावरील बौद्धिक संपत्तीचे अधिकार व वनवासीयांचे इतर पारंपरिक हक्क, शिकार करण्याचे हक्क सोडून समाविष्ट असतील. याशिवाय सर्व मिळून १३ हेक्टरपर्यंत वनजमीन शाळा, दवाखाना, विजेच्या तारा अशा सार्वजनिक सुविधांसाठी उपलब्ध करून देण्यात येईल.

**वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणीचे मुख्य टप्पे**

❍ ग्रामसभेद्वारे वनाधिकार समितीचे गठन व सामूहिक संसाधनाची निश्चिती. ❍ दावेदार वनाधिकार समितीकडे दावा दाखल करणार व पावती घेणार. ❍ वनाधिकार समिती जागेवर जमिनीची पाहणी करणार व आपला अहवाल ग्रामसभेकडे पाठविणार. ❍ ग्रामसभेत खुली चर्चा होऊन संमत ठराव तो उपविभागीय समितीकडे पाठविणार.❍ उपविभागीय समितीत दाव्यांची पडताळणी होऊन तो जिल्हास्तरीय समितीकडे पाठविणार. ❍ जिल्हास्तरीय समितीकडून दाव्याबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार.❍ त्यानंतर पात्र दावेदारांना मान्य केलेल्या वनाधिकाराचे टायटल दिले जाणार.

वनाधिकार कायद्याच्या अंमलबजावणीवर देखरेख करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे.

**वनाधिकार कायद्याची अंमलबजावणी (मे, २०१२ अखेरपर्यंतची सद्य:स्थिती)**

❍ राज्यात आदिवासीबहुल, वनजमीन असणाऱ्या २५ जिल्ह्यांत २००८ पासून वनाधिकार कायद्याची प्रभावी अमंलबजावणी सुरू करण्यात आली आहे. ❍ वनाधिकार कायद्याची अमंलबजावणी करणाऱ्या जिल्ह्यांमध्ये ठाणे, रायगड, नाशिक, जळगांव, धुळे, नंदुरबार, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, औरंगाबाद, नांदेड, हिंगोली, बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदीया, चंद्रपूर व गडचिरोली या जिल्ह्यांचा समावेश. ❍ राज्यातील जळगांव, अहमदनगर, सातारा, औरंगाबाद, बुलढाणा, अकोला, यवतमाळ, गोंदिया आणि गडचिरोली या जिल्ह्यात ३१ मे, २०१३ अखेरपर्यंत शंभर टक्के वनाधिकार दावे निकाली. ❍ वैयक्तिक वनाधिकार बहाल करण्याचे राज्याचे सरासरी प्रमाण ९९.१६ टक्के इतके आहे, १०१३७४ वनजमिनींचे पट्टे त्यासाठी दावेदारांना वितरित करण्यात आले आहेत. २३६६३३.२८ एकर वनजमीन त्यासाठी दावेदारांना बहाल करण्यात आली आहे. ❍ वैयक्तिक वनाधिकारासाठी ९८.९९ टक्के आदिवासी जमातीचे दावे मान्य करण्यात आले असून इतर वननिवासी जमातींचे दावे मान्य करण्याचे प्रमाण ९९.५४ टक्के इतके असून दोघांचे मिळून हे प्रमाण ९९.१६ इतके आहे.❍ राज्यात आदिवासी जमातींना वनाधिकार कायद्याखाली ८६४४१ इतके वनजमिनींच्या पट्ट्यांचे वितरण करण्यात आले असून त्यासाठी २०२५६२.५४ एकर जमीन आदिवासींना बहाल करण्यात आली आहे, तर इतर वननिवासी जमातींना १४९३३ इतक्या वनजमीन पट्ट्यांचे वितरण करण्यात आले आहे. त्यासाठी ३४०७०.७४ एकर वनजमीन दावेदारांना बहाल करण्यात आली आहे. ❍ राज्यात ९७.५ टक्के सामुदायिक वनाधिकार दावे मान्य करण्यात आले आहे. त्यासाठी २१०६ इतक्या वनजमिनींच्या पट्ट्यांचे वितरण करण्यात आले आहे व ५५५०१९.१२ एकर वनक्षेत्र दावेदारांना बहाल करण्यात आले आहे.❍ सामुदायिक वनाधिकारात आदिवासी जमातींचे ९७.३० टक्के दावे मान्य करण्यात आले असून त्यासाठी १३८९ वनजमिनींचे पट्टे वितरित करण्यात आले आहेत व ४,७६,७१९.६६ एकर वनक्षेत्रावर सामुदायिक दावे मान्य करण्यात आले आहेत.❍ सामुदायिक वनाधिकारात इतर वननिवासी जमातींचे ९६.६९ टक्के दावे मान्य करण्यात आले आहेत, त्यासाठी ७१७ वनजमीनींचे पट्टे वितरित करण्यात आले आहेत. ७८२९९.४६ एकर वनक्षेत्र त्यासाठी वितरित करण्यात आले आहे.❍ शासनाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या पायाभूत सेवा-सुविधांच्या वनेतर प्रयोजनासाठी ११८० दावे मान्य करण्यात आले असून त्यासाठी ११७३.९८ एकर वनक्षेत्र बहाल करण्यात आले आहे.



नंदुरबार येथे वनजमीन पट्ट्यांचे वितरण करताना पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग आणि यूपीएच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी.

वनाधिकारातून समृद्ध निसर्गाकडे आणि संतुष्ट जनजीवनाकडे वाटचाल व्हावी अशी अपेक्षा आहे. महाराष्ट्रात आजतरी वनाधिकार कायद्याचं चित्र शाश्वत अशा विकासाच्या दृष्टीने आशादायी असे आहे. ऋग्वेदाच्या अरण्यसूक्तात म्हटल्याप्रमाणे धूपाने सुगंधित वन्य जीवांची माता आणि जिच्यात शेती नसली तरी जी भरपूर अन्न पुरविते अशा अरण्याचे, तिचे सर्व पुत्र आणि कन्या स्तवनच करतील.

**संपर्क : ९४२२७८५५५५**

✶✶

# आदिवासी लोकगीते

# संवेदनशील आणि नादमय

**महाराष्ट्रातील विविध विभागात वास्तव्य करणारे आदिवासी शतकानुशतके आपल्या अभिजात संस्कृतीचे जतन करीत आले आहेत. निसर्गाच्या कुशीत स्वच्छंद जीवन जगणाऱ्या आदिवासींचे मन हे संवेदनशील आणि निर्मळ असते. त्यांच्या जीवनचक्र विधींमधून, धर्मविधी व श्रद्धांमधून त्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडते. अतिमागास विभागात राहणाऱ्या आदिम (Primitive) आदिवासींमध्ये हे सुस्पष्ट दिसते तर बाह्य जगाच्या संपर्कात झालेल्या आदिवासींच्या जीवनात संमिश्रण आढळते. घरे, वेशभूषा, दागिने, गोंदण, आहार यासारख्या भौतिक संस्कृतीतही त्यांच्यात भिन्नता आढळते. परंतु निसर्गपूजा, मृत पूर्वजांची पूजा, देवदेवता, मृत पूर्वजांच्या बाबतीतली पुराणे इत्यादी दोहोत आढळतात. कालमान व परिस्थितीनुसार परिवर्तन मात्र हळूहळू घडतच असते. मानवी भावभावनांच्या बाबतीत मात्र त्यांच्यात व बाह्य मुख्यप्रवाह संस्कृती यात फारसे अंतर दिसत नाही. याची कल्पना येण्यासाठी दोन आदिवासी जमातींच्या काही लोकगीतांकडे पाहणे उपयुक्त ठरेल.**

डॉ. शैलजा देवगांवकर

गडचिरोली जिल्ह्यातली माडिया-गोंड ही आदिम (प्रिमिटिव्ह) जमात आणि अमरावती जिल्ह्यातल्या मेळघाट भागातल्या चिखलदरा व धारणी तहसिलातील कोरकू या दोन जमातींच्या लोकगीतांचे अवलोकन करू. माडिया-गोंड ही द्राविड भाषा परिवारातील तर कोरकू ही खेरवारियन/कौलॅरियन परिवारातील जमात होय. त्यामुळे या दोन भिन्न वंशमूळ असलेल्या जमातींची काही लोकगीते पाहू.

माडिया-गोंडामध्ये वधू-मूल्याची (Bride Price) प्रथा आहे. विवाहाचे वेळी मुलीच्या मैत्रिणी तिच्या होणाऱ्या पतीला कसे चिडवतात ते या गीतातून लक्षात येते. तसेच वधू-मूल्याची सांस्कृतिक बाबही यातून स्पष्ट होते.

माडिया-गोंडांची गीते

विवाह गीते :-

'मर्मींगना रेलाँ पाटा' विवाहाची गीते -

माडियांमध्ये वधू-मूल्याची (Bride-price) प्रथा आहे. वधूच्या मैत्रिणींचा घोळका लग्नमंडपात नवरदेवाला चिडविण्यासाठी गाणी म्हणत असतो. प्रस्तुत गीत त्यातलेच...

रे ऽऽ रे लाँ ऽऽ, रि ऽऽ री लॉ ऽऽ री ऽऽ
रि ऽऽ रीलो ऽऽ री ऽऽ
जोडी जोडी इनदादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल...
गाडा नुका दोस्ते दादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल...
अस्के निवा जोडी दादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल...
पूनम जोडी दुर्रको दादी
वंजी वालवाल दादी
वंज वालवाल...
कोरट पारी लेने दादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल...
दूरत बोकडा दोहानेके दादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल...
निवा जोडी दुर्रको दादी
वंजी वालवाल दादी
वंजी वालवाल ...
रि ऽऽ रीलो ऽऽ री ऽऽ ...



नवऱ्या मुलाला 'दादी' म्हटले आहे.

अर्थ : हे दादी ! जोडी जोडी (जोडीदारीण) म्हणतोस, पण त्यासाठी हिरवे हिरवे धान द्यावे लागतील. जेव्हा गाडाभर धान टाकशील, तांदूळ टाकशील तेव्हाच बायको तुझी होईल. (जोडीदारीण ह्या अर्थाने).

दादी, बायको काही फुकट मिळत नाही. व्याह्याच्या घरी आधी कोंबडा पोहोचवून दे आणि मग बायको ने.

दादी, धानाने भरलेल्या बैलगाडीच्या धुऱ्याला जेव्हा बोकड बांधलेला असेल तेव्हाच तुझी बायको तुला मिळेल.

मुलगी सासरी जातांना माहेरच्यांचे मन कळवळून जाते. त्यातूनच 'जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा ' अशी दर्दभरी भावगीते निर्माण होतात. अगदी अशाच भावभावना खालील गीतांतून ध्वनित होतात.

मुलाच्या मांडवात मुलीकडच्या मुलामुलींनी म्हणावयाचे गीत -

री ऽऽ रिलो, री ऽऽ री ऽऽ लो
साले मुंडा रोयता
निवा मुलू रोयता
निवा रेलो मुलूये
री ऽऽ रिलो, री ऽऽ री ऽऽ लो ...१
पाटा होतेके नाटोस्के
निवा रेलो मुलूये
रि ऽऽ रीलो, री ऽऽ री ऽऽ लो ...२
धर्मम पाटा ओस्ता
साले मुंडा रोयता
निवा रेलो मुलूये
रि ऽऽ रीलो, री ऽऽ री ऽऽ री लो ...३
निकू पोहची दायनू
नीवा जीवा ऊंईता
निवा रेलो मुलूये
रि ऽऽ रीलो, री ऽऽ री ऽऽ लो...४

अर्थ : सालई झाडाचा खांब वाकलेला आहे, तसेच तुझे लोकही वाकलेले आहेत. (माडियांच्या लग्नमंडपात सालईचा 'मूंड' - खांब असतो.)

तुझी लहान बहीण व लोक सर्वच वाकलेले आहेत.

हे दुसरेच गीत गात आहेत. हे सर्व फुकट (उगीचच) गाणे म्हणत-गात आहेत. सालईचा खांब वाकलेला आहे.

हे सगळे जण तुला तुझ्या घरी म्हणजे इथेच सोडून जातील. तेव्हा तुझा जीव लहान लहान होईल (म्हणजे तू दु:खी होशील). तुझी लहान बहीण व इतर लोक उगीचच गाणे म्हणत

आहेत.

प्रस्तुत गीतातील भावना कोणत्याही सासरी जाणाऱ्या मुलीच्या मनाचे चित्रण करीत नाहीत काय?

सौंदर्यदर्शक माडिया गीते

री ऽऽऽ रिलो, री ऽऽ रिलो ऽऽऽऽ
ऽऽ रिलो ऽऽऽ
केयोम केयोम के, केयोम के ऽऽऽ योंगे
आलो देवाने ये ऽऽऽ लोले
नेतुर-दारा पोडदुये,
पोडदुयेलो पोडदुये, केयोम केयोम के ऽऽऽ ...१
कमका-दारा लेंजुये,
लेंजुयेलो लें ऽऽऽ जुये, केयोम केयोम के ऽऽ ...२
कांदा कडवो इत्ताये,
इत्तायेलो इत्तायेलो ऽऽऽ इत्ताये,
कमाबोयो ता ऽऽऽ डिये,
ताडियेलो ता ऽऽऽ डिये, केयोम केयोम के ऽऽऽ ...३
केयोम केयोम के, केयोम के ऽऽऽ योंगे

अर्थ : अग अग बहिणी, लालसर रंग सूर्याचा, सूर्याचा ग सूर्याचा
हळदीचा रंग चंद्राचा, चंद्राचा ग चंद्राचा
दाट ग फांद्या चिंचेच्या, चिंचेच्या ग चिंचेच्या
(म्हणून त्यातून चंद्रसूर्याचे रंग दिसत नाहीत)
विरळ फांद्या ताडीच्या ग ताडीच्या
(म्हणून त्या फांद्यामधून हे रंग दिसतात)
अग अग बहिणी, लालसर रंग सूर्याचा.

'केयोम केयोम' हा मोराचा आवाज या गीतात पालुपद म्हणून घेतला आहे.

वरील गीतांमधून माडियांची अलंकारिक शब्दरचना दिसून येते. शैलीशास्त्राच्या दृष्टीने (Stylology) माडियांच्या गीताकडे पाहता त्यांचा वाङ्मयीन दर्जा उच्च म्हणावा लागेल.

अमरावती जिल्ह्यातल्या मेळघाट विभागात धारणी आणि चिखलदरा तहसिलात कोरकू आदिवासींची भाषा ही माडिया-गोंडीपेक्षा वेगळी असली तरी भावभावना आणि अलंकारिक सौंदर्य तेवढेच चांगले आहे. त्याची दोन उदाहरणे खाली दिली आहेत.

कोरकू भाषेतली गीते

स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णन करणारे होळी गीत रसिकता आणि उपमांच्या दृष्टीनेही उत्तम आहे.

जैसा बाना टिंजकेन, मालाय गोंडोनी डो।
जैसा बाना टिंजकेन, मालाय गोंडोनी रे।।
आमानी टिंगड़ी डो, मालाय चोजामा डो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
केडानी खंबो नीडो, जाभा टेंगड़ी माडो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
आमानि बुतू डो, मालाय चाजानी डो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
टेखला जेनी पोपटानी डो, जामा बुलूम डो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
आमानी भुजानी डो, मालाय चोजानी डो।

स्त्रीच्या सौंदर्याचे वर्णन केलेले आहे. प्रथम प्रश्न करून पुढच्या ओळीत त्याचे उत्तर दिलेले आहे. सर्वप्रथम ''मालाय गोंडोनीचे पाय कसे दिसताहेत?'' असा प्रश्न विचारून 'तिचे पाय - पोटऱ्या व मांड्या केळीच्या खांबासारख्या दिसत आहेत' असे उत्तर दिले आहे. याच पद्धतीने पुढील वर्णन ओघवत्या व नादबद्ध पद्धतीने करण्यात आलेले आहे. मालाय गोंडोनी चे नाक पोपटाप्रमाणे तर बाहू



वैदर्भीय तथा बस्तर विभागातील गोंड स्त्री ही आदिमसौंदर्याचे आदर्श रूप आहे. त्यामुळे कोरकू स्त्रीसाठी 'गोंडोनी' हे विशेषणात्मक रूप रूढ झाले असावे.

जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
छानीनी लाटो निडो मालाय भुजामा डो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
आमानी चाबू निडो मालाय चोजानी डो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
तांबरा बुरुजनी डो आभा चानुमा डो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
आमानी भू निडो मालाय चोजामा डो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
रावानी चाबू केजा आभा मूनी डो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
चरमुक पेट्यानी आभा गालामा डो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
आमानि मेट नीडो चोजमा डो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।
चांदेमा सुरजो केजा आबा मेटनी डो।
जैसा बाना टिंजकेन मालाय गोंडोनी रे।

अर्थ : या गीतात उखळात कांडण करणाऱ्या पाण्याच्या लाटेप्रमाणे (कांडतांनाची हातांची वेगाने होणारी हालचाल उपमाबद्ध केलेली आहे) दिसत आहेत. तिचे मुख टरबुजाच्या लाल गाभ्यासारखे तर गाल चिरंजीच्या गोल तुकड्यांसारखे दिसताहेत. तिचे दोन डोळे हे जणू चंद्र-सूर्याप्रमाणे दिसत आहेत.

या गीतात कांडणाच्या क्रियेला साजेलशी नादबद्ध शब्दरचना लाभली आहे. तसेच मालाय म्हणजे मुलगी/स्त्री असून गोंडोनी हा सौंदर्यवाचक शब्द आहे. कोरकूंमधे वरुण राजाची आराधना करण्याचा सण भवई असून तो वैशाख अमावस्येला साजरा होतो. यात प्रथम 'रांड-भावे' व पाऊस पडल्यानंतर 'चिकला भावे' असे दोन भाग पडतात. पूर्ण गाव नृत्यात भाग घेते.

भवईच्या रांड-भावेच्या वेळी खालील गीते गायिली जातात. हातात टिपऱ्या (दांडे) घेऊन हे नृत्य होते, म्हणून **(पान ४६ वर)**

डिसेंबर १९७० ला बाबांनी (बाबा आमटे) सहलीच्या निमित्ताने गडचिरोलीचा हेमलकसा परिसर दाखवला. वास्तविक या भागातील आदिवासींची जीवनशैली जवळून पाहता यावी हा त्यांचा उद्देश होता. परंतु माझ्यासारख्या वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या तरुणाला हा परिसर आवडेल की नाही या संभ्रमात असलेल्या बाबांनी सहलीसाठी म्हणून आदिवासी भागात आणले आणि येथील लोकांचे कमालीचे



डॉ. प्रकाश आमटे आणि डॉ. मंदाकिनी आमटे

दारिद्र्य व मूलभूत सोयींचा अभाव पाहून मन व्यथित झाले. याच वेळी आदिवासींच्या सेवेतच उर्वरित काळ घालावयाचा हे मनात पक्के केले. १९७० च्या काळात वरोरा ते गडचिरोली हे २५० कि. मी. अंतर कापण्यासाठी ४८ तास लागले. यावरून या भागातील सुविधांचा अंदाज येतो. बाबांनी हा परिसर असंख्य वेळा पाहिला होता. ज्या आदिवासींना शिक्षणाचा गंधही नाही त्यांच्या आरोग्यासाठी काम केले पाहिजे, असे बाबा म्हणाले आणि तेथूनच मनपरिर्वतन झाले.

नागपूरसारख्या महानगरात वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर अतिशय दुर्गम अशा भागात आदिवासींची सेवा करण्याचे कठीण कार्य बाबांनी माझ्यावर सोपवले. दोन दिवस या भागात बाबांनी फिरवले आणि येथील आदिवासींच्या व्यथा व समस्या जवळून दाखविल्या. माड्या व मोरिया या दोन जमाती या भागात आहेत. परंतु आरोग्य सेवा व विकासापासून हा समाज कोसो दूर होता. आपण सर्व सोयी उपभोगतो व आपलेच बांधव यापासून वंचित आहेत ही गोष्ट मन हेलावणारी होती. हेमलकसा भागातच वैद्यकीय सेवा करायची हे मनात ठरवले व बाबांना सांगितले. आता हेच माझे कार्यक्षेत्र. माझ्या या निर्णयानंतर हेमलकसा (ता. भामरागड) येथे २३ डिसेंबर १९७१ ला लोकबिरादरी प्रकल्प आकारास आला. तत्पूर्वी डॉ. मंदाकिनी यांच्याशी विवाह झाला. माझा आदिवासी सेवेचा संकल्प मंदाकिनीला सांगितला आणि तिने अगदी मनापासून या कार्यात साथ दिली ती अजूनही सुरू आहे.

गवताच्या झोपडीतून या कार्यास सुरुवात झाली. तुटपुंज्या साधनांसोबत आदिवासींच्या आरोग्य संवर्धनास सुरुवात केली. अगदी दवाखान्याच्या नावावर केवळ झोपडी होती. ठेवणारा होता. आजारपणात मांत्रिकाकडे जाणाऱ्या या समाजाला दवाखान्यापर्यंत आणणे अतिशय जिकिरीचे काम होते.

मांत्रिकावर विश्वास असणाऱ्या या समाजाला मांत्रिकाला विरोध न करता दवाखान्यात उपचार करण्यास प्रवृत्त करणे हे तसे कठीणच होते. परंतु हळूहळू विश्वास संपादन केला आणि उपचाराचे महत्त्व पटवून दिले. जसजसा विश्वास वाढत होता तसतसे लोक दूरवरून रुग्ण घेऊन येऊ लागले.

नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर भामरागड या अतिशय दुर्गम अशा भागात आदिवासींची सेवा करण्याचे कठीण कार्य बाबा आमटे यांनी डॉ. प्रकाश आमटे यांच्यावर सोपवले. त्यांनी स्वत: दोन दिवस या भागात डॉ. प्रकाश यांना फिरवून येथील आदिवासींच्या व्यथा व समस्या जवळून दाखविल्या. या भागातील माडिया व मोरिया या दोन जमाती आरोग्य सेवा व विकासापासून वंचित असल्याचे डॉ. प्रकाश यांच्या निदर्शनास आले. त्याच वेळेला डॉ. प्रकाश यांनी हेमलकसा भागातच वैद्यकीय सेवा करण्याचा निर्धार केला. त्यानंतर हेमलकसा (ता. भामरागड) येथे २३ डिसेंबर १९७१ ला लोकबिरादरी प्रकल्प आकारास आला. डॉ. मंदाकिनी यांच्या समर्थ आणि समर्पित सहकार्याने हा प्रकल्प समाजसेवेचा दीपस्तंभ ठरला आहे.

# खडतर प्रवास

थोडी औषध व थोडीच साधनं. पण इच्छाशक्ती मात्र दांडगी. जसजसा काळ सरकत गेला तसतशी विकासाची कामे या भागात हळूहळू होत गेली. शासनाने रस्ते, पूल अशा मूलभूत सोयी पुरवायला सुरुवात केली. विशेष म्हणजे १९९५ ला या भागात वीज आली आणि खऱ्या अर्थाने आदिवासींच्या उज्ज्वल जीवनाचे प्रकाशपर्व सुरू झाले.

अतिशय घनदाट जंगलात असलेल्या या भागात कपडे घातलेल्या माणसाबद्दल आदिवासींना कुतूहल असायचे. आपण कपडे घातलेले आणि लाज राखण्यापुरतेसुध्दा कपडे घेण्याची परिस्थिती नसलेले आदिवासी हा विरोधाभास मनाला खटकायचा. त्यातच संवादाची खूप मोठी दरी असायची. संवादाची ही दरी कमी करण्यासाठी आदिवासींची भाषा शिकली गेली आणि यातूनच आरोग्यसेवेचा मार्ग सुकर झाला. या भागातील आदिवासी समाज अतिशय प्रामाणिक व सामाजिक एकोपा जपणारा आहे. मात्र आरोग्याच्या बाबतीत अतिशय अंधविश्वासू व मांत्रिकावर विश्वास

वाहतुकीचे साधन नसल्यामुळे रुग्णांना खाटेवर ठेवून आणले जायचे. अनेक कि.मी.चा प्रवास पायीच करावा लागत होता. रुग्णांवर रात्ररात्र उपचार केले. रुग्ण बरा झाल्यानंतर



त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आजही आठवतो. सर्वच वेळा यश आले नाही. काही वेळा अपयशही आलं. परंतु त्याबद्दल त्यांनी कधी

तक्रारी केल्या नाहीत. आजही दूरवरून रुग्ण येतात. अनेक असाध्य रोगावर उपचार घेतात ही आरोग्य जागृती व्हायला खूप काळ जावा लागला. मात्र आता जागृती झाली आहे. रुग्णांवर वैद्यकीय उपचारच केले पाहिजेत एवढी प्रगल्भता आदिवासी समाजात आली आहे. केवळ आरोग्य जागृती पुरेशी नव्हती. सोबतच शिक्षणाचा प्रसारही आवश्यक होता आणि यासाठी १९७६ साली या भागातील पहिली शाळा स्थापन केली. अडचणी अनंत. शाळेत मुले पाठवायला आदिवासी पालकांचा विरोध होता. परंतु गावोगावी फिरून कार्यकर्त्यांनी शाळेसाठी मुले जमा केली.

आदिवासी समाजाने स्त्रीला कायम स्वातंत्र्य दिले. ही बाब अतिशय वाखाणण्याजोगी आहे. ज्या सुशिक्षित समाजात स्त्रीभृणहत्या मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतात त्या समाजाने आदिवासींकडून आदर्श घ्यावा, असा मुलीचा जन्मदर ही या समाजाची अत्यंत जमेची बाजू पाहायला मिळते. स्त्रीला आपला जोडीदार निवडण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देणारा हा समाज आहे. अतिशय सन्मानाने स्त्रीजातीला वागविणे ही आदिवासी समाजाची संस्कृती आहे ती या भागात प्रकर्षाने पाहायला मिळाली. माणुसकी जपणारा समाज म्हणून आदिवासींकडे पाहिले जाते. ते त्यांच्या स्त्रीसन्मानवृत्तीमुळेच.





१९७६ च्या पहिल्या तुकडीतील कन्ना मडावी तसेच पाडूरंग पुगांटी, कोमडी दुरवा, सुधाकर वाचामी याच शाळेत शिकून डॉक्टर झाले आहेत. शिक्षणामुळेच आदिवासींना हक्काची जाणीव झाली. सोबतच शेतीविकास व आधुनिक शेती याबाबतही त्यांच्यात जागृती निर्माण झाली. कायम वनोपज यावर जगणारा आदिवासी समाज शेतीकडे वळू लागला. हे सर्व शिक्षणामुळेच घडले.

आदिवासींसोबत काम करायचे ठरवल्यावर प्रथम भाषा शिकलो. नंतर त्यांच्या चालीरिती. त्यांच्यासारख झालं तरच ते आपलसं करतील ही जाणीव झाली होती. हा समाज मुळातच सहिष्णू व गरजा कमी असणारा आहे. आपली संस्कृती आणि समाज यासाठी सजग असलेल्या आदिवासी समाजाने गोटूल ही आपली परंपरा उत्कृष्टरीत्या जपली आहे. सामाजिक निर्णय व निवाडे या गोटूलमध्ये समंतीने होतात. या ठिकाणी झालेले निवाडे कथांद्वारे पुढील पिढीला सांगितले जातात. गोटूल परंपरेविषयी आजही अनेकांना कुतूहल आहे. अनेकवेळा गोटूलचे आयोजन लोकबिरादरीतही केले जाते. समाजाला मार्गदर्शन करणारे व्यासपीठ म्हणून गोटूलकडे आदिवासी समाज पाहतो.

उत्पन्नाचे कायम स्रोत नसल्यामुळे या समाजाला आर्थिक विवंचनेत राहावे लागले. जंगलातील साधनांवर उपजीविका अवलंबून असल्यामुळे हा समाज अर्धपोटी राहायचा. शैक्षणिक जागृती नसल्यामुळे कदाचित ही परिस्थिती उद्‌भवली असेल.

अलिकडच्या काळात शिक्षणामुळे आदिवासी समाजात खूप मोठे परिवर्तन घडून आले आहे. ही बाब अतिशय समाधानाची आहे. आदिवासी समाज आता शेतीकडे वळू लागला आहे. या भागात प्रामुख्याने धानाची शेती होत असली तरी दैनंदिन गरजेसाठी लागणारा भाजीपाला पिकवून स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी अर्थाजन करायला लागला आहे. ही आदिवासींच्या आर्थिक परिवर्तनाची नांदीच म्हणावी लागेल.

गेली ४० वर्षे आदिवासी समाजाची सेवा करताना त्यांच्यातील अनेक गुण व कौशल्य पाहायला मिळाली. विशेष म्हणजे कुंडली व पत्रिका पाहून लग्नकार्य करणाऱ्यांत हा समाज मोडत नाही. लग्नासाठी मुहूर्त वगैरे आजही या समाजाला माहिती नाही. कामाचा हंगाम संपल्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रमासह लग्नसोहळा आणि तोही साध्या पध्दतीने हे आदिवासींचे वैशिष्ट्य आहे. आदिवासींचे भावविश्व अतिशय साधेपणाचे असेच आहे. कुठल्याही माणसावर विश्वास ठेवणारा असा हा समाज आपल्या आर्थिक समस्यात कायम गुंतलेला दिसतो. आपल्या रूढी, चालीरिती व सणवार यांना महत्त्व देणारा हा समाज आता शिक्षण, शेतीविकास व आरोग्य याला महत्त्व देताना दिसून येत आहे. लोकबिरादरीमध्ये रोज शेकडो आदिवासींवर उपचार करताना त्यांची जीवनशैली, सामाजिक प्रश्न, आर्थिक प्रश्न व भावविश्व समजून घेण्याचे असंख्य प्रसंग येतात. त्यातूनच आदिवासींना समजून घेण्याची संधी मिळते. ही बाब कृतार्थ करणारी आहे.

**शब्दांकन : रवि गिते**

**संपर्क : ९४०३२३९२०७**

✶✶

नंदुरबार जिल्ह्याचा पश्चिम भाग, विशेषत: सुदरदेपासून पुढील टप्पा हा 'भिल्लपट्टा' म्हणून ओळखला जातो. या प्रदेशातील भिल्ल समाजातून अभिमन्यू वसावे यांच्यासारखा कार्यक्षम अधिकारी महाराष्ट्राला मिळाला. वसावे यांचा जन्म १७ जून १९३३ रोजी नटावदचा. त्यांचे वडील धनजी गणपत वसावे आणि आई शामारी. सातवी ते अकरावी अर्थात मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण त्यांनी नंदुरबार येथून पूर्ण केले. प्रारंभी त्यांनी उदरनिर्वाहासाठी शिक्षकाची नोकरी पत्करली. जग बदलण्यासाठी शिक्षणाची गंगा घेऊन ग्रामीण भागात गेलेल्या वसावे यांना, तेथे कटू अनुभव आला. पण अपमान गिळून एक वर्ष त्यांनी तेथेच काढले. वर्षभर नोकरी करून त्यांनी पैसे साठवले. त्यानंतर लगेचच नोकरी सोडून ते पुण्यात दाखल झाले.

पुण्यात त्यांना जातीवरून त्रास झाला नाही. तेथील वाडिया कॉलेजमध्ये त्यांनी बी.ए.ला प्रवेश घेतला. अर्थशास्त्र विषय घेऊन त्यांनी १९५७ मध्ये पदवी मिळविली. या शैक्षणिक मिळाले. महाराष्ट्र पर्यटन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक, आदिवासी विकास विभागाचे आयुक्त, भूविकास बँकेचे व्यवस्थापकीय संचालक, धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशा विविध महत्त्वाच्या पदांवर काम करताना कार्यक्षमतेची आगळी छाप त्यांनी उमटविली. सेवानिवृत्तीपूर्वी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवर त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. १९९१ मध्ये ते शासकीय सेवेतून निवृत्त झाले.

वस्त्रमाग, हातमाग व वस्त्रोद्योग उपसंचालक या पदावर सोलापूर येथे काम करतानासुध्दा त्यांनी व्यापक हिताचे अनेक निर्णय घेतले. आदिवासींचा जमीन हस्तांतरणाचा कायदा, कर्जमुक्ती कायदा, आदिवासी विकास महामंडळांतर्गत एकाधिकार धान्य खरेदी योजना, एकाधिकार कापूस योजना, आदिवासी एकात्मिक व परिसर विकास योजना आदी लोकहितकारी योजनांच्या अंमलबजावणीत श्री. वसावे यांनी आपले प्रशासकीय कौशल्य पणाला लावले. आली. त्या वेळी मात्र त्यांनी आठवणीने निर्णय घेत सर्व आश्रमशाळांना आयोडीनयुक्त मीठच वापरण्याचा आदेश काढला आणि त्यासाठी योग्य तरतूदही करून दिली! थेट कांडला येथे जाऊन त्या वेळी या मिठाची खरेदी झाली होती. तेव्हापासून राज्यात या मिठाचा वापर सुरू झाला.

विविध ठिकाणी अधिकारपदावर असताना श्री. वसावे यांचे कर्मचाऱ्यांशी वर्तन माणुसकीचे असे. कार्यालयीन वेळेत चोखपणे काम करावे. वेळ संपताच घरी जाऊन उरलेला वेळ कुटुंबासाठी द्यावा, असा आग्रह ते नेहमी धरीत. कार्यालयाची कामे घरी येणार नाहीत, याची काळजी ते कटाक्षाने घेत. कार्यालयीन कामे घरी येणे ही त्या अधिकाऱ्याची अकार्यक्षमताच दर्शविते, असे ते म्हणत. आपली खाजगी कामे कार्यालयीन कर्मचाऱ्यांना सांगायची नाहीत, यावर त्यांचा कटाक्ष असे.

मुलांना नुसतेच पुस्तकी शिक्षण देण्यापेक्षा जगण्याचे शिक्षण दिले पाहिजे. याच दृष्टीतून ते एकलव्य प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून नव्या पिढीसाठी या वयातही कार्यरत आहेत.

# भिल्ल समाजातील पहिले सनदी अधिकारी



आदिवासी भिल्ल समाजातील पहिले सनदी अधिकारी बनण्याचा मान मिळविणारे श्री. अ. ध. वसावे सेवानिवृत्तीनंतर विसाव्या वर्षीही तेवढ्याच उत्साहाने नव्या पिढीच्या उत्थानासाठी नंदुरबार जिल्ह्यातील त्यांच्या नटावद या गावी कार्यरत आहेत.

आर्हतेवर त्यांना रिझर्व्ह बँकेत नोकरी मिळाली. १९५८ पर्यंत ते रिझर्व्ह बँकेत कार्यरत होते. ही नोकरी करीत असतानाच त्यांनी सर्व्हिस कमिशननची परीक्षा दिली. या परीक्षेतही ते उत्तीर्ण झाले आणि महसूल विभागातील असिस्टंट रजिस्ट्रार को.ऑप. सोसायटी या पदावर त्यांना मुंबईत नियुक्ती मिळाली. १९६६ मध्ये ते डेप्युटी रजिस्ट्रार झाले. १९८० पर्यंत ते याच विभागात होते. पुढे त्यांनी जॉइंट रजिस्ट्रार असा पदभारही सांभाळला. या दरम्यान धुळे, ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर या जिल्ह्यांतून ते बदलून गेले. १९८० मध्ये महसूल विभागातून निवडल्या जाणाऱ्या भारतीय प्रशासनिक सेवेतील पदांसाठी त्यांची नियुक्ती झाली आणि ते पुण्यात रूजू झाले. नव्या पदग्रहनानंतर श्री. वसावे यांच्या कार्यक्षमतेला नवे आयाम आदीवासींची खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारी फसवणूक थांबविण्यात ते यशस्वी झाले.

सातपुड्यातील आदिवासींमध्ये गलगंगडाची मोठी समस्या होती. १९८२ मध्ये श्री. वसावे धुळे जिल्हा परिषदेत मुख्याधिकारी असताना जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अमृतसिंग वसावे यांनी या विषयावर बैठकीत प्रकाश टाकला आणि अतिशय आक्रमकपणे आयोडिनयुक्त मिठाची गरज प्रतिपादन केली. साध्या मिठापेक्षा थोडे महाग असलेले हे मीठ या रोगावरील उपाय ठरणार होते. पण शासकीय प्रणालीत असे निर्णय तातडीने होणे कठीण असते. इच्छा असूनही त्या वेळी त्यांना काही करता आले नाही. पुढे १९८४ मध्ये ते आदिवासी विकास विभागाचे संचालक झाले. त्या वेळी आश्रमशाळांना धान्य व इतर वस्तूंच्या पुरवठ्याची सूत्रे त्यांच्याच हाती सन २०१३ मध्ये ते ७६ वर्षांचे आहेत. त्यांनी आता नटावट येथे घर बांधले आहे. आपल्या पत्नीसह ते तेथे राहतात. नंदुरबारमध्ये कार्यरत असलेल्या एकलव्यामध्ये लक्ष घालतात. एकलव्यचे ध्येय हेच त्यांचेही ध्येय आहे. किंबहुना त्यांच्याच संकल्पनेतून आणि पुढाकारातून उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या जळगाव उपकेंद्राने नंदुरबार येथे हे केंद्र सुरू केले आहे. ग्रामीण आणि आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून, त्यांना उच्चशिक्षणाच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने या केंद्राची स्थापना करण्यात आली. या केंद्राच्या कार्याध्यक्षपदाची जबाबदारी अभिमन्यू वसावे सांभाळतात व तीही विनामोबदला!

– दिनेश चौरे ✶✶

घटनेच्या ५ व्या व ६ व्या अनुसूचीत, घटनाकारांनी आदिवासींसाठी खास तरतुदी करून ठेवल्या आहेत. आदिवासी भागात होणारी लूट, जमीन बळजबरीने व फसवणुकीने बळकावण्याचे प्रकार, सावकारी इ. प्रकाराने होणारे शोषण थांबवण्यासाठी, मागासलेपणातून मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांच्या उत्थानासाठी अनेक कायदे व निर्णयही झालेत. २२ डिसेंबर, १९९५ रोजी पंचायत राज व्यवस्थेसंदर्भात अतिशय महत्त्वाची ७३ वी घटना दुरुस्ती करण्यात आली. त्याला 'पंचायत राज कायदा' संबोधले जाते. मात्र अनुसूचित क्षेत्रासाठी त्यात कोणतीही विशेष तरतूद नसल्याने, अनुसूचित क्षेत्रासाठी खास तरतुदी असलेला नवा कायदा करण्यात आला. २४ डिसेंबर, १९९६ ला पंचायत विषयक तरतुदी (अनुसूचित विस्तारित) कायद्याला राष्ट्रपतींनी मंजुरी देत एका वर्षाच्या मुदतीत राज्य शासनांनी आपापल्या विधिमंडळात कायद्याला पूरक ठरतील असे बदल इतर कायद्यात करण्याबाबत सूचित केले.

पंचायतविषयक तरतुदी (अनुसूचित विस्तारित) कायदा

# लोकशाहीच्या इतिहासातील नवा अध्याय

२४ डिसेंबर, १९९६ रोजी पंचायतविषयक तरतुदी (अनुसूचित क्षेत्रासाठी विस्तारित कायदा १९९६) या कायद्यास राष्ट्रपतींनी मंजुरी दिली. त्यामुळे हा देशातील आदिवासींच्या जीवनात क्रांतिकारी बदल घडविणारा दिवस ठरला आहे. या कायद्यातून स्वत:च्या विकासात प्रभावीपणे सहभागी होण्याची संधी आदिवासी नागरिकांना प्राप्त झाली असून स्वशासनाकडे वाटचाल करणारा असा महत्त्वाचा हा कायदा आहे. देशातील नव्हे तर जगातीलसुध्दा लोकशाहीच्या इतिहासात नवा अध्याय सुरू करण्याची क्षमता असणारा हा कायदा आहे. लोकांच्या सहभागाने राज्यव्यवस्थेवरच निर्णायक प्रभाव करणारा, राज्यकर्त्यांनी प्रशासनाच्या सोयीसाठी निर्माण केलेल्या राज्यसत्तेच्या चौकटीमधील ताठरपणा कमी करणारा, प्रशासकीय निर्णय घेण्याची शक्ती जनतेला प्रदान करणारा हा कायदा आहे. खऱ्या अर्थाने लोकशाहीतील या

डॉ.कांतिलाल टाटिया

संकल्पनेला मूर्त स्वरूप प्राप्त झाले असून लोकशाही मानणाऱ्या, लोकशाहीवर विश्वास असणाऱ्यासाठी, लोकराज्याच्या दिशेने सुरू केलेल्या वाटचालीमुळे आनंदी करणारा आहे. आदिवासींना त्यांचा स्वाभिमान उंचावणारा व स्वत:च्या क्षमतेबद्दल आत्मविश्वास वाढविणारा असा हा कायदा आहे.

**कायदा काय आहे?**

राजपत्रात नमूद केल्याप्रमाणे कायद्याचे शब्दश: भाषांतर करण्याचा प्रयत्न केला आहे. भारताचे राजपत्र रजिस्ट्री सं.डी.एल.३३००४/९६ भाग २ खंड, १ कायदा व न्याय मंत्रालय (विधी खाते) नवी दिल्ली, मंगळवार २४ डिसेंबर, १९९६ पौष ३, १९१८ (शके)

पंचायतीच्या तरतुदींचा (अनुसूचित क्षेत्राला विस्तार) अधिनियम १९९६ नं.४०/ १९९६ अनुसूचित क्षेत्रातील पंचायतीशी संबंधित अशा घटनेच्या ९ व्या भागातील (भागांच्या) तरतुदींच्या विस्तारासाठी नियमन करणारा अधिनियम–

(१) पंचायत अधिनियम १९९६ (अनुसूचित क्षेत्राला विस्तृत/ विस्तारित/ वाढीव) तरतुदी म्हणून हा अधिनियम संबोधला जातो.

(२) या अधिनियमात निराळा उल्लेख नसल्यास अनूसूचित क्षेत्र याचा अर्थ घटनेचे कलम २४४ (१) मधील अनुसूचित क्षेत्राच्या संदर्भानुसार अभिप्रेत आहे.

(३) पंचायत संबंधीच्या घटनेच्या ९ व्या भागाच्या तरतुदी ह्या कलम ४ मध्ये दिलेले अपवाद व फेरफार यांच्या अधीन राहून अनुसूचित क्षेत्राला याद्वारे वाढवून दिल्या आहेत.

(४) घटनेच्या ९ व्या विभागाखाली असे काहीही समाविष्ट असले तरी त्या विभागाखाली राज्य विधिमंडळ असा कोणताही कायदा करणार नाही जो खालील वैशिष्ट्यांपैकी एखाद्या वैशिष्ट्यांशी विरोध करेल. ही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे–

- पंचायतसंबंधी राज्यांनी करावयाचा कायदा हा रूढीचा कायदा, सामाजिक आणि धार्मिक रीतीरिवाज आणि सामुदायिक साधन संपत्तीच्या रूढींनी चालत आलेल्या व्यवस्था यांच्याशी सुसंगत असला पाहिजे.
- खेडे (व्हीलेज, गांव) हे सर्वसाधारण वस्ती अथवा लहान वस्त्यांच्या समूहाचे बनलेले असेल व ज्यात आपापल्या रीतीरिवाजाप्रमाणे परंपरा व रूढींच्या अनुसार कारभार चालविणारे समूह राहतात.
- प्रत्येक खेड्यासाठी (गावासाठी)त्याच्या ग्रामपातळीवरील मतदारयादीत ज्यांची नावे समाविष्ट आहेत अशा व्यक्तींची मिळून एक ग्रामसभा असेल.



■ प्रत्येक ग्रामसभेला परंपरागत रीतीरिवाजाने आणि रूढीने, आपल्या सांस्कृतिक वैशिष्ट्यांची ओळख ठेवून सामुदायिक साधनसंपत्तीचे वाद (तंटे) सोडवण्याचा, पारंपरिक पद्धतीचे रक्षण आणि जतन करण्याचा अधिकार राहील.

■ प्रत्येक ग्रामसभा ही,

१) सामाजिक, आर्थिक विकासाबाबत योजना, कार्यक्रम आणि प्रकल्प हे ग्रामपंचायतीने गावपातळीवर अमलात आणण्यापूर्वी त्यांना ग्रामसभा मान्यता देईल.

२) दारिद्र्य निर्मूलन व इतर योजनांसाठी पात्र अशा व्यक्तींच्या निवडीबाबत अथवा ओळखीकरिता जबाबदार असेल.

■ वरील पोट कलम (ई) मध्ये नमूद केलेल्या प्रकल्प आणि कार्यक्रमासाठी निर्दिष्ट निधी त्याच कामासाठी वापरल्याचे प्रमाणपत्र ग्रामसभेकडून घेण्याचे बंधनकारक असेल.

प्रकल्पासाठी जमिनीचे हस्तांतरण करतांना किंवा पुनर्वसन व प्रस्थापन करण्यापूर्वी संबंधित भागातील पंचायत किंवा ग्रामसभा यांचा सल्ला घेणे बंधनकारक राहील. तसेच अशा प्रकल्पाचे अनुसूचित क्षेत्रातील नियोजन आणि अंमलबजावणी यांचा राज्य पातळीवर समन्वय केला जाईल.

■ अनूसूचित क्षेत्रातील पाण्याच्या व्यवस्थापनाच्या, छोट्या पाणी समित्यांचे नियोजन आणि व्यवस्थापन हे योग्य त्या स्तरावर पंचायतीकडे सोपविले जाईल.

■ अनुसूचित क्षेत्रातील लघुखनिजांसाठी खाणी भाड्याने देण्यासाठी अथवा खाण कामाच्या अनुज्ञप्तींना मान्यता देण्यापूर्वी योग्य त्या स्तरावर ग्रामसभा वा पंचायतीची शिफारस घेणे बंधनकारक राहील.

■ अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना स्वायत्त स्वराज्य संस्था (स्वयंशासित संस्था) म्हणून

■ अनुसूचित जमातींना दिल्या जाणाऱ्या कर्ज व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार.

■ सर्व सामाजिक क्षेत्रातील संस्था व अधिकारी यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार.

■ अनुसूचित जमातींच्या उपयोजनासह सर्व स्थानिक योजनांचे व साधन स्त्रोतांचे नियंत्रण करण्याचा अधिकार.

■ अनुसूचित क्षेत्रातील पंचायतींना स्वयंशासित काम करण्याची सत्ता व अधिकार बहाल करतांना वरिष्ठ स्तरावरील पंचायतींना निम्नस्तरावरील पंयायती व ग्रामसभांची सत्ता बळकावता येणार नाही अशी दक्षता राज्याच्या विधिमंडळाने घ्यायची आहे.

■ अनुसूचित क्षेत्रातील जिल्हास्तरीय पंचायतीतील प्रशासकीय व्यवस्थेची संरचना करताना राज्य विधिमंडळ हे घटनेच्या ६ व्या अनुसूचीत नमूद केलेली व्यवस्था कायम

नवा कायदा समुदायाला 'ग्रामसभा' म्हणून मान्यता देतो व स्वशासन व्यवस्थेचा 'आधरस्तंभ' मानतो. आदिवासी समूहाच्या पारंपरिक रीतीरिवाजांची आवश्यकता व महत्त्व याची जाण ठेवण्याची सूचना हा कायदा करतो. ग्रामसभेला आदिवासींचे पारंपरिक रीतीरिवाज, संस्कृती, सामूहिक संसाधने व पारंपरिक न्यायव्यवस्था जोपासण्याचे अधिकार देतो. वाडी वा पाड्यावरील राहणाऱ्या अतिशय छोट्या जनसमूहाला त्याचे सामूहिक व्यवस्थापन जोपासण्याच्या रचनेचा पुरस्कार करतो. छोट्या पातळीवरील व्यक्ती- व्यक्तीच्या परस्परसंबंधामुळे ग्रामसभेचे कामकाज अधिक प्रभावी व सोपे होईल, अशी अपेक्षा हा कायदा बाळगतो.



■ भारतीय राज्यघटनेच्या ९ व्या भागाप्रमाणे प्रत्येक पंचायतीच्या अनुसूचित क्षेत्रात ज्या जाती-जमातींना राखीव जागा देण्याचे ठरले आहे, त्या पंचायत क्षेत्रातील जागा त्या जमातींच्या लोकसंख्येच्या प्रमाणात असतील. मात्र अनुसूचित जातींच्या राखीव जागांचे प्रमाण एकूण जागांच्या निम्म्यापेक्षा कमी असून चालणार नाही. तसेच पंचायतीच्या पातळीवरील अध्यक्ष वा मुख्यस्तरावरील सर्व जागा या अनुसूचित जमातींसाठी राखीव असतील.

■ अंतर्गत तसेच जिल्हा पातळीवरील पंचायतीमध्ये असनुसूचित जमातीस प्रतिनिधित्व नसल्यास राज्य सरकार त्या जमातीतील व्यक्तीची नेमणूक करील. ही नेमणूक त्या पंचायतीतील एकूण निवडल्या जाणाऱ्या सदस्यांच्या एक दशांश पेक्षा जास्त असणार नाही.

■ अनुसूचित क्षेत्रातील कोणत्याही विकास काम करणे शक्य व्हावे यासाठी योग्य स्तरावर पंचायतींना व ग्रामसभेला शक्ती व अधिकार दिले जातील, असे पाहण्याची जबाबदारी त्या त्या राज्यांच्या विधिमंडळावर राहील ते अधिकार खालील प्रमाणे आहेत.

■ दारूबंदी अंमलात आणण्याचा अथवा मादक पदार्थांची विक्री किंवा उपयोग यावर नियंत्रण ठेवणे वा निर्बंध घालण्याचा अधिकार.

■ लघुवन उपजांची मालकी,

■ अनुसूचित क्षेत्रातील जमीनींचे हस्तांतरण रोखण्याचा अधिकार आणि अनुसूचित जमातीच्या व्यक्तींच्या जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरणाचे पुन:स्थापन करण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याचा अधिकार.

■ कोणत्याही नावाखाली चालू असलेल्या गावबाजाराचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार.

राखण्याचा प्रयत्न करेल.

■ या अधिनियमयाने केलेले बदल व अपवाद याचबरोबर घटनेच्या भाग९ मध्ये काहीही असतांनाही पंचायतीशी संबंधित अशा कोणत्याही कायद्याची कोणतीही तरतूद, जी या अधिनियमास राष्ट्रपतींची संमती मिळण्याच्या तारखेच्या अगदी लगतपूर्वी अनुसूचित क्षेत्रात अमलात आहे व ती घटनेच्या ९ व्या भागातील तरतूदी व त्यांनी केलेले अपवाद व या अधिनियमाने केलेले फेरबदल यांचेशी विरोधी अशी आहे ती तरतूद विधिमंडळाकडून दुरुस्त वा रद्द केली जाईपर्यंत अथवा या अधिनियमास राष्ट्रपतींची मान्यता मिळाल्यापासून एक वर्षाचा कालावधी संपेपर्यंत अमलात राहील.

तसेच अशीही तरतूद करण्यात आली आहे की, त्या तारखेच्या अगदीच लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या पंचायती, ह्या त्या राज्याच्या विधानसभेने अथवा विधान परिषद अस्तित्वात असलेल्या राज्याच्या बाबतीत त्या



राज्याच्या प्रत्येक सभेने या संदर्भात ठराव करून लागलीच बरखास्त केले नसल्यास त्या पंचायती कालावधी पूर्ण होईपर्यंत चालू राहतील.

ग्रामसभेला दिलेल्या विशेष अधिकारामुळे आतापर्यंत अस्तित्वात नसलेली प्रत्यक्ष सहभागाची संधी प्राप्त झालेली आहे. ग्रामसभेला असलेले अधिकार हे खालील गटात वर्गीकृत करता येतील.

- शासकीय योजना व कार्यक्रमासंबंधीचे अधिकार.
- स्थानिक नैसर्गिक संसाधनाच्या नियंत्रणाचे व व्यवस्थापनेचे अधिकार.
- सामाजिक रीतीरिवाज जोपासण्याचे अधिकार.
- आदिवासी क्षेत्रातील कार्यरत संस्थांच्या नियंत्रणाचे अधिकार.
- आदिवासी क्षेत्रातील शोषण थांबविण्याचे अधिकार.

स्थानिक पातळीवर योजनांची पडताळणी, लाभार्थींची निवड, योजनांवरील खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार, जमीन संपादन व पुनर्वसनासाठी ग्रामसभेला शिफारस करण्याचा अधिकार, जमीन, पाणी, लघुखनिज इ. जपण्याचा, राखण्याचा अधिकार प्राप्त झालेले आहेत.

मा. राष्ट्रपतींनी मंजूर केलेल्या कायद्याशी सुसंगत कायदा करण्याचे राज्यविधानसभेत बंधनकारक होते. २४ डिसेंबर, १९९७ पर्यंत असा कायदा करणे बंधनकारक झाल्याने महाराष्ट्र विधानसभेत २६ एप्रिल, १९९७ व विधान परिषदेत ९ जुलै, १९९७ संमत केला गेला.

हा कायदा पूर्वीच्या सर्व कायद्यांपेक्षा भिन्न आहे व त्याचा संबंध अनेक विषयांशी येत असल्याने त्या सर्व विषयांबाबत या कायद्यात आवश्यक त्या सुधारणा करणे आवश्यक होते. कारण नवा पंचायत कायदा व अन्य कायदे यात विरोधाभास राहणार नाही अशी बंधनकारक अट कायद्यातच आहे. म्हणून १) भारतीय वन अधिनियम व संवर्धन कायदा ८०, २)जमीन संपादन कायदा, २) महाराष्ट्र जमीन महसूल कायदा, ४) महाराष्ट्र जमीन पुनर्स्थापन (अनु.जमातीकरिता) कायदा, ५) मुंबई सावकारी कायदा, ६) मुंबई अमली पदार्थ नियंत्रण कायदा, ७) पुनर्वसन कायदा, ८) पाणी परवाना कायदा, ९) किरकोळ खनिज उत्खनन व नियमन कायदा, १०) महाराष्ट्र जि.प. व पं.स कायदा, ११) मुंबई ग्रामपंचायत कायदा, १२) दंडप्रक्रिया संहिता, १३) सोसायटी नोंदणी कायदा वगैरे कायदे विधिमंडळाला अनुसूचित क्षेत्रासाठी बदलावे लागलेत.

या कायद्याने स्थानिक वसाहतीला सामूहिक अधिकार देऊन स्वराज्य निर्मितीचा, त्यांच्या जीवनपद्धतीला केंद्रस्थान मानून, नोकरशाही कारभाराला परिघावर ठेवण्यात आले आहे. कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे आदिवासींच्या सर्व प्रश्नांचे उत्तर मिळाले, सर्व समस्या सुटल्यात, असे जरी होणार नसले तरी गुणात्मक बदलासाठी खूप वाव आहे. कायद्याच्या अंमलबजावणीने अनुसूचित क्षेत्राचा विकास म्हणजेच त्या क्षेत्रातील आदिवासी व गैर आदिवासी या सर्वांचा विकास ही संकल्पना रुजवणे गरजेचे आहे. अनुसूचित क्षेत्राच्या क्षेत्रफळाचा विचार केल्यास महाराष्ट्राच्या एकूण ३,०७,७१३ चौ.कि.मी. क्षेत्रफळापैकी क्षेत्रापैकी ५०,७५७ चौ.कि.मी. क्षेत्रफळ अनुसूचित क्षेत्रात मोडते. कायद्याचे प्रभाव क्षेत्र निश्चितच लहान नाही. लोकशाहीच्या व्यवस्थापकांना, लोकांचे सार्वभौमत्व मान्य करायला लावण्याच्या दृष्टीने ही सुरुवात असून स्वातंत्र्याच्या उष:काली आदिवासींना दिलेले वचन पूर्ण करण्याच्या दृष्टीने चालू असलेला एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

**संपर्क : ९४२२७९१४५०**

✶✶

## जीवनमान उंचावण्यावर भर

**(पान १० वरून)**

शिक्षणासाठी स्वच्छ व आरोग्यदायी वातावरण मिळण्यासाठी आश्रमशाळांच्या इमारती गरजेच्या आहेत. म्हणून शासनाने ४७३ शासकीय आश्रमशाळांना जमिनी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यांचा २२८ इमारती पूर्ण झाल्या आहेत. २१८ वसतिगृहांसाठी जमिनी उपलब्ध झाल्या असून त्यातील ९० इमारतींचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

वनजमिनीवरील आदिवासींचा हक्क, त्यांच्या जमिनी खरेदी करण्यावर निर्बंध यामुळेही आदिवासींच्या जीवनाला स्थैर्य देण्यात येत आहे. परसबाग योजना, दुधाळ जनावरांचे वाटप, कुक्कुटपालन, वीजपंप, तेलपंप यावर अनुदान, शेतकऱ्यांना पी.व्ही.सी, एच.डी.पी.ई पाईपचा पुरवठा, ठक्करबाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम, भूमिहीन दारिद्र्य रेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजना याद्वारे त्यांना जमीन खरेदीसाठी ५० टक्के अनुदान व ५० टक्के कर्ज स्वरूपात निधी उपलब्ध करून दिला जात आहे. पोलीस, सैन्यभरतीसाठी पूर्वपरीक्षा प्रशिक्षण, मोटार वाहनचालक प्रशिक्षण या योजना राबवण्यात येत आहेत.

आदिवासी उपयोजनेद्वारे जमीन विकास कामे, निविष्ठांचे वाटप, रोप संरक्षक साधने व सुधारित शेती अवजारे, पंपसंच, नवीन विहिर, पुष्पोत्पादन विकास, परसबाग, ताडपत्री पुरवठा, तारेचे कुंपण, धान्यकोठी, तुषार व ठिबक सिंचन संच पुरवठा यासाठी १०० टक्के अनुदान दिले जाते. विहिरीची दुरुस्ती, बैलजोडी खरेदी, बैलगाडी, ३०० मीटर पाईपलाइन, नलिका विहीर यासाठी ५० टक्के अर्थपुरवठा केला जातो. थोडक्यात सांगायचे तर आदिवासींचा सर्वांगीण विकास हाच हेतू शासनाने डोळ्यापुढे ठेवला आहे.

**शब्दांकन– आकाश जगधने**
**संपर्क : ७३८७८०३६६२** ✶✶

# जात प्रमाणपत्र पडताळणीचे महत्त्व

**जात प्रमाणपत्र असल्यास केंद्रीय प्रवर्गातील व्यक्तींना संपूर्ण देशात केंद्र शासनाने घोषित केलेल्या सवलती व संबंधित राज्यात राज्य शासनाने घोषित केलेल्या सवलती मिळतात. याशिवाय राज्य वर्ग तसेच प्रवर्गातील व्यक्तींना त्या-त्या राज्यात राज्य शासनाने घोषित केलेल्या सवलती मिळतात. या सर्व सवलती मिळविण्यासाठी जात प्रमाणपत्राची पडताळणी झालेली असणे आवश्यक ठरते.**

शुक्राचार्य गो. दुधाळ

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तींना विविध सवलती मिळवण्यासाठी जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र हे एकमेव साधन आहे. नामसादृश्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न बिगर मागासवर्गीय मोठ्या प्रमाणावर करतात. त्यामुळे जात प्रमाणपत्रांची वैधता तपासण्याकरिता सर्वोच्च न्यायालयाने १९९४ मध्ये दिलेल्या निकालानुसार शासनाने तज्ज्ञांच्या समितींची स्थापना केली आहे.

भारतीय संविधानातील कलम ४६ अन्वये अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींचे शैक्षणिक व आर्थिक संवर्धन केले आहे. कलम २४३ अन्वये राखीव पदांची तरतूद करण्यात आली आहे. कलम ३३० अन्वये लोकसभेत अनुसूचित जाती व जमातींसाठी राखीव मतदारसंघाच्या द्वारा खास जागा ठेवण्यात आल्या आहेत. कलम ३३२ अन्वये विधानसभेत अनुसूचित जाती व जमातींना राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत. कलम ३३५ अन्वये अनुसूचित जाती व जमातींच्या उमेदवारांना सेवा व पदे देण्याचे हक्क दिले आहेत. कलम ३४२ अन्वये जनजातींची यादी जाहिर करण्यात आली आहे.




### आरक्षण आणि जाती

जातीच्या प्रवर्गांची केंद्र तसेच राज्य शासनामध्ये वेगवेगळी यादी जाहीर करण्यात आली आहे. अनुसूचित जाती व जमाती आदेश सुधारणा कायदा १९७६ नुसार केंद्रीय प्रवर्गांमध्ये महाराष्ट्रात अनुसूचित जातींमध्ये सुमारे ५९ जाती असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रवर्गासाठी १३ टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे अनुसूचित जमातींमध्ये पूर्वी ४७ जमातींची नोंद होती त्यापैकी थोटी आणि चोधरा या दोन जाती वगळण्यात आल्या आहेत. त्यामुळे सध्या या प्रवर्गात ४५ जमातींची नोंद असून १३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. इतर मागास वर्गात सुमारे २१६ जातींचा समावेश असून २७ टक्के आरक्षण आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये मात्र या प्रवर्गाशिवाय विमुक्त जमाती अ, भटक्या जमाती ब, भटक्या जमाती क, भटक्या जमाती ड आणि विशेष मागास प्रवर्गांची वेगळी तरतूद आहे. या प्रवर्गातील जातींचा केंद्र प्रवर्गातील इतर मागास वर्गामध्ये समावेश होतो.

केंद्र व राज्य शासनाकडून मागासवर्गीयांना दिल्या जाणाऱ्या सवलतींचे प्रमाण वाढत गेले तसेच काही जाती, जमातींच्या बाबतीत असलेली क्षेत्रीय बंधने शिथिल करण्यात आली. प्रत्यक्ष या मागासवर्गीय जाती व जमातींच्या नसलेल्या परंतु या जाती-जमातींच्या नावाशी साधर्म्य असलेल्या बिगर मागासवर्गीय व्यक्ती मागासवर्गीयांची प्रमाणपत्रे मिळवून शासनाच्या सवलती घेत असल्याचे प्रकार वाढू लागले. या गैरप्रकारांना आळा घालण्याच्या उद्देशाने सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्रांची तज्ज्ञ समितीकडून तपासणी करून वैधता प्रमाणपत्र देण्याची पद्धत १९७९ पासून सुरू करण्यात आली.

### कायदेशीर स्वरूप

माधुरी पाटील विरुद्ध अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे व इतर, विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक १४७६७/९३ सिव्हिल अर्ज क्रमांक ५८५४ / ९४ या प्रकरणात २ सप्टेंबर १९९४ मा. सर्वोच्च न्यायालय यांनी निकाल दिला. त्यानुसार महाराष्ट्र शासनाने यासंदर्भात महाराष्ट्र अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग जातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० हा कायदा केला. जात प्रमाणपत्र देणे व त्याची पडताळणी करण्याच्या प्रक्रियेस कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले.

अनुसूचित जमातींकरिता आदिवासी विकास विभागाने महाराष्ट्र अनुसूचित जमातींचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३ तयार केला. हे नियम महाराष्ट्र शासनाच्या ८ जून २००३ रोजीच्या राजपत्रात प्रसिद्ध झाल्याने या प्रक्रियेस निश्चित स्वरूप प्राप्त झाले. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गासंदर्भात असे नियम सप्टेंबर २०१२ मध्ये तयार करण्यात आले.

सक्षम प्राधिकारी यांनी दिलेल्या जात प्रमाणपत्रांची पडताळणी सामाजिक न्याय व विशेष साह्य विभाग व आदिवासी विकास विभागांतर्गत सुरू असलेल्या विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांद्वारे करण्यात येत आहे. सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीत सध्या राज्यात प्रादेशिक सलगतेच्या निकषावर १५ जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत आहेत. या समितीमध्ये अपर जिल्हाधिकारी अध्यक्ष, उपायुक्त सदस्य तर सहाय्यक आयुक्त यांचा सदस्य सचिव म्हणून समावेश होतो. या समित्यांकडून अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गांच्या जातींच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करण्यात येते.

**कार्यरत समित्या**

आदिवासी विकास विभागाच्या अखत्यारीत महाराष्ट्रात सध्या ८ अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समित्या कार्यरत आहेत. या समित्यांचे कामकाज महाराष्ट्र अनुसूचित जमातीचे प्रमाणपत्र (देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) नियम २००३ नुसार चालते. या समितीमध्ये आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे अध्यक्ष, सहआयुक्त उपायुक्त, उपसंचालक सदस्य सचिव, वरिष्ठ संशोधन अधिकारी, संशोधन अधिकारी यांचा समावेश असतो. दक्षता पथकामध्ये वरिष्ठ पोलीस उप अधीक्षक, पोलीस निरिक्षक पोलीस शिपाई व संशोधन अधिकारी यांचा समावेश असतो. शालेय व गृह चौकशी करून तपासणी समितीने दिलेल्या निर्देशानुसार, इतर चौकशी करून पोलीस कर्मचारी वर्ग सामाजिक दर्जाच्या दाव्यांसंबधी तपास करून अहवाल समितीस सादर करतात.

**पडताळणी दाव्यांची तपासणी**

सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले जातीचे प्रमाणपत्र तात्पुरत्या स्वरूपाचे समजण्यात येते. जात प्रमाणपत्राची तपासणी विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समितीद्वारे केली जाते. विशेषत: उच्च शिक्षणासाठी प्रवेश, केंद्र व राज्य शासकीय कार्यालये, निमशासकीय संस्था, शासनाचे अर्थसाहाय्य घेणाऱ्या व विविध कायद्यांतर्गत पंजीबद्ध संस्थांमध्ये नियुक्ती, व नोकरीत असलेल्यांना पदोन्नतीसाठी तसेच स्थानिक स्वराज्य संस्था इत्यादींमध्ये मागासवर्गीयांच्या राखीव जागांवर निवडणूक लढवण्याकरिता संबधित विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समितीतर्फे जाती दाव्यांची तपासणी करण्यात येते. जाती प्रमाणपपत्र पडताळणी समित्या तज्ज्ञ व अर्धन्यायिक स्वरूपाच्या असून या समित्यांना दिवाणी न्यायालयाचे अधिकार देण्यात आले आहेत. अर्जदाराचे गृह, शालेय व दाव्याबरोबर सादर केलेल्या पुराव्यांची चौकशी करून समितीला अहवाल देण्याकरिता स्वतंत्र दक्षता पथकाची तरतूद करण्यात आली आहे.

## अत्यावश्यक कागदपत्रे

जात प्रमाणपत्राचा दावा करताना मागासवर्गीय अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज, नियुक्ती प्राधिकारी/प्राचार्य यांचे पत्र/ तहसिलदार यांचे पत्र, अर्जदाराचे मूळ जातीचे, जमातीचे प्रमाणपत्र व त्याची साक्षांकित प्रत, अर्जदाराचा प्राथमिक शाळा सोडल्याचा दाखला, जन्म नोंदवहीचा उतारा, अर्जदाराच्या वडील/चुलते/आत्या यांचा शाळा सोडल्याचा दाखला, जन्म नोंदवहीचा उतारा, राष्ट्रीय रजिस्ट्रार उतारा, जातीची नोंद असलेले महसुली पुरावे, आजोबा / चुलत आजोबा / आजोबाची बहीण यांचा शाळा सोडल्याचा दाखला, जन्म नोंद वहीचा उतारा, पणजोबा/चुलत पणजोबा/पणजोबाची बहीण यांचा शाळा सोडल्याचा दाखला, जन्म नोंद वहीचा उतारा, खापर पणजोबा/चुलत खापर पणजोबा/खापर पणजोबा यांची बहीण यांचा शाळा सोडल्याचा दाखला, जन्म नोंदवहीचा उतारा हे पुरावे सादर करणे आवश्यक असते.

**कोणते पुरावे हवेत?**

अनुसूचित जातींच्या अर्जदाराचा जाती दाव्यासाठी १९५० पूर्वीचा, विमुक्त जाती, भटक्या जमातींसाठी १९६१ पूर्वीचा, इतर मागास वर्गासाठी १९६७ पूर्वीचा तर, विशेष मागास प्रवर्गांसाठी १९६७ पूर्वीचा संबधित जातीची नोंद व महाराष्ट्रातील वास्तव्य असल्याचा पुरावा ग्राह्य धरण्यात येतो. अनुसूचित जमातींसाठीदेखील १९५० पूर्वीची संबधित जमातीची नोंद व महाराष्ट्रात वास्तव्य असल्याचा पुरावा तसेच त्या-त्या जमातींच्या चालीरिती, परंपरा, संस्कृती, दैवते, लोककला आदींचीदेखील समितीतर्फे पडताळणी करण्यात येते. वैध ठरलेल्या अर्जदारांना जात वैधता प्रमाणपत्र देण्यात येते तर, जाती दावा अवैध ठरलेल्या अर्जदारांना तसा आदेश समितीतर्फे देण्यात येतो. अवैध प्रकरणांमध्ये संबंधित दावाकर्त्याला उच्च न्यायालयामध्ये अपील करता येते. जातीच्या प्रमाणपत्राचा दावा सक्षम प्राधिकाऱ्याने फेटाळल्यास संबंधित दावाकर्त्याला संबधित विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणीकडे अपील करता येते. अशा दाव्यांमध्ये समिती प्राप्त पुरावे व सुनावणी घेऊन असा निकाल देते.

**जिव्हाळ्याचा विषय**

जनसामान्यांच्या दृष्टीने जात पडताळणी हा विषय अतिशय महत्त्वाचा आणि जिव्हाळ्याचा आहे. विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांच्या कामकाजात पारदर्शकता व गतिमानता येण्यासाठी दैनंदिन कामकाजाचे प्रकाशन होणे महत्त्वाचे आहे. निकाली निघालेली प्रकरणे, दक्षता पथकांकडे प्रलंबित प्रकरणे, सुनावणीसाठी प्रलंबित प्रकरणे अशा याद्या समितीच्या सूचना फलकावर लावणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक समिती कार्यालयात स्वतंत्र तक्रार निवारण कक्षाची स्थापना केल्यास दाव्यासंबधी चौकशी करण्यासाठी आलेल्या अभ्यागतांच्या बऱ्याच प्रश्नांचे निरसन होणे शक्य होईल. प्रलंबित प्रकरणांसाठी विशेष निपटारा मोहीम राबवून दररोज प्राप्त प्रकरणे कमीत कमी कालावधीत निकाली काढणे शक्य होईल.

**संपर्क : ८२७५०५३९५५**

✷✷


# डोंगर-दऱ्यांतील शैक्षणिक क्रांती

सातपुडा पर्वतराजींमध्ये निसर्ग सौंदर्याने नटलेला तितकाच सांस्कृतिक विविधतेने समृध्द असलेला जिल्हा म्हणजे नंदुरबार जिल्हा होय. नंदराजामुळे 'नंदनगरी' या प्राचीन नावाचे नंदुरबार असे नामकरण झाले. पूर्वी धुळे जिल्ह्यातील असलेला हा तालुका १ जुलै, १९९८ रोजी जिल्ह्याचे ठिकाण म्हणून उदयास आला, नंदुरबार जिल्ह्यातील लोकसंख्येचा विचार केला तर एकूण लोकसंख्येच्या ६५.५० टक्के लोक संख्या ही आदिवासी आहे. त्यामुळे नंदुरबार जिल्ह्याच्या विकासाकरिता आणि प्रामुख्याने आदिवासी समाजाच्या विकासाकरिता शासन विविध योजना राबवत आहे. यामध्ये विशेष भर आहे तो शिक्षणावर! त्यामुळे १० वर्षांपूर्वी शिक्षणाच्या बाबतीत प्रगत महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांच्या तुलनेत मागे असलेल्या नंदुरबार जिल्ह्याने नेत्रदीपक प्रगती केली असून, एक नवी शैक्षणिक क्रांती झाल्याचे दिसून येते.

डॉ. लता सुभाष मोरे

महाराष्ट्र शासनाने राबवलेल्या 'सर्व शिक्षा अभियाना'मुळे आज लहानशा पाड्यांवरदेखील शाळा आणि शिक्षकांची सोय केलीय. शाळेच्या बोलक्या भिंती अबोल मुलांना बोलके करण्यासाठी सिंहाचा वाटा उचलत आहेत. केवळ मुलांना साक्षर करणे हा उद्देश न ठेवता ती आत्मनिर्भर व्हावेत, त्यांच्यातील व्यावसायिक कौशल्ये विकसित व्हावीत, याकरिता व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या विविध संस्था जिल्ह्यात उदयास आल्या.

जिल्ह्यामध्ये आदिवासी मुलांना शिक्षण देता यावे याकरिता निवासी शाळांची सोय राज्य शासनामार्फत केली गेलीय. घरापासून दूर अशा निवासी आश्रमशाळांमध्ये राहणाऱ्या ६ वर्षाच्या मुला-मुलींपासून तर महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या युवक -युवतींकडे पाहिले की, आदिवासी समाज शिक्षणाला किती महत्त्व देतो याची कल्पना येते. आदिवासी विद्यार्थी जागतिक स्पर्धेत टिकून राहण्याकरिता महाराष्ट्र शासनाने तालुक्याच्या ठिकाणी सुरू केलेल्या इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी 'My name is Nisha' असं इंग्रजीत सांगतात, हे संक्रमण कौतुकास्पद असंच आहे. शासनाने मुलींसाठी सुरू केलेली मोफत बससेवा, मोफत पास, मोफत वह्या पुस्तके , फी माफी अशा एक ना अनेक योजनांमुळे तळागाळात आणि गाववस्तीपासून लांब असणाऱ्या या आदिम जमातींना शिक्षणाची दालनं खुली झाली आणि त्यांचे जंगलाकडून शहराकडे संक्रमण सुरू झाले.



अ) **पदवीपर्यंतचे सामान्य शिक्षण :**

नंदुरबार जिल्ह्यामध्ये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नित कला, वाणिज्य व विज्ञान या विषयातील पदवी देणारे नंदुरबार, शहादा, नवापूर, तळोदा, अक्कलकुवा, धडगांव, विसरवाडी अशा विविध ठिकाणी २३ महाविद्यालये कार्यरत आहेत.

कला, वाणिज्य आणि विज्ञान या विषयांतून पदवी घेणारे हजारो विद्यार्थी दरवर्षी स्नातक ही पदवी घेऊन बाहेर पडतात. यामध्ये आदिवासी विद्यार्थ्यांचा समावेश फार मोठ्या प्रमाणात असतो. पर्वतराजींमध्ये राहणारे, आपली स्वतंत्र भाषा बोलणारे आदिवासी विद्यार्थी महाविद्यालयाच्या परिसरात वावरताना अस्खलित मराठी, इंग्रजी भाषेमधून संवाद साधतात. विविध कलामध्ये भाग घेवून आपले नैपुण्य दाखवतात. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने नंदुरबारमध्ये विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करून नंदुरबार जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम भागातील विद्यार्थ्यांची सोय केली आहे. त्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

महाविद्यालयीन सामान्य शिक्षणाचा विचार केला तर एकूण विद्यार्थ्यांच्या जवळजवळ ६२.७८% आदिवासी विद्यार्थी कला, वाणिज्य आणि विज्ञान विषयातील पदवी मिळवून पदवीधर होत आहेत. विविध व्यावसायिक शिक्षणासाठी प्रवेश घेऊन व्यावसायिक कौशल्ये विकसित करीत आहेत.

ब) व्यावसायिक शिक्षण :-

**आय.टी.आय. :-**

नंदुरबार जिल्ह्यामध्ये नंदुरबार, शहादा, नवापूर आणि अक्कलकुवा, तळोदा अशा तालुक्यांच्या ठिकाणी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. या संस्थांमधून इयत्ता

८ वी १० वी पास झालेल्या विद्यार्थ्यांना विविध व्यवसायांचे प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर बनविले जाते. आज बरेचसे १० वी उत्तीर्ण आदिवासी विद्यार्थी जे व्यावयायिक प्रशिक्षण घेऊन आपला व आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित आहेत. आदिवासी मुली ड्रेस डिझायनिंग, हेअर ॲण्ड स्किन केअर, फॅशन टेक्नॉलॉजी यासारखे व्यावसायिक प्रशिक्षण घेऊन आत्मनिर्भर बनत आहेत. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये विद्यार्थ्यांना व्यावसायिक प्रशिक्षणाबरोबर निर्वाह भत्ताही दिला जातो. ८ वी उत्तीर्ण अशा शाळाबाह्य मुला-मुलींसाठी कातारी, जोडारी, वायरमन, वेल्डर, तंत्रज्ञ आणि शिवणकाम असे विविध कोर्सेस शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सुरू आहेत. जिल्ह्यातील या संस्थांमध्ये जवळजवळ ८२ टक्के विद्यार्थी हे आदिवासी असतात. आय.टी.आय.मधून उत्तीर्ण झालेल्या अनेक उमेदवारांना सध्या महिंद्रा, टाटा मोटर्स, बजाज, गोदरेज, सुझलॉन अशा अनेक नामांकित कंपन्यांमध्ये रोजगार मिळालेला आहे.

**इंजिनिअरिंग**

जिल्ह्यात उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत शहादा आणि नंदुरबार अशा दोन ठिकाणी असलेली इंजिनिअरिंग महाविद्यालय विविध क्षेत्रातील स्थापत्य शास्त्रज्ञ, स्थापत्य विशारद निर्माण करीत आहेत. पुणे, मुंबई, नाशिक , जळगांव, कोल्हापूर, अमरावती, नागपूर, रत्नागिरी, लोणारे आणि प्रवरानगर येथे जाऊन आदिवासी विद्यार्थी इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत आहेत. गेल्या दहा वर्षाचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की, जवळजवळ ५% विद्यार्थ्यांचा ओढा हा इंजिनिअरींग, पॉलिटेक्निक याकडे आहे. त्यामुळे दऱ्याखोऱ्यामध्ये राहणाऱ्या आदिवासी समाजातून आज विविध क्षेत्रांत इंजिनिअर निर्माण होऊन आपले योगदान देत आहेत.

**वैद्यकीय शिक्षण**

**आयुर्वेद, फार्मसी :** शासनाच्या विविध योजनांचा लाभ आदिवासी विद्यार्थ्यांना मिळत असल्यामुळे वैद्यकीय शिक्षणाकडे आदिवासी विद्यार्थी आता जाऊ लागलाय. दुर्गम, डोंगराळ भागात राहणाऱ्या मुली वैद्यकीय शिक्षण पूर्ण करून डॉक्टर होत आहेत. जिल्ह्यामध्ये उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेली प्रत्येकी १ आयुर्वेद आणि फार्मसी महाविद्यालये अक्कलकुवा व शहादा या ठिकाणी आहेत. या महाविद्यालयात एकूण विद्यार्थ्यांच्या तुलनेत १८% विद्यार्थी हे आदिवासी आहेत. याव्यतिरिक्त मोठ्या शहरांमध्ये वैद्यकीय शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दरवर्षी वाढत आहे. गेल्या ५ वर्षाचा आढावा घेतला असता २००९ साली जिल्ह्यातील जवळ-जवळ ११२ विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणासाठी प्रवेशित झाले. तर २०१२ मध्ये हेच प्रमाण ४९८ वर पोहोचले. यामध्ये जवळजवळ ४२% प्रमाण मुलींचे आहे. काही विद्यार्थीनी नर्सिंगच्या ट्रेनिंगकडे वळत आहेत तर काही आयुर्वेदाचे स्नातक होत आहेत.



**अध्यापक शिक्षण**

**डी.एड्. विद्यालये :** जिल्ह्यामध्ये प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देणाऱ्या २० संस्था आहेत. यामध्ये जवळजवळ २००० विद्यार्थी दरवर्षी प्रवेशित होतात. या २००० विद्यार्थ्यांमध्ये ६७.१२% प्रमाण आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थीनींचे असते. प्राथमिक स्तराप्रमाणे माध्यमिक , उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन स्तरावर कार्य करणारे शिक्षक निर्माण करण्यासाठी जिल्ह्यामध्ये बी.एड्., बी.पी.एड्. व एम.एड्. महाविद्यालये स्थापन झाली आहेत.

**बी.एड्. व एम.एड्. महाविद्यालये :** जिल्ह्यामध्ये माध्यमिक शिक्षक तयार करणारी एकूण ६ बी.एड्. महाविद्यालये क्रीडा शिक्षक घडवणारे १ बी.पी.एड्. महाविद्यालय आहे. यामध्ये दरवर्षी जवळ-जवळ १८०० शिक्षक शिक्षण घेत असतात. यापैकी ५२.१३% शिक्षक हे आदिवासी समाजातून तयार होतात. त्यामध्ये २८.१७% प्रमाण विद्यार्थीनींचे असते.

डी.एड्. आणि बी.एड्. महाविद्यालयात अध्यापक म्हणून कार्य करण्यासाठी शिक्षक-शिक्षक (Teacher Educator) निर्माण करणारी एकूण ४ महाविद्यालये आहेत. या संस्थांमधून दरवर्षी जवळजवळ १६० शिक्षक प्रशिक्षक निर्माण होतात, यामध्ये ७२.३७% शिक्षक प्रशिक्षक हे आदिवासी समाजातून निर्माण होतात.




याचाच अर्थ शिक्षणाच्या सर्वच क्षेत्रात आदिवासी मुलं-मुली आघाडीवर आहेत. राज्य आणि क्रेंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेऊन आज जिल्ह्याच्या अत्यंत दुर्गम भागातील विद्यार्थी शिक्षण घेऊन समाजाच्या व देशाच्या उत्कर्षामध्ये आपले बहुमोल योगदान देत आहेत.

२०११ च्या जनगणनेनुसार ६४.३८ टक्के असणारी साक्षरता पुढील जनगणनेच्या वेळी मात्र १००% असेल अशी खात्री वाटते.

(लेखिका, श्री. सुरुपसिंग हिऱ्या नाईक शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या आहेत.)

✶✶

आदिवासी साहित्य

# वैश्विक साहित्याचा मूलाधार

परिवर्तनवादी वाङ्मय प्रवाहामध्ये समग्र एकात्मिक मानवी जीवन संपूर्ण जीवनसृष्टीसह उभारण्याची क्षमता आदिवासी साहित्याच्या प्रारंभिक अवस्थेमध्येही जाणवते आहे. म्हणूनच हे साहित्य विश्वातील मानवाच्या सार्वभौमत्वाचा उदगार करणारे आणि त्याच्या मूलभूत सामर्थ्यसंपन्न अस्तित्वाचे प्रदर्शन करणारे ठरले आहे. वैश्विक संस्कृतीच्या मूलभूत विचारांचा आधार आदिवासी साहित्याच्या अस्तित्वाला आहे. या साहित्याचे भवितव्य अतिशय प्रगल्भ आणि उदात्त अशा मानवी मूल्यांचे प्रकटीकरण करणारे असे आहे. म्हणूनच सध्याच्या जागतिकीकरणाच्या युगात आदिवासी साहित्य वैश्विक साहित्याचा मूलाधार ठरण्याची शक्यता वाढली आहे.

प्रा. डॉ. माहेश्वरी गावित

आदिवासी साहित्याच्या चर्चेला सुरुवात होऊन सुमारे ४०-४५ वर्षे लोटली आहेत. अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलने होत आहेत. आतापर्यंत नऊ अखिल भारतीय आदिवासी साहित्य संमेलने झाली आहेत. या संमेलनाच्या प्रेरणेतून शिक्षित आदिवासी तरुणवर्ग विचारवेध साहित्य संमेलनांचे आयोजनही करताना दिसतात. त्याचबरोबर दिशावेध ऊलगुलान यासारखी संमेलनेही होताना दिसतात. या संमेलनांच्या निमित्ताने 'आदिवासी साहित्य ' असे एक साहित्याचे स्वतंत्र दालन किंवा वाङ्मयप्रवाह निर्माण झाल्याचे बोलले जाते.

'आदिवासी साहित्य ' या संकल्पनेत ' आदिवासी ' या शब्दाशी ' साहित्य ' हा शब्द थेट जोडला असल्याने, आदिवासी साहित्याची संकल्पना लक्षात घेताना आदिमतेची संकल्पना विचारात घ्यावी लागते. आदिमतेची संवेदना ही सहित्यानिर्मिती करीत असते. 'आदिमता म्हणजे मानवी जीवनाची प्राचीनतम, निसर्गाश्रयी जीवनावस्था'असे मान्य केले, तर 'मानवी जीवनाच्या प्रवाहात या प्राचीनतम अवेशषांसह श्रध्देने व जीवटपणाने आपल्या प्राचीनतम अवशेषांना जपत, जीवन कंठणा-या लोकसमूहांना आदिम' असे म्हणता येईल. यामुळे आदिमतेची स्वतंत्र अशी ठळक वैशिष्टये सांगता येतात. तसा प्रयत्न अभ्यासकांनीकेला आहे.

निसर्गावलंबी कष्टमय जीवन यामुळे आदिवासींच्या जीवनाला करुणा आणि समाधान या संवदेना अधिक चिकटलेल्या असतात. अलीकडील परिवर्तनवादी विचारांनी या जीवनाकडे पाहण्याची दृष्टी, अज्ञान, दास्य, रूढीग्रस्तत, शोषण व अन्याय निवारणासाठी चळवळ अशा स्वरूपाची दिली आहे. त्याचाही परिणाम साहित्यनिर्मितीवर होत आहे. या सर्व वैशिष्ट्यांना 'आदिमतेची जाणीव' किंवा 'आदिमतेची संवेदना' असे नाव देता येईल. या सर्व जाणिवांसह प्रकटणारे साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय.

अशा प्रकारे प्रकटणारे किंवा निर्माण होणारे साहित्य तीन विभागांमध्ये नोंदविता येणे शक्य आहे ते पुढीलप्रमाणे



१) आदिवासी जमातीत जमीन आणि जीवनाने अनुभव विश्वात राहणाऱ्या आदिवासीने निर्मिलेले साहित्य ते आदिवासी साहित्य. २) आदिवासेतर लेखकांनी आदिमतेच्या वैशिष्ट्यांसह निर्माण केलेले काल्पनिक स्तरावरील किंवा भौतिक स्तरावरील आदिवासींचे अनुभूतिविश्व चितारणारे आदिवासी साहित्य. ३) परिवर्तनवादी चळवळीने प्रभावित झालेले, हेतुपूर्वक निर्माण झालेले आदिवासी साहित्य या तीनही प्रकारच्या साहित्याचे वैचारिक आणि ललित सहित्य अशा दोन विभागात परिशीलन करता येणे शक्य आहे. याशिवाय आदिवासी लोकसाहित्याचा स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे, कारण आदिवासी साहित्याला मूलाकार पुरविण्याचे कार्य आदिवासी लोकसाहित्य करीत असते.

'आदिवासी साहित्य' सामान्यत: १९६० नंतर उदयाला आले आणि १९७५ नंतर ते अधिक सक्षम झाले. आदिवासी नवशिक्षितांना शिक्षणामुळे व्यापक सामाजिक भान प्राप्त झाले. स्वातंत्र्य , समता, बंधुत्व व न्याय या मानवी मूल्यांची जाण समाजात नव्याने निर्माण झाली. 'माझे जगणे, माझे अनुभवणे व भोगणे, माझ्या जमातबांधवांचे स्वत्व मी माझ्या शब्दांत व्यक्त करणार ' या भावनेने आदिवासी तरुण वर्ग लिहू लागला. आदिवासेतर लोकांनी सहानुभूतीच्या हेतूने किंवा रंजकतेच्या दृष्टिकोनातून आदिवासी जीवनाचे चित्रण साहित्यातून करायला सुरुवात केली. आदिवासी नवशिक्षित तरुणवर्ग आदिवासींची नागर समाजापेक्षा वेगळी असलेली संस्कृती, त्यांचा गौरवशाली इतिहास, निसर्गावलंबी जीवनसारणी आपल्या साहित्यातून प्रकट करू लागले. या नवशिक्षित आदिवासी तरुणवर्गाला आपल्या समाजाच्या व्यथा साहित्यातून मांडणे आवश्यक वाटू लागले. त्यातूनच आदिवासी

साहित्याची निर्मिती झालेली दिसते. ही निर्मिती करण्याचा अभिव्यक्ती मार्ग आदिवासींनी आधुनिक मराठी साहित्यातील परिवर्तनवादी चळवळी, वाङ्‌मयप्रकार परंपरा यांच्या अनुकरणात शोधला. सुरुवातीची अनुकरणाची अवस्था संपताच तो पूर्णत: स्वतंत्र संवेदनेने आणि आत्मविश्वासाने लिहू लागला. बोली भाषेमध्ये लिहिण्याचे धारिष्ट्य यातून आले.

आदिवासेतर साहित्यिकांच्या निर्मितीमागे शासन यंत्रणेची उभारणी, अभ्यासाचा दृष्टीकोन, सहानुभूती, आपुलकी किंवा कळकळ, उपेक्षित घटक म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन वैचारिक व्यूहाच्या प्रचारातून प्रबोधन, मनोरंजन किंवा कुतूहल, धर्मपरिवर्तन, विद्यापीठीय प्रबंधलेखन या प्रेरणा पाहावयास मिळतात. र. वा. दिघे, वा. व. कर्णिक, वि. वा. हडप, श्री. म. माटे, गो. नि. दांडेकर, दुर्गा भागवत, गोदावरी परुळेकर, अनुताई वाघ, अनिल सहस्रबुद्धे, नलिनी सहस्रबुद्धे, सलीम शेख, बाबा भांड, दीनानाथ मनोहर, मधुकर वाकोडे, एकनाथ साळवे, शंकर भिसे, जगदीश गोडबोले, मनोहर विलास, दिनकर दाभाडे, भगवान भोईर आदी साहित्यिकांनी लेखन केलेले दिसते.

आदिवासेतर लोकांनी आदिवासिंविषयी निर्मिलेल्या साहित्याचा अवकाशाच्या तुलनेत आदिवासींनी निर्मिलेल्या साहित्याच्या अवकाश कमी दिसतो. दुर्गम भागात आधुनिक शिक्षणाची परंपरा उशिरा निर्माण झाल्याने व या ना त्या स्वरूपात विस्कळित स्वरूपात साहित्यात बहुधा हे अंतर राहिले असावे. नैसर्गिक, सांस्कृतिक, सामाजिक, ऐतिहासिक, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरची निष्फळता, परिवर्तनवादी चळवळींचा प्रभाव, राजकीय धोरण आणि व्यवस्थापन यासंबधी विद्रोह विद्यापीठीय प्रबंधलेखन अशा प्रेरणा आदिवासी साहित्यिकांच्या साहित्यनिर्मितीमागील सांगता येतील, असे असले तरी आदिवासी सिाहित्यिकांची साहित्यनिर्मितीमागची महत्त्वाची आणि मुख्य प्रेरणा निसर्ग हीच मानावी लागेल. आदिवासी हे भौतिकदृष्ट्या भलेही मागासलेले आहेत पण सांस्कृतिकदृष्ट्या मात्र प्रगत आहेत.

आदिवासी जमातीतील व्यक्तींनी निर्माण केलेल्या वैचारिक साहित्यात डॉ. गोविंद खरे, डॉ. चामुलाल राठवा, डॉ. विनायक तुमराम, डॉ. मोतीरावण कंगाली, डॉ. माहेश्वरी गावित आदींचा समावेश करता येतो. तर लोकसाहित्याच्या दृष्टीने गंगाराम आवारी, डॉ. गोविंद गारे, डॉ. चामुलाल राठवा, वीरसिंग पाडवी, डॉ. मोतीरावण कंगाली, डॉ. माहेश्वरी गावित आदी अभ्यासकांनी महत्त्वाचे योगदान दिलेले पाहावयास मिळते.

आदिवासींच्या साहित्याचा विचार करता ‘कविता’ हा साहित्यप्रकार विकसित झाल्याचे दिसून येते. तुलनेत कथा, कांदबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी अन्य साहित्यप्रकारात कमी साहित्य निर्माण झाल्याचे दिसते. यामध्ये डॉ. गोविंद गारे, भुजंग मेश्राम, वाहरु सोनवणे, चामुलाल राठवा, डॉ. विनायक तुमराम , उषाकिरण आत्राम , कुसूम अलाम, माधव सरकुंडे, बाबाराव मडावी, नजूबाई गावित, कृष्णकुमार चांदेकर, वसंत कनाके, सुनील कुमरे, प्रभू राजगडकर, वामन शेळमाके, आदिनी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

आदिवासी विचारवंतांनी स्वत:ची नियतकालिके सुरू केलेली दिसतात. अशा नियतकालिकांतून आदिवासी विचारवंतांचे, साहित्यिकांचे स्फुटलेखन मोठया प्रमाणात प्रसिद्ध झालेले दिसते उदा- ढोल, नाहारकंद, तारपा इत्यादी.

आदिवासी साहित्याच्या परिशीलनाचा प्रयत्न करणाऱ्या अभ्यासकांनी इ.स.१९६० नंतरच्या वाङ्‌मयप्रवाहातील एक प्रवाह, एवढ्याच मर्यादेत आदिवासी साहित्यक्षेत्राकडे पाहणे आत्मघातकीपणाचे होणार आहे. याकडेही आदिवासी साहित्यिक व साहित्याभ्यासक यांचे लक्ष वेधणे आवश्यक वाटते.

विविध जमातीतील आदिवासी साहित्यकांनी आपले अनुभवविश्व घेऊन लिहिते होण्याची गरज आहे. आपल्या समृध्द बोलीचा साज लेवून, समृध्द लोकसाहित्याचा बाज घेऊन अवतरण्याची गरज आहे.

✶✶

चराचराकडे समत्वाने पाहण्याची दृष्टी ही मूल्ये केवळ आदिवासी संस्कृतीमध्ये पाहावयास मिळतात. म्हणूनच आदिवासी संस्कृती हीच जगातील सर्व प्राचीनातल्या प्रचीन संस्कृतीची जननी आहे. याबद्दल आदिवासी साहित्यिकांना सार्थ अभिमान आहे. स्वातंत्र्यलढयात सहभागी झालेल्या आदिवासी क्रांतिकारकांची संख्या फार मोठी आहे. पण इतिहासात त्यांना उपेक्षित ठेवले, म्हणूनच आपल्या गौरवशाली ऐतिहासिक परंपरेबद्दलचा अभिमान आदिवासी साहित्यात अपरिहार्यपणे प्रकट होताना दिसतो.



# कोलाम आणि माडिया गोंड

आदिवासींच्या विकासासाठी वेगळ्या स्वरूपाचे विकास प्रशासन असावे असे पंडित जवाहरलाल नेहरू म्हणत. जगातल्या विविध विकास प्रशासनविषयक तज्ज्ञांनीही असेच मत प्रगट केले असून त्याबद्दलची काही वैशिष्ट्ये सांगितली आहेत.



ती विकास प्रशासकांना माहीत असणे आवश्यक असल्याने त्याचा संक्षिप्त आढावा घेणे उपयुक्त ठरेल.

विकास प्रशासनाची संकल्पना नवीन असून एडवर्ड डब्ल्यू. वेइडनर यांनी ही संकल्पना सर्वप्रथम वापरली. इ.स. १९५५ मध्ये श्री. गोस्वामी यांनी हा शब्दप्रयोग केला व नंतरच्या काळात पाश्चात्त्य जगातील फ्रेड डब्ल्यू. रिग्ज, जोसेफ पालोमबारा, आल्बर्ट वॉटरसन, वेईडनर इत्यादींनी तिला पाठिंबा दिला. दुसऱ्या महायुद्धानंतरच्या काळात आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका या खंडांमधील स्वतंत्र राष्ट्र-राज्ये म्हणून उदयास आलेल्या राज्यांमध्ये म्हणजे, 'तिसरे जग यामध्ये अनेक समस्या होत्या. त्यात अर्ध-विकसित किंवा अविकसित अर्थव्यवस्था, सामाजिक गतिकुंठितता, जाती, वांशिक निष्ठा असलेले गट, आदिवासीत्व, निरक्षरता, वाईट आरोग्य, कमजोर किंवा अर्धविकसित राजकीय आणि प्रशासकीय संस्था, तांत्रिक तसेच व्यवस्थापनविषयक कौशल्यांचा अभाव इत्यादी प्रश्न होते. अमेरिकन अभ्यासक जॉन एस. जून यांच्या मते इ.स.१९६० व त्यानंतरच्या दशकात या तिसऱ्या जगात 'विकास' हा महत्त्वाचा प्रश्न ठरला होता. तिसऱ्या जगाच्या समस्येच्या या आव्हानावर पाश्चिमात्य देशांनी जे उत्तर दिले त्याची संकल्पनाच विकास प्रशासनातून प्रगट होते. ओ.पी. द्विवेदी आणि आर.बी.जैन या नमुन्याला पेचप्रसंगाचे व्यवस्थापन आणि पुर्ननिर्माण प्रशासन असे म्हणतात. वास्तविक जेव्हा आपण आदिवासीसाठींच्या प्रशासनाचा विचार करतो, तेव्हा तर हे तिसऱ्या जगांतर्गतचे चौथे जग,

महाराष्ट्रात एकूण तीन आदिम म्हणजेच अतिमागास जमाती होत. त्यात विदर्भातल्या माडिया-गोंड आणि कोलाम व पश्चिम महाराष्ट्रातील कातकरी (काथकरी) यांचा समावेश होतो. मानवशास्त्रीयदृष्ट्या पाहता माडिया-गोंड ही गडचिरोली जिल्ह्यातल्या भामरागड व एटापल्ली तहसिलींमध्ये निवास करणारी जमात, सामाजिक तसेच सांस्कृतिकदृष्ट्या अतिमागास मानली जाते. कोलाम ही चंद्रपूर जिल्ह्यातल्या जिवती, कोरपना, राजुरा आणि वरोरा या तहसिलींमध्ये तसेच यवतमाळ जिल्ह्यांत आढळते. ही जमात सामाजिकदृष्ट्या फारशी मागासलेली नसली तरी आर्थिकदृष्ट्या अतिमागास मानली जाते. सन १९७४-१९७५ च्या सुमारास जेव्हा आदिवासी उपयोजना अंमलात आली तेव्हा आदिम (प्रिमिटिव्ह) जमातींबद्दल विशेष अभ्यास करून त्यासाठी उपयुक्त व लवचीक अशा योजना लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला.

डॉ. श. गो. देवगांवकर

असे जस्टिस कृष्ण अय्यर यांनी वापरलेल्या शब्दांमध्ये त्याचे वर्णन करावे लागते. त्यांच्या जीवनातल्या समस्या आपल्यापेक्षा खूप वेगळ्या व आव्हान देणाऱ्या असतात. सांस्कृतिक, सामाजिक आणि नैसर्गिक/पर्यावरणीय परिस्थितीत, विकासप्रक्रियेमुळे होणारे बदल स्वीकारणे, आत्मसात करणे हे त्यांच्यातल्या जुन्या पिढीला कठीण असते. त्यात अज्ञान, निरक्षरता व अंधश्रद्धांमुळे भरच पडते. अशा परिस्थितीत जेव्हा शासनाचे विकास प्रशासन कार्य करते तेव्हा ती तारेवरची कसरतच ठरते.

विकासासाठीच्या प्रशासनाची काही वैशिष्ट्ये असावी लागतात. त्यामध्ये परिवर्तन पूर्वाभिमुखता, ध्येयविषयक/उद्दिष्टांची पूर्वाभिमुखता, निकालांची पूर्वाभिमुखता : नाविन्यपूर्णता, लाभार्थी पूर्वाभिमुखता, भौतिकतेचा आयाम, सहभागित्व यांचा समावेश आहे.

वरील वैशिष्ट्ये महाराष्ट्रातल्या आदिवासी विकास प्रशासनात आढळतात.

## माडिया-गोंड

माडिया-गोंडांमध्ये, लाहेरी टेकड्यांवर वस्ती करणारे बडा-माडिया आणि भामरागड व तेथून खाली एटापल्लीपर्यंतच्या सखल भागातले छोटा-माडिया हे जास्त आदिम (प्रिमिटिव्ह) बाह्य संस्कृतीशी अत्यल्प संपर्क ठेवणारे आणि एकलकोंडे जीवन जगणारे



होते. ते लाहेरीच्या पुढे बिनागुंडा व कुव्वाकोंडीपर्यंत आदिम पद्धतीने शेती करीत जिला 'फिरती शेती' म्हणजे 'पेंदा' किंवा झूम शेती म्हटले जाई. त्यात कोदो-कुटकीसारखी क्षुल्लक तृणधान्ये उगवीत. यात जंगलातील वृक्षांची अतोनात तोडणी, त्यांना जाळून पावसानंतर केवळ बिया फेकून (पेरून नव्हे) शेती करीत व २-३ वर्षांनी लगतच्या दुसऱ्या भागात जात. असे चक्राकार फिरून सुमारे १२ ते १५ वर्षांनी पुन्हा पहिल्या जागी येत. महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागाने यास आळा घालण्यासाठी फिरती शेती करणाऱ्यांना टेकड्यांवरून खाली आणून वसविले व त्यांना घरे, भांडी, शेती, अवजारे इत्यादी उपलब्ध करून दिली. इ. स. १९५९-६० ते १९६५-६५ या काळात एकूण १३ ग्रामे वसवून त्यात बडा-माडिया व काही ठिकाणी छोटा-माडियांचे पुनर्वसन केले. सुमारे ७१३ व्यक्तींना (१४६ कुटुंबाना) पुनर्वसित केले. हे सर्व कार्य अहेरी जमीनदारीच्या काळातील त्या भागाचे रेंजर वसंतराव पटवर्धन यांच्याकडून समाजकल्याण विभागाने साध्य केले. आदिमांच्या विकासाच्या कार्यात ही एक लक्षणीय नोंद करण्यालायक बाब होय.

**पाण्याची समस्या**

माडियांच्या विभागात पाण्याची समस्या



होती. दूरदुरून पाणी आणावे लागत असे. विहिरी आणि ट्यूब-वेल्स निर्माण करून पाण्याची सोय केली. त्यातील हापशी (पंप) अनेकदा बिघडत असत. तेव्हा माडियातीलच काही तरुणांना त्याच्या दुरुस्तीचे प्रशिक्षण दिले. अनेक ग्रामांमध्ये जिल्हा परिषदेतर्फे मोफत गोबर-गॅस संयंत्र करून देण्यात आले. भामरागड येथे पशुपालन विभागातर्फे मोठे, प्रशिक्षण केंद्र निर्माण करून माडिया युवकांना पशुसंवर्धनाचे प्रशिक्षण. त्यानंतर एक गाय, दुधाचा कॅन व सायकल वाटप झाले. जे माडिया १९७३-७४ पर्यंत गायीचे दूध काढणे व पिणे हे निषिद्ध मानीत तेच आता गाय पाळून सायकलवर भामरागडला जाऊन दूध विकू लागले आणि जिथे ताडी किंवा कोरा (काळा) चहा पाहूण्याला प्यावा लागे तिथे दुधाचा चहा मिळू लागला. सौर ऊर्जेवर चालणारे ट्यूब लाईट्स भामरागड येथे लागले. शाळांमधे मोठ्या ॲन्टीनावरचे टी.व्ही. सेट्स आले. आदिवासी विकास महामंडळातर्फे दुकाने व क्रय-विक्रय केंद्र सुरू केल्याने मोहफुले, धान, चारोळी इत्यादी शासन विकत घेऊ लागले आणि ज्या एक किलो मिठासाठी एक किलो धान किंवा चारोळी माडियांना द्यावी लागे तिथे या केंद्रामधून मीठ व अन्य वस्तूंची विक्री सुरू झाली. वेठबिगारीला आळा बसला.

आदिवासी-उपयोजनेत, प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत ठेवलेल्या 'न्यूक्लीअस बजेट' मधून स्थानिक वैशिष्ट्यांनुसार लहान योजना आखण्याची सोय झाली. त्यातल्या उल्लेखनीय म्हणजे आदिवासींच्या नृत्यचमूंना पोशाख, घुंगरू, वाद्ये इ. पुरविणे त्यांच्या मुंबई, पुणेसारख्या शहरांना सहली नेऊन त्यांना विमानतळ, 'आरे' च्या दुग्धविकास डेअरी, इत्यादींसारख्या गोष्टी दर्शविणे अशा कल्पक योजना राबवण्यात आल्या. याचे परिणाम फारच ताबडतोब आणि विकासाभिमुख झाले. आदिवासींच्या ग्रामाजवळ 'बोडी' (लहान तलाव) करून देणे किंवा जुन्या बोडींचे सखोलीकरण करणे यासारख्या योजना उपयुक्त ठरल्या.

**पाठपुरावा झाला नाही**

विकासाची गंगा निश्चित माडियांच्या ग्रामात व घरांजवळ पोहोचली. जाणीवजागृतीही वाढली. परंतु यात काही दोषही शिरले. प्रामुख्याने काही चांगल्या योजना सुरु झाल्यावर त्यांचा पाठपुरावा नीट झाला नाही. उदा. गोबर-गॅस संयंत्र. त्यात वेळोवेळी जे स्वच्छीकरण व्हायला हवे होते त्यासाठी तांत्रिक साहाय्य न मिळाल्याने ते खराब झाले.

शेतीसाठी ट्रायबल डेव्हलपमेंट ऑफिसरच्या कार्यालयातर्फे डिझेल पंप वाटण्यात आले परंतु डिझेलच्या पुरवठ्याची त्यात सोय नसल्यामुळे ते वापरण्यात आले नाही. काही ग्रामसेवक, शिक्षक किंवा गैर-आदिवासींनी ते फुकटात किंवा शे-पाचशे रुपयात नेऊन स्वतःच शेती केली.

आदिवासींच्या विविध क्षेत्रातल्या व्यक्तीकडून होणाऱ्या शोषण व भ्रष्टाचारामुळे होणाऱ्या पिळवणुकीविरुद्ध देखरेख आणि कणखर पावले उचलणे जरूरी होते, ते न झाल्याने आदिवासींचे कैवारी अशी भूमिका घेणाऱ्या नक्षलवाद्यांना पाठिंबा मिळू लागला व काही माडिया युवक युवती स्वेच्छेने तर काही मजबुरीमुळे त्यांच्यात सामील झाली.

भौतिक लक्ष्यांवर भर देण्यात आला व देखरेख करणाऱ्यांनी केवळ आकडे गोळा करण्यातच धन्यता मानली. प्रत्यक्षात त्याचा काय परिणाम झाला, मनोवैज्ञानिक परिवर्तन किती झाले, प्रवृत्ती किती प्रमाणात विकासाभिमुख झाल्या या गोष्टींकडे दुर्लक्ष झाले.



## कोलाम

कोलामांच्या समस्या व प्रश्न हे थोडे वेगळे होते. त्यांच्या समस्या प्रामुख्याने आर्थिक स्वरूपाच्या होत्या. त्यांच्या जमातीतून आलेले सामाजिक किंवा राजकीय नेतृत्व त्यांच्यात नव्हते. गोंडांचेबाबत ही समस्या नव्हती. कोलाम प्रामुख्याने मजुरी करणारे व शेती करणारे होत. दगड फोडणे, अन्य मजुरी हाच त्यांच्या निर्वाहाचा मुख्य आधार होता. परंतु जंगलातल्या ज्या अतिक्रमणित जमिनीवर ते शेती करीत त्यांचे पट्टे मिळण्यात त्यांना फार समस्या आल्या. रेव्हेन्यू खात्याने तयारी दर्शविल्यानंतरही 'झुडूपी-जंगल' या सदरासाठी त्या जमिनींची नोंद असल्याने अनेक कोलाम कुटुंबांना शेती करण्यापासून वंचित करण्यात आले. (गेल्या दोन महिन्यांपूर्वी याबाबत सकारात्मक निर्णय शासनाने घेतला आहे तो स्वागतार्ह आहे.)

बाहेरच्या मुख्य प्रवाह संस्कृतीशी जास्त जवळचा संपर्क असूनही कोलामांमध्ये अंधश्रद्धा व विवाहविषयक परंपरागत चालीरिती मोठ्या प्रमाणावर आहेत. अहेरीचे जमीनदार स्व. राजे विश्वेश्वरराव महाराज व त्यांच्या कुटुंबीयांनी माडियांच्या अनेक अंधश्रद्धा, दारू पिणे इत्यादींच्या विरोधात प्रबोधन केल्याचा परिणाम, अतिमागास असूनही त्यांच्यावर दिसतो. असे नेतृत्व कोलामांना लाभले नाही. चंद्रपूर जिल्ह्यातल्या जिवती, कोरपना भागातल्या कोलामांचे जीवन हे जास्तच दारिद्र्यमय आढळते. आदिम जमात म्हणून त्यांचे वर्गीकरण आणि नंतर त्यांच्यासाठीच्या विशेष योजना या पण माडियांच्या तुलनेत उशिराच आल्या. त्याचाही हा परिणाम असू शकतो. त्यामुळेच जितक्या बहूविध योजना आदिम जमात म्हणून माडिया-गोंडांमधे राबवल्या त्या तुलनेत कोलामांना मात्र फारसे मिळाले नाही व त्यांच्यातही त्यासाठीची फारशी जागृती आढळत नाही.

गेल्या साठ वर्षात या दोन अतिमागास जमातींमधे झालेल्या विकासाचा हा संक्षिप्त आढावा, झालेल्या प्रयत्नांचे आणि तौलनिक परिस्थितीचे चित्र थोडक्यात दर्शवितो.

**संपर्क : ९८५०३९१५९६**

# आम्ही कोरकू

अमरावती जिल्ह्यातील मेळघाट परिसरात कोरकू ही आदिवासी जमात आढळते. कोरकू लोकांच्या उत्पत्तीबाबत वेगवेगळ्या गोष्टी व दंतकथा आहेत. सातपुडा पर्वतातील गाविलगड डोंगररांगांमध्ये राहणारी कोरकू ही आदिवासी जमात 'मुंडा' या मोठ्या आदिवासी गटातील असल्याचे समजले जाते. तिचे वांशिक व भाषिक नाते मध्यप्रदेशातील पूर्वा जमातीशी जोडले आहे. 'कोरकू' हा शब्द मुंडा भाषेतील असून तो कूर या शब्दावरून आला असावा. 'कूर' या शब्दाचा अर्थ मुलगा असा होतो. तर कोरा म्हणजे रस्ता व कू म्हणजे मनुष्य! थोडक्यात रस्त्यावर राहणारे किंवा सतत भटकणारे म्हणजे कोरकू.

**यादव तरटे**

अमरावती जिल्ह्यातील धारणी व चिखलदरा तालुक्यात कोरकू ही जमात मोठ्या प्रमाणावर आढळत असून मध्यप्रदेशातील बैतूल व निमाड विभागातही आदिवासींचे वास्तव्य आहे. याबरोबरच कोरकूंची बोली हीदेखील वैशिष्ट्यपूर्णच आहे. कोरकू बोली खेरखार भाषा समूहातील असून मेळघाटमधील कोरकूंच्या बोलीवर निमाडी हिंदीचा प्रभाव दिसून येतो. कोरकू आदिवासींबरोबर मेळघाटामध्ये निहाल, गवळी, मोघीया इ. आदिवासी जमाती आढळून येतात.

कोरकूच्या उत्पत्तीबद्दल असे सांगितले जाते की, एकदा रावणाने सातपुडा पर्वतावर मनुष्याची वस्ती नाही असे पाहिले तेव्हा त्याने महादेवाला तेथे मनुष्यांची वस्ती तयार करण्यास सांगितले. महादेवाने कागेवर नावाच्या कावळा या पक्षाला पाठविले. सातपुडा पर्वतरांगांमध्ये तांबड्या मातीचे वारूळ पाहावयास सांगितले. कागेवराला असे वारुळ बैतूलजवळ सावलीगड व भैरवगड या परिसरात आढळले. त्यानंतर महादेवाने तिथल्या मातीच्या नर-नारीच्या बाहुल्या तयार केल्या. पण इंद्रदेवाने पाठविलेल्या घोड्याने त्या बाहुल्या दोनदा मोडून काढल्या. असे झाल्याने महादेवाने एक कुत्रा तयार केला व त्यामध्ये जीव घातला. नराचे नाव मुला व नारीचे मुलाई असे ठेवले. हेच कोरकूंचे पूर्वज होय.

कोरकू जमातीचे लोक काळ्या रंगाचे, गोल चेहऱ्याचे, मध्यम उंचीचे असून त्यांचे नाक थोडे चपटे असते. कोरकू आदिवासींची घरे ही दोन रांगामध्ये पूर्व-पश्चिम समांतर असतात. बरेचदा छत एकमेकांस टेकलेले असून अत्यंत ठेंगणे असते. कुडाच्या भिंती व गवताची शाकारणी, कौलाचे छत असून घरामागे गुरांचा गोठा असतो. घरातील धान्याची कोठी व इतर रचना सारखी असून भात, कुटकी हे त्यांचे महत्त्वाचे खाद्य आहे. याबरोबरच गावाच्या मधोमध कडुनिंबाच्या झाडाखाली मुठवा नावाच्या देवाची स्थापना केली जाते. देव उभट दगडाचा असून त्यावर छत नसते. कोरकूचे मुठवा हे मुख्य श्रद्धास्थान आहे. कोरकू लोक आपल्या वंशाचा संबंध रजपूत वंशाशी असल्याचे सांगतात. एके दिवशी त्यांचे पूर्वज शिकारीसाठी एका हरणाच्या मागे लागले. ते हरीण धावत-धावत पंचमढी परिसरातील एका गुहेत शिरले. हरीण बाहेर येण्याची वाट पाहत असतांना तिथे त्यांना एक संन्याशी दिसला. त्याने मूठभर तांदूळ देऊन शिकाऱ्यांना शिजवायला लावले. परंतु एवढ्याशा मूठभर भाताने भूक कशी भागेल. असा शिकाऱ्यांनी



संन्याशाला प्रश्न केला. तेव्हा संन्याशाने उत्तर दिले की, हरणाचे प्रत्यक्ष रूप घेऊन महादेवाने तुम्हाला या गुहेपर्यंत आणले असून तेथे तुम्ही लोकवस्ती करावी. त्यानुसार कोरकूंनी या भागात वस्ती केली असे समजले जाते. आजही पंचमढीला महादेवाचा वंशपरंपरागत रक्षक म्हणून कोरकू जमीनदारच आहे.

आर्यांनी दक्षिणेकडे मुलूखगिरी सुरू केल्यानंतर त्यांचे या वन्य जातींशी संघर्ष सुरू झाले. ज्या वन्यजाती आर्यांपुढे टिकाव धरू शकल्या नाहीत किंवा ज्या आर्यांमध्ये समाविष्ट होऊ शकल्या नाहीत, त्यांनी जंगलाच्या पहाडी दऱ्याखोऱ्यात आश्रय घेतला व आपले सांस्कृतिक, भौगोलिक, सामाजिक अस्तित्व निर्माण केले. कोरकू आणि रावणाचे नाते परस्परपूरक असून कोरकू स्वत:ला वीरत्वाचे प्रतीक मानतात. कृष्णवर्णीय असलेले कोरकू लोक काही भागात एका विशिष्ट वनस्पतींची बी जाळून ती मनगटावर दाबून फोड आणतात. असे चट्टे बऱ्याच कोरकूच्या हाताला आढळतील. थोडक्यात हनुमानाने लंका जाळली. त्यानंतर रामाने रावणाचा पराभव करून त्यास ठार मारले. रावण स्वर्गात गेला. त्याच्याबरोबर मरण पावलेले सर्व स्वर्गात गेले. स्वर्गात जाणाऱ्या प्रत्येकाला विचारीत असे तू माझ्यासाठी काय केले ? त्यावेळी हातावरील व अंगावरील डाग दाखवत म्हणत आम्ही तुमच्यासाठी लढाई केली. त्याचीच ही खूण आहे.

फार प्राचीनकाळी मेळघाटामध्ये दैत्यांची वस्ती होती. अशी एक दंतकथा असून एकदा त्यांनी कोरकूंवर हल्ला केला. त्यात बहुतेक सर्व लोक भक्ष्यस्थानी पडले. दैत्य गेल्यानंतर उरलेल्या थोड्या लोकांनी आपल्या मुलांबाळांचा तपास केला. एक मुलगा शिवण नावाच्या झाडाखाली बसलेला आढळला तेव्हा त्याला 'बैठे', दुसरा मातीच्या ढिगाऱ्याखाली बसलेला आढळला, त्याला 'घाफडी' किंवा 'कासदा' कोरकू भाषेत कासदा म्हणजे माती होय. तिसरा मातीच्या ढिगावर बसलेला आढळला. तेव्हा त्यास 'अखंडे' तर चौथा पाण्यात आढळला. त्याला 'मावशी' म्हणू लागले. पुढे त्यांचा विस्तार वाढत गेला. म्हणजेच अखंडे, बैठे,कासदा, मावशी, सोसो, चिलाटी, जांबू, चिचा, खोटा, भिला, भुसूम, सेलू, भिकार, चुथर, दारशिंबा, ठाकूर इ. गोत्राची निर्मिती झाली.

कोरकू जमातीत पुरुषांची नावे बाटू, बुडा, दालू, बिदी, कालू, टेपा, भोट्या, साजू, मानू, खानू, गाणू, तुमला, फालतू तर स्त्रियांची नावे बुडी, मिनू, हिरा, जानकू, मागणी असून भूसूम, कासदेकर, भिलावेकर, बेठेकर अशी



आडनावे आहेत. मेळघाट परिसरात याच कोरकू जमातीला अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण या मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो.

**पोशाख व शरीररचना**

काळा रंग, ठेंगू बांधा, चपटे पसरट नाक, जाड फिक्कट पोट अन निरागस डोळे व रंगाने बहुधा काळे हे कोरकूंचे वैशिष्ट्य आहे. हे लोक कष्टाळू जीवन जगणारे असून स्त्रियांचे डोळे आकर्षक असतात. कानात कानबाळ्या, हातात अंगठ्या, मनगटात कडे, कमरेला कळसूत्र स्त्रियांचे आवडते दागिने आहेत. कोरकू स्त्री ठेंगणी, किंचित उजळ, पसरट नाकाची व प्रमाणबद्ध शरीराची असते. अंगात अर्धवट चोळी, पाठीमागचा भाग उघडाच, लुगडे नेसत असून डोक्यावर पदर असा पारंपरिक पोशाख असतो. तर पुरुष फेटा, सदरा, धोतर परिधान करतो.

सद्य:स्थितीत मात्र मेळघाट परिसरात काही जुन्या सुरकुत्या पडलेल्या शरीरावरच हे पोशाख आढळतात. शहराशी वाढत्या संपर्कामुळे, टीव्ही, मोबाइलच्या आकर्षणापोटी कोरकूंच्या पोशाख पद्धतीत बदल होत असल्याचे निदर्शनास येते.

**कोरकूंचे धार्मिक विधी नामकरण विधी**

कोरकूंचे धार्मिक विधी बाळाच्या जन्मापासून सुरू होतात. या विधीमध्ये बाळ जन्मल्यानंतर नामकरण विधी पार पाडला जातो. यावेळी गावातील एक जाणकार म्हातारी जिला 'सायनी बुढी' म्हणतात. ती देवपूजा करते व बाळ–बाळंतिणीला आंघोळ घालते. यावेळी वेगवेगळी गीते गायली जातात. नामकरण विधीतले पाळणागीत हे महत्त्वाचे समजले जाते.

चार खुट, चार भवान<br>
रामा ठाकूर रेखा जले<br>
पाँचो महिने का लोई<br>
नऊ महिने के बालक<br>
सोने की थाली, अंगे धुलाये ।।१।।<br>
सोने के झुला झुलाया<br>
आँख के दिया, हाथ का पालना<br>
और गोदी की पालकी<br>
झुला झुलाया ।।२।।<br>
तेरी माँने मिशरी दुध पिलाई<br>
गा गा गीत सुनाई<br>
झुला झुलाया ।।३।।

वरील प्रसंगी शेजारपाजारातील कोरकू



स्त्रिया एकत्र येतात व जन्मलेल्या बाळाला पाळण्यात घालताना हे गीत गातात. यामध्ये बाळाला संबोधून तुला श्रीरामाने जन्म दिला. पाचव्या महिन्यात तुझ्या अंगात रक्त आले. नवव्या महिन्यात तुझा जन्म झाला, सोन्याच्या ताटात तुझी अंघोळ केली असून सोन्याच्या पाळण्यात तुला झोके देत आहेत. अशा पद्धतीने या गीतामध्ये बाळा तुला जन्म श्रीरामाने दिला असा उल्लेख केलेला आहे.

**विवाहविधी**

विवाह ही कोरकूच्या जीवनातील अत्यंत महत्त्वाचा विधी असून कोरकूमध्ये बालविवाहाची प्रथा दिसून येत नाही. विवाहाचे वय निश्चित नसले तरी वयात आल्यानंतरच लग्नविधी संपन्न होतो. कोरकूंच्या विवाहपद्धतीमध्ये बरेच प्रकार असून ती प्रगल्भ

अशी आहे. विवाहविधीमध्ये वधूला महत्त्व असून वराला वधुमूल्य द्यावे लागते. जो वर वधुमूल्य देऊ शकत नाही अशा मुलाला सासऱ्याकडे सेवा करून वधुमूल्याची परतफेड करावी लागते. अशा जावई मुलाला 'लामजण्या' असे म्हणतात. कोरकूमध्ये शक्यतोवर परस्परांच्या संमतीनेच विवाह ठरतो. विवाह जुळवण्यामध्ये आई-वडील व आप्त परिवाराची भूमिका महत्त्वाची असते. या पद्धतीला 'बाली ढंडणा' असे म्हणतात. या विधीमध्ये नवरी मुलगी व नवरा मुलगा यांना एका चादरीत गुंडाळून त्यांच्या अंगावर पाणी ओततात. ही विशेष पद्धत असून मंगळसूत्र बांधून नृत्य केले जाते. कोरकू विवाहपद्धतीमध्ये परंपरागत पुरोहित म्हणून 'भूमका' हा लग्नविधी पार पाडतो. लग्नमंडप हा बारा खांबांचा असून एक मोहाचं, एक सालईचं व बाकी इतर झाडांचे खांब असतात तर छपरावर जांभूळ झाडाच्या फांद्या व पाने झाकतात.

**अंत्यविधी**

कोरकू हे स्वत:ला हिंदू मानतात. यांच्यामध्ये मृतांना पुरण्याची पद्धत आहे. पुरलेल्या जागेवर दगडांचा ढीग करून भात व पाणी ठेवतात. मृताला पुरल्यानंतर मृताच्या नावाचा एक खांब गावाबाहेर विधिपूर्वक रोवला जातो. मृत्यूपासून चार ते पाच वर्षात शिडोली करतात. यादरम्यान दोन वर्षाच्या आत मृतात्म्यास जागवण्यासाठीचा 'फुलजागणी' हा कार्यक्रम वैशिष्ट्यपूर्ण आहे. होळी सणादरम्यान गावातील पोलीस पाटील, भूमका व इतर गावकरी मंडळी सायंकाळच्या वेळेला होळी पेटविण्यासाठी जात असतांना वर्षभरात मृत पावलेल्या व्यक्तींची आठवण म्हणून त्या घरातील संबंधित स्त्रिया मोठ्याने रडून आपल्या स्मृतींना उजाळा देतात. असे केल्याने त्यांच्या मृतात्म्यास शांती मिळते असा त्यांचा समज आहे.

**कोरकूंचे सण व उत्सव**

मेळघाटातील आदिवासी जमात कोरकू स्वत:ला रावण व रावणपुत्र मेघनाथाचे भक्त जरी मानत असले तरी राम व हनुमानाचा त्यांच्या संस्कृतीमध्ये असलेला समावेश त्यांच्या संस्कृतीचे वेगळेपण सिद्ध करते. कोरकूंच्या जीवनामध्ये सण, उत्सव व बाजार याला महत्त्वाचे स्थान आहे.

कोरकू आदिवासींमध्ये बाजाराप्रती प्रचंड श्रध्दा असून त्यांच्या संस्कृतीतील 'घुंगरु बाजार' हा प्रसिद्ध असा आहे. दिवाळीनंतर पाच दिवस हा बाजार सलग चालत असतो. पाचही दिवस स्त्री-पुरुष वयात आलेली मुले-मुली मोठ्या थाटामाटात पारंपरिक पेहराव घालून घुंगरू, ढोलकी व बासरीच्या नादात तल्लीन होऊन नाचतात. या बाजारामध्ये वयात आलेली मुले व मुली आपल्या जोडीदाराची निवड करतात. काही दिवसांनी विधिवत लग्न करून दिले जाते. याबरोबरच देवीपूजा ही महत्त्वाची प्रथा आहे. या सणादरम्यानच जिरोती हा महत्त्वाचा सण असून यामध्ये डोलार गीते म्हटली जातात.

बाबूके अंगणा, चंदना की झाड<br>
कोयल बोले ।।धृ।।<br>
कोयल बोले बाबा, कोयल बोले<br>
काले काला बोले, बाबा कोयल बोले ।।१।।

'जिरोती' सणाच्या वेळी बोलले जाणारे हे गीत झाडाच्या फांद्यांना झोपाळा बांधून त्या झोक्याच्या तालावर हे गीत म्हटले जाते. याबरोबरच आपल्या प्रियकरासाठी माझे मन व्याकूळ झाले आहे. हे प्रियतमा तुझी आठवण सुटता सुटत नाही. तुझ्या मिलनासाठी मी आतुर झाली आहे. अशा भावना खालील गीतात प्रेयसी व्यक्त करते.

जिरोती से आए पिऊ<br>
पोला मे चले<br>
हेरे पिऊ रणसाठी<br>
मन झुरे।।१।।<br>
आवो वा राजा<br>
पिऊ पलंगो मे सोने<br>
हेरे पिऊ रणसाठी<br>
मन झुरे।।२।।

**कोरकू आणि वन्यजीवन**

कोरकूंचा जंगलाशी घनिष्ठ संबंध आहे. जंगल व आदिवासी यांचे जीवन परस्परपूरक असून पूर्वीपासून चालत आलेल्या आदिवासी समाजाच्या रुढी परंपरांमध्ये जंगलाचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. मोह, वड, पिंपळ, पळस, उंबर, जांभूळ या वृक्षांचा त्यांच्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंध असून प्राणी, पक्षी, फुलपाखरे, कोळी यांचाही अप्रत्यक्ष संबंध येतोच.

कोरकूंमध्ये वाघाला विशेष महत्त्व आहे. कोरकू आदिवासी जमात ही वाघाला कोरकू भाषेत कुला या नावाने ओळखतात. त्यांच्या संस्कृतीत वाघाला, कुलामामा म्हटले जाते. कोरकू भाषेत प्राणी, पक्षी व इतर जीव यांना



होळी हा कोरकूंचा सर्वात मुख्य सण असून होळीच्या महिनाभर ढोलक, टिमकी, बासरी इ. च्या वाद्यात स्त्री-पुरुष एकत्र नृत्य करतात. रानगोवऱ्या, लाकडे, बांबू इ. गोळा करून गावचा मुखिया पटेल याच्याकडून होळी पेटवली जाते. नवे कपडे घालून रात्रभर नृत्य करतात. दुसऱ्या दिवशी रंगोत्सव साजरा केला जातो. होळीच्या सणादरम्यान रस्त्यावर उभे राहून, नृत्य करून फगवा मागतात. होळीच्या शेवटच्या दिवशी कोरकू एका विशिष्ट जागी एकत्र येतात. एक खांब गाडून त्याच्या टोकावर सव्वा रुपया व नारळ बांधला जातो व त्यानंतर मुले खांबावर चढण्याचा प्रयत्न करतात. त्यांना रोखण्यासाठी स्त्रिया व तरुणी काडीने टोचतात हा रम्य सोहळा गावातील सर्व लहान, तरुण, वृध्द आनंदाने साजरा करतात.



वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. मी मागील १२ वर्षांपासून मेळघाट परिसरामध्ये वन्यजीव व आदिवासी कोरकू समाजाच्या अभ्यासासाठी फिरतो आहे. यातूनच कोरकू व त्यांच्या एकंदरीत जीवनपद्धतीबद्दल जाणून घेतांना त्यांचे वन्यजीवविषयक ज्ञान जाणून घ्यावे, अशी कल्पना माझ्या मनात आली. यातून बऱ्याच गोष्टी पुढे आल्या. नवनवीन माहिती मिळाली व कोरकू भाषेतील प्राणी व पक्ष्यांची विविध नावेही माहीत झाली. ती खालीलप्रमाणे –

| कोरकू नाव | मराठी नाव | हिंदी नाव |
|---|---|---|
| कुला | वाघ | बाघ |
| घोतडी | हरीण | हिरण |
| डोंगरसीटा | रानकुत्रा | जंगलकुत्ता |
| डोंगरसीम | रानकोंबडी | जंगलमुर्गी |
| बाणा / रिस | अस्वल | भालू |
| काटकोम | कासव | कछुआ |
| उटो | उंट | उँट |
| एत्थी | हत्ती | हाथी |
| डोंगरएला | रानम्हैस | जंगलभैस |
| कक्कू | मासळी | मछली |
| कंठा | निलकंठ | निलकंठ पक्षी |
| किल्ला/कल्ला | माकोडा | मकोडा |
| कवडा | कावळा | कौआ |
| की | चिचुंद्री | छुछुंदर |
| केखेमरेड | सरडा | गीरगीट |
| कफलीज | फुलपाखरु | तितली |
| जगलमलाम | कोळी | मकडी |
| चतराय | चतूर | चतूर |
| चिचेरे | बटेरपक्षी | बटेर |
| मुरार | सर्प गरुड | साप खानेवाला गरूड |
| चेडेकेडे | बेडकांची पिल्ले | मेंढक के बच्चे |
| जीकडा | साळींदर | सायल |
| टाफू | रातवा | रातवा |
| डुंबुस्कु | मधमाशी | सहदकी मक्खी |
| डुडा | घुबड | उल्लू |
| डेड्डा | बेडूक | मेंढक |
| धोपर | तडस | तरस |
| नागोबीन | नाग | नाग |
| पिपीनजोर | काजवा | जुगनू |

एकूणच कोरकू समाज व वन्यजीवन यांचा घनिष्ठ संबंध यातून स्पष्ट होतो. सण, उत्सवाबरोबरच त्यांच्या दैनंदिन जीवनातील आहारामध्ये यांचा समावेश आहे. मासे, खेकडे पकडतांना, मेळघाट परिसरातील नद्यांमध्ये कोरकू, पुरूष व स्त्रिया दिसून येतात.

कोरकूंचे जंगलावरील अतिअवलंबित्व तसेच 'कुमरी' या प्रकारची शेती त्याबरोबरच वाढती गुरेचराई यांचा वन्यजीवनावर परिणाम झाल्याचे दिसून येते. यातूनच व्याघ्र संवर्धन तसेच मुंगीपासून ते वाघापर्यंतच्या जंगलातील जैवविविधतेने, समाविष्ट असलेल्या अन्नसाखळीतील प्रत्येक घटकाच्या संवर्धनाच्या हेतूने, मेळघाटासारख्या जंगलातून कोरकूंचं पुनर्वसन होत आहे.

ग्राम बारूखेडा, अमोना, धारगड, वैराट या सारख्या पुनर्वसित गावांमध्ये कोरकूंची संस्कृती टिकवण्याचे आव्हान कोरकू आदिवासी समाजापुढे उभे आहे. दुसरीकडे कोरकू आदिवासी जमातीच्या सहकार्यातून रिकाम्या झालेल्या जंगलाच्या ठिकाणी वाघ, बिबट, हरिण, रानगवे इ. प्राण्यांचा मुक्त वावर होत आहे. थोडक्यात कोरकूंच्या सहकार्यातून महाराष्ट्र शासनाने केलेल्या पुनर्वसनाच्या धोरणाचं यशस्वी बीजारोपण झाले आहे.

**संपर्क: ९७३०९००५००**

* *



## संवेदनशील आणि नादमय

**पान (२८ वरून)**

याला दंडेल नृत्य म्हणतात.

चांदनी रातो कोकोडो
चांदनी रात कुलडै लाला ।। धृ ।।
भवाके मे तो भवाडे
बेटा हो तो कुँवा खुदाये
एकीजा टिकासो मारे ओके
अंगुलै भर भर पैने रे लाला ।।
चांदनी रातो कोकोडो चांदनी रात कुलडै लाला ।।

अर्थ : पुरुष चांदण्यारात्री नाच करीत आहेत, मुले मुली पण नाच करीत आहेत.

भवईच्या सणाच्या काळात विहीर खणली तर अन्न धान्य चांगले येईल. एकानेच टिकास मारली तर अंगुलीमात्र पाण्याचा झरा लागेल.

ध्वनितार्थ असा की सर्व पुरुषांनी येऊन पाण्याची सोय होण्यासाठी विहीर खणावी.

दुसरे गीत स्त्रीसंबंधी आहे.–

सुंदर गोबीन म्हाऱ्यो रे, गोबीन म्हाऱ्यो रे ।।
कायेरी साना गोबीन म्हाऱ्यो रे ।
बिडा रे साना गोबीन म्हाऱ्यो रे ।। १ ।।

अर्थ :–

ही सुंदर स्त्री – गोबिन (नाव) मोरासारखी आहे. हे पती/प्रौढ पुरुषा, मोरासारख्या, गोबिनकडे जा, ऊठ आणि गोबिनकडे जा.

रांडभावे कार्यक्रमात मुली व लहान मुलेही नाचत असतात. मुली म्हणतात ती काही गाणी पुढे दिली आहेत.

देदरा माता पानी दे, पानी दे ।।
पानी कायोम, सेरोम, सेरोम,
देदरा माता पानी दे, पानी दे ।।

पुनः पुनः याच ओळी म्हणण्यात येतात.

अर्थ : हे वैशाखातील मुलांच्या उत्सवाच्या देवी, (देदरामाता) पाऊस येऊ दे, खूप जोरात पाणी लागू दे.

स्त्रीच्या आदर्श सौंदर्याच्या वर्णनासाठी ज्या उपमा, उत्प्रेक्षा वापरल्या आहेत त्या त्यांच्या भाषासमृद्धीची साक्ष देतात. या तीन गीतातले शेवटचे गीत लहान मुले म्हणतात तेव्हा एकाच्या डोईवर लहान माठात पाणी टाकून त्यात एक बेडूक (देदरा माता) टाकलेले असते. त्यामुळे भरपूर वृष्टी होईल ही अपेक्षा असते.

वरील दोन्ही जमातींच्या संस्कृतीतली वैशिष्ट्ये, निसर्गाशी तादात्म्यता, आणि त्यातील उपमानांचा अत्यंत चातुर्याने केलेला उपयोग व वापर हा लक्षणीय होय. आदिवासींमध्ये परंपरने प्राप्त केलेले किती चातुर्य व सौंदर्यदृष्टी आहे ते या उदाहरणांवरून लक्षात येते.

* *

# किनवटची आदिम संस्कृती

**प्रा. अंकुश सुरवसे**

मराठवाड्यातील आदिवासी क्षेत्राचा विचार करतांना नांदेड जिल्ह्यातील किनवट-माहूर या दोन तालुक्यांचा प्रथमत: उल्लेख करावा लागतो. हे दोन्ही तालुके आदिवासीबहुल म्हणून ओळखले जातात. एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात ४० टक्के एवढे आदिवासींचे प्रमाण या दोन्ही तालुक्यात आढळते. हा सर्व परिसर डोंगराळ व जंगलांनी व्यापलेला असून महाराष्ट्राच्या पूर्व टोकावर वसलेला आहे. म्हणूनच किनवट येथे महाराष्ट्र शासनाने प्रकल्प कार्यालयाची निर्मिती करून आदिवासींच्या विकासाच्या अनेक योजनांना चालना दिली आहे.

किनवट-माहूर परिसराला ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक असा समृद्ध वारसा लाभलेला आहे. माहूर परिसरात सातवाहन पूर्व काळापासूनच्या अवशेषांचा आढळ होतो. तर उर्वरित भागात सातवाहन व त्यानंतरच्या म्हणजेच वाकाटक, राष्ट्रकूट, यादव, गोंड, बहमान इत्यादींच्या अवशेषांचा आढळ होतो. माहूर हे साडेतीन शक्तिपीठांपैकी एक आहे. गुरू दत्तात्रयांच्या जन्मस्थानाचा मान हा माहूरकडेच जातो. किनवट-माहूर परिसरात गोंडकालीन गढ्यांचे अवशेष विपूल आहेत. गोंड लोकांची गावे व गढ्या हा स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो.

या परिसरात आढळणाऱ्या मुख्य आदिवासी जाती म्हणजे गोंड, कोलाम, प्रधान, थोटी, आंध इत्यादी होत. याशिवाय भिल्ल वा नाईकडा, महादेव कोळी, पारधी इत्यादी जातींचाही वावर या परिसरात आहे. यापैकी रूढी, परंपरा, धर्मकल्पना इत्यादींचा विचार करता गोंड, कोलाम, प्रधान, थोटी यांचा एक गट तयार होतो. कोलाम व गोंड या दोन्ही जाती पूर्णत: भिन्न असूनही त्यांच्यामध्ये परंपरा, धर्म इत्यादी बाबतीत एवढेच काय आडनावांच्यामध्ये सुद्धा कमालीचे साम्य आहे. गोंडांच्या सर्व परंपरा कोलाम पाळतात.

या परिसरात ढेमसा व दंडार ही गोंडाची अत्यंत प्रसिद्ध लोकनृत्य आहेत. यातील दंडार या नृत्यास धार्मिक अधिष्ठान आहे. दसरा ते दिवाळी या कालखंडात हा नृत्य प्रकार विधिवत सादर केला जातो. या कालखंडात नृत्याच्या संदर्भातील कोणतीही पवित्र वस्तू बाहेर देत नाहीत. उदा. ढोल, मोरपिसांचे टोप, टिपऱ्या, घुंगरू, कोडाल देवतेचा मुखवटा इत्यादी या सर्व वस्तू श्रद्धाळू गोंडासाठी अत्यंत पवित्र असतात.

गोंड, प्रधान, कोलाम इ. स्वच्छतेचे भोक्ते आहेत त्यांची गावे अत्यंत स्वच्छ व नीटनेटकी असतात. त्याचप्रमाणे हे लोक कष्टाळू, स्वाभिमानी व इमानदार आहेत.

बदलत्या काळाचा फटका काही चांगल्या गोष्टींनाही बसतो. तसेच या समाजात घडत आहे. संयुक्त महाराष्ट्रात किनवटचा समावेश झाल्यानंतर खऱ्याअर्थाने विकासाला प्रारंभ झाला. शासनाच्या वतीने या परिसरात मोठ्या प्रमाणात आश्रमशाळा उभ्या राहिल्या. आरोग्याच्या दृष्टीनेही मोठे प्रयत्न सुरू झाले. रस्ते, वाहतूक इ. सुविधा निर्माण झाल्या. याशिवाय प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून आदिवासींना शेतीपासून ते उद्योगापर्यंत विविध प्रकारचे साहाय्य केले जाते. परिणामत: या परिसरातील आदिवासींमध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन घडून आले आहे. तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. अनेक आदिवासी तरुण डॉक्टर, वकील व इंजिनीअर पासून ते विविध पदांवर कामे करताना दिसून येत आहेत.

> गोंड ही एकेकाळची राज्यकर्ती जमात होती. गढा-मंडल्यापासून चंद्रपूर-बल्लारशापर्यंत गोंडाची अनेक राज्ये अस्तित्वात होती. माहूर-किनवट हा परिसर गोंड राज्यातच मोडत होता. परिणामी या परिसरात गोंडी संस्कृतीचा प्रभाव जाणवत असल्यास नवल नाही. त्यांच्या विविध देवदेवता या परिसरात पाहावयास मिळतात. भीमदेव, जंगोबाई, मसाई, आईबाई, ग्रामूलदेवी, भवानी याशिवाय गणपती, नंदी इत्यादी देवीदेवतांची ते पूजा करतात.

किनवटचा विधानसभा मतदारसंघ खुला असूनही किशनराव पाचपूते, भीमराव केराम यासारख्या आदिवासी नेत्यांनी किनवट मतदार संघाचे नेतृत्व केले आहे. दत्तराम गेडाम, माधवराव मरसकोल्हे यासारखे सात्त्विक व सोज्वळ नेते गोंड समाजात आहेत. केवळ गोंड नव्हे तर अन्य समाजही त्यांच्याकडे आदराने पाहतो.

या समाजात वनौषधीविषयी जाणकार मंडळी मोठ्या प्रमाणात होती. ती पिढी आता संपत चालली आहे. कालौघात हे ज्ञान नष्ट होत आहे. परंपरा, कला इत्यादींवरही परिणाम होत आहेत. लोककलांचा मोठा ठेवा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. गोंड लोकांचे जल व्यवस्थापनदेखील अभ्यासनीय आहे.

**संपर्क - ९४२००७१८५७**

✶✶



# मेळघाटची स्वामिनी



उषा भालेराव

डोंगर टेकड्यातील घाटांचा मेळ ज्या अरण्यात झाला आहे. त्याला मेळघाट असे म्हणतात. मेळघाटाला प्राचीन व नैसर्गिक इतिहास आहे. विराटाचं विराटनगर याच अरण्यात होतं, किचकाला भीमाने याच मेळघाटातच यमसदनी पाठवलं. विराटाचा अपभ्रंश होऊन बनलं. वैराट हे आजही मेळघाट अरण्यक्षेत्रात आहे. किचकाच्या नावावरून किचकदरा व पुढे चिखलदरा झाले. हे गाव उंच टेकडीवर वसलेले आहे.

कोरकू हे कोतारियन वंशाचे असून ते स्वत:ला रावणाचे वंशज समजतात. येथे गवळी, कोरकू, निघल, गोंड, भिल्ल, बुरुड, राठिया (भिलाला), मोंघिया व बलाई आदी जाती-जमाती आहेत. यापैकी ३४ टक्के लोकसंख्या कोरकू आदिवासींची आहे.

मध्यप्रदेश राज्याला लागून असलेला चिखलदरा व धरणी असे दोन तालुके मिळून बनलेला हा परिसर ड्राय फॉरेस्ट म्हणून ओळखला जातो. मेळघाटचे भौगोलिक क्षेत्र ४००४१ चौरस मीटर आहे. इरामाता (धरणीमाता ) व डोंगर (गोमेज) यांना मानणारा हा कोरकू यांची मेघनाथ (रावणपुत्र) व मंढुबा ही दैवते आहेत.

> मेळघाटचा विकास होण्यासाठी स्त्रीस केंद्रबिंदू मानून काम करणे आवश्यक आहे. तिचे आर्थिक, सामाजिक, शारीरिक, मानसिक, शैक्षणिक व सांस्कृतिकदृष्ट्या सबलीकरण करण्यासाठी शासकीय यंत्रणेसोबतच समाजसेवी संस्थांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे.



**कोरकू स्त्री**

कोरकू स्त्री ही हळदी पिवळा रंग किंवा सावळ्या वर्णाची असते. ती बारीक काठाची गोल सुती साडी घालते. उलटा पदर घेऊन ती तो डोक्यावर घेते. भूतखेत लागू नये म्हणून जागो जागी गोंदलेले असते. या स्त्रिया रुप्याचे, कथलाचे व चांदीचे दागिने घालतात. पायतले गुधमगुंडी (तोडा किंवा कडं) गळयातली साकडी मुचकट (साखळी) पायातले पैंजण, सतरा, पायली, मुंडी, काडा, बिगळी, बाकडया, बाळया, दिगडी, साकडी(कमरपट्टा) कवडयाच्या, पोवळयाच्या माळा, काचमाळी, वाकी, दंडोळया हे त्यांचे दागिने. कपाळ हात यावर हिरवेगार गोंदण. कधी तुळशी वृंदावन तर कधी पतीचे, बापाचे, भावाचे नाव गोंदवलेले असते. गळयात चांदीच्या साखळ्या, कलदार चांदीच्या रुपयाला अंगठया जोडून त्या पाचही बोटात घालतात त्याला छल्ले म्हणतात. पायात कडे, तोडे, काळया मण्याच्या माळा, कानात चांदीचे झुमक, नाकात लाल मण्यांची गोल नथनी असे तिचे रूप असते.

घरातील माती, कुडाच्या वा शेणाने सारवलेल्या भिंतीवर आरसा बसवलेला असतो. त्यात पाहून कोरकू स्त्री आपली वेणीफणी करते.

**चालीरिती**

कोरकूंमध्ये मुलामुलींचे लग्न ठरले की मोहाचा मध पितात. त्या धुंदीत नाच गाणं करतात. लग्नात मुलीच्या वडीलांना धान्य, बकरी, गाय द्यावे लागते याला गोनेम (हुंडा) म्हणतात. लग्नमंडपात लाकडी खांब रोवतात. नवरा मुलगा नवरीला खांद्यावर घेऊन नाचतो नवरा मुलगा हा वधुपित्याकडे लमजाना (घरजावई) म्हणून राहतो. काही लमजाने सासऱ्यावर भरपूर कर्ज करून पळ काढतात.

भूमका (मांत्रिक) हा त्यांचा प्रमुख सल्लागार असतो. भूमकाच्या सल्याशिवाय कोरकू पुढे जात नाहीत. जादूटोणा, अंगारे धुपारे, ताईत या अंधश्रध्देच्या विळख्यातून हे सुटलेले नाहीत. कोरकु मुलींचे लग्न लहान वयातच होतं. खाण्या-पिण्याची हेळसांड, जीवनसत्त्वाचा अभाव, गरिबी, अज्ञान यामुळे जन्माला येणारं मूल कुपोषित असते. कुपोषण हा मेळघाटसमोरील सर्वात मोठा प्रश्न आहे. शासनाने यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. दुर्गम भागात प्रसूती केंद्र नाहीत म्हणून मोबाइल व्हॅनची व्यवस्था केली आहे. त्यात प्रसूतीसाठी लागणाऱ्या सर्व सुविधा व स्त्रीतज्ज्ञ असतात. कायद्यानुसार १८ वर्षापेक्षा कमी वय असलेल्या विवाहितेची कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करता येत नाही. पण या वयापर्यंत कोरकू स्त्रीला ३ ते ५ मुले झाली असतात. २६ ते ३० वर्षाच्या आजी झालेल्या स्त्रिया फारशा शोधाव्या लागत नाहीत. ११ ते २७ आपत्ये असलेली कुटुंबेदेखील सहज पाहायला मिळतात. ✶✶

# जत्र्याबाबा आणि कृषिक्रांती

**रमाकांत पाटील**

शहाद्याकडून धडगावच्या दिशेने निघालात की, दरा गावापासून सातपुड्याच्या रांगा सुरू होतात. वाटेत उपनदेवच्या गरम पाण्याचा अनुभव घेऊन धडगावला पोहोचताना त्या आधीच दोन किलोमीटरवर धनाजे खुर्द हे छोटेसे खेडे लागते. मुख्य रस्त्यावरून आत शिरून हे छोटेसे गाव ओलांडून पश्चिमेच्या दिशेने गावाबाहेर निघालात, की अगदी अखेरीस एक छोटेसे बैठे घर लागेल. त्या घराच्या अंगणात एक मोठी इमारत दिसेल. त्याची खिडकी उघडी असेल, तर आत विविध यंत्रे मांडलेली दिसतील. 'जत्र्याबाबा' असा मोठ्याने आवाज दिलात, की आधी दचकलेल्या कोंबड्यांची पळापळ होईल. अंगात एक कुडता आणि कमरेला गुंडाळलेले एक धोतर, असा वेष त्यांच्या चेहऱ्यावर एक प्रश्नार्थक चिन्ह. बोलण्यात कसलीही सफाई नाही. आत्मविश्वास नाही. पण तरीही या माणसाने बजावलेली कामगिरी त्या परिसराच्या दृष्टीने लक्षणीय अशीच. त्या परिसरात कुणालाही जत्र्या लिंबा पावरा यांच्याबद्दल विचारले, तर लोक तुम्हाला घरापर्यंत सोडायला येतात.!



केंद्र सरकारच्या भारतीय कृषी संशोधन परिषदेमार्फत चालणाऱ्या नंदुरबारच्या कृषी विज्ञानकेंद्राने दत्तक घेतलेल्या अनेक गावांपैकी धनाजे खुर्द हे एक गाव. या गावातील शेतकऱ्यांशी प्रयोगांबद्दल चर्चा करावयाची, तर कोणी पुढे येत नसे. अशा स्थितीत साधारण १० वर्षांपूर्वी अशिक्षित 'जत्र्याबाबा' पुढे आले, जोखीम पत्करून स्वत:च्या शेतात त्यांनी प्रयोग करण्यास अनुमती दिली.

जत्र्याबाबांची धनाजे खुर्द येथे साधारण अडीच एकरांची कोरडवाहू शेती. जत्र्याबाबाचे आई-वडीलसुद्धा शेतीच करीत आणि तीच शेती परंपरेने जत्र्याबाबाकडे आलेली. सारा परिवारच अशिक्षित. त्यामुळे जन्मतारखेची नोंद नाही. लिंबा कुट्या पावरा आणि कालीबाई यांच्या पोटी जन्माला आलेले जत्र्याबाबा २०१३ मध्ये आपले वय ६१ वर्षे असल्याचे सांगतात.

साधारण १९८८-८९ पासून जत्र्याबाबांनी आपली शेती स्वतंत्रपणे कसण्यास सुरुवात केली. ही शेती पारंपरिक होती. हरभरा, तूर अशी पिके ते घेत. त्या शेतीत जे पिकेल त्यात समाधान मानायचे, गरजेनुसार कोंबड्या वगैरे पाळण्याचा जोडधंदा करायचा, असा त्यांचा क्रम. हा क्रम साधारण २००३-०४ पर्यंत चालला. या वर्षी काही वेगळे घडले. नंदुरबार येथे केंद्र सरकारच्या भारतीय कृषी संशोधन परिषदेमार्फत कृषी विज्ञान केंद्राची सुरुवात झाली. या अंतर्गत धनाजे खुर्द हे गाव या केंद्राने दत्तक घेतले होते. या गावी कामाच्या प्राथमिक पाहणीसाठी केंद्राचे पथक पोहोचले. पण या गावात नव्या तंत्राचा स्वीकार करण्यास कोणीच तयार नव्हते. योगायोगाने जत्र्याबाबांची या पथकाशी गाठभेट झाली आणि तेथून परिसरातील बदलांना प्रारंभ झाला.

त्या काळात परिसरात तुरीवर 'केशर अळी'चा प्रादुर्भाव होत असे. या विषयावर संशोधन करण्याचे केंद्राने ठरविले. या प्रयोगासाठी जत्र्याबाबांनी आपल्या शेतातील उभ्या पिकात जाण्याची परवानगी दिली. प्रयोग यशस्वी झाला. हे तंत्रज्ञान आदिवासी ग्रामस्थांच्या बोलीभाषेत नेण्यासाठी जत्र्याबाबांच्या मदतीने पावरी बोलीभाषेत सीडी तयार करण्यात आली. ही खूप मोठी क्रांती होती. जत्र्याबाबा या क्रांतीतील महत्त्वाचे साधन ठरले. या शैक्षणिक सीडीच्या वितरणातून परिसरातील केसाळ अळीला आळा बसला आणि हा परिसर रोगमुक्त झाला.

धडगाव परिसरातील हवामानाला अनुसरून चांगली वाढ होणारी आणि चांगले उत्पन्न देणारी भुईमुगाची एक जात 'भाभा' ने विकसित केली होती. प्रत्यक्ष शेतीत प्रयोग केल्याशिवाय त्याचे परिणाम कळणार नव्हते. या प्रयोगासाठी जत्र्याबाबांनी आपली एक एकर शेती या प्रयोगासाठी दिली व केंद्राच्या सूचनेनुसार पेरणी करून मशागतीची काळजीही घेतली. या नव्या प्रकारच्या भुईमुगाच्या वाणाने चमत्कार दाखविला आणि जत्र्याबाबांच्या पदरात भरघोस उत्पन्न टाकले. आता या परिसरात भुईमुगाचे हेच वाण मोठ्या प्रमाणात लावले जाते आणि त्याचे उत्पन्नही भरघोस मिळते.

पेरणीची पद्धती, मशागतीची पद्धती, खतांचा वापर, शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशा साधनांचा वापर या साऱ्यांचा शुभारंभ या परिसरात प्रथमत: जत्र्याबाबांच्या शेतात झाला आणि मग ते तंत्रज्ञान पुढे विस्तारले. या घटनाक्रमात संयुक्त राष्ट्रांच्या विकास प्रकल्पांचा एक भाग म्हणून 'यूएनडीपी'अंतर्गत सामाजिक प्रक्रिया केंद्र धनाजे खुर्द येथे स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. या केंद्रांच्या उभारणीसाठी जत्र्याबाबा पुढे आले. आपल्या राहत्या घराच्या अंगणातील रस्त्यालगतचा कोपरा त्यांनी या केंद्रासाठी नावावर करून दिला. या बांधकामावरही त्यांनी लक्ष ठेवले आणि प्रसंगी सिमेंटवर पाणी मारण्याचे कामही केले. हे केंद्र उभारल्यानंतर तेथे 'भाभा'तर्फे डाळीवरील प्रक्रिया, तांदळाच्या साळीवरील प्रक्रिया, हळद किंवा इतर पदार्थांचे दळण आणि मोहफलांचे अर्क काढण्याचे यंत्र पुरविण्यात आले. या केंद्राचा वापर सुरू झाला. प्रक्रिया न केलेला शेतीमाल आणि प्रक्रियेनंतरचा शेतीमाल यांच्या विक्रीच्या दरात मोठी तफावत असल्याचे सर्वांच्या लक्षात आले आणि या केंद्राचा वापर भरभरून सुरू झाला.

विकासाच्या वाटेवर मार्गक्रमण करणारी जत्र्याबाबा पावरा यांच्यासारखी अशिक्षित मंडळी या अशा उपक्रमशीलतेने सुशिक्षितांपेक्षाही साहजिकच मोठी वाटू लागतात.

**

# इगतपुरीचे कारले लंडनला

इगतपुरीचे भौगोलिक वातावरण, पाण्याची उपलब्धता, बाजारपेठ याचा विचार करून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नाशिक यांच्यामार्फत केंद्र सरकारच्या विशेष केंद्रीय साहाय्य योजनेंतर्गत आदिवासी शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीने कारली लागवड योजना राबवण्यात आली.

नाशिक जिल्ह्यातील ४५ आदिवासी शेतकऱ्यांना ही योजना मंजूर करण्यात आली. ही योजना क्लस्टर पद्धतीने राबवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार धारगांव तालुक्यातील दारिद्र्य रेषेखालील आदिवासी शेतकऱ्यांचे १८ हेक्टर क्षेत्र योजनेकरिता निवडण्यात आले. हे सर्व शेतकरी पारंपरिक पद्धतीने कारली लागवड व शेती करत होते. म्हणून त्यांना ३ टप्प्यांमध्ये प्रशिक्षणाद्वारे आधुनिक पद्धतीने शेती करण्याचे प्रशिक्षण दिले गेले. जानेवारी २०१३ या आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतात 'अभिषेक', 'अमनश्री' या आधुनिक वाणाची लागवड करण्यात आली. शेतकऱ्यांना २५० ग्रॅम बियाणे, ६ बॅगा गांडूळ खत, कीटकनाशके २ किलो, जीआय वायर देण्यात आले. उत्पादित



मालाची साठवणूक व वाहतूक करण्यासाठी १० नग कॅरेटस देण्यात आले. २०,००० रुपये या प्रमाणे एकूण ९,००,०००/ - रुपये अनुदानही देण्यात आले. त्यातून प्रति एकरी ५ मेट्रीक टन एवढे कारल्याचे उत्पादन निघाले. कारल्याचा दर्जा उत्कृष्ट असल्याने घोटी (ता. इगतपुरी) येथील बाजारात या आदिवासी शेतकऱ्यांनी विकण्यासाठी नेली त्यावेळी बाजारातून मोठ्या शेतकऱ्यांनी ५०० किलो कारली लंडन येथे व १,५०० किलो कारली दुबई येथे निर्यात केली. या कारल्याला सरासरी ३० ते ३५ किलो एवढा भाव मिळाला.

कारली लागवड केलेल्या क्षेत्रात सरासरी एकरी उत्पादन १,५५,०००/- रुपये आले. व खर्च वजा जाता प्रति एकरी १,१६,१४९/- इतका नफा प्रत्येक लाभार्थ्यांस फक्त ४ महिन्यांत मिळाला. ज्या शेतकऱ्यांचे शेतीचे वार्षिक उत्पन्न ३० ते ४० हजाराच्या पुढे गेले नाही, त्या शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात भात लागवडीनंतर कारल्यासारखे उत्पादन घेऊन दुबार पीक घेतले. भरघोस नफा मिळवला. या आदिवासी शेतकऱ्यांचा यशस्वी झालेला प्रयोग पाहून आसपासच्या इतर आदिवासी शेतकऱ्यांनी अशाच पद्धतीने भाजीपाला लागवड करण्याचे सुरू केले आहे. येथील शेतकरी भात लागवडीनंतर भाजीपाला उत्पादनाच्या माध्यमातून दुबार पीक घेत आहे. इगतपुरी तालुक्यात केळी हे पारंपरिक पीक नसतानासुद्धा आदिवासी विकास विभागाच्या मदतीने अडसरे बु. येथील १४ शेतकऱ्यांनी ठिबकद्वारे केळी लागवड केली असून ऑगस्ट/सप्टेंबर, २०१३ मध्ये या केळीचे उत्पादन होणार आहे.

**– रवींद्र ठाकूर**

✱✱

---

# जागतिक आदिवासी दिवस

**(पान २४ वरून)** केल्या. त्यात म्हटले की, जरी भारतात इंडिजिनस पीपल नसल्याचे पूर्वी (युनोत) भारतात जागतिक आदिवासी वर्ष साजरा करणे शक्य नसल्याचे सांगण्यात आले असले तरी आदिवासी हेच मूळनिवासी (देशज) आहेत आणि त्यांच्या ४६१ जमाती वास्तव्यास असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे पुढे २३ डिसेंबर, १९९४ मध्ये युनोच्या आमसभेच्या बैठकीत अत्यंत महत्त्वपूर्ण ठराव (क्र.४६/२१४) मंजूर करण्यात आला. तो दरवर्षी ९ ऑगस्ट हा इंटरनेशनल डे ऑफ द वर्ल्ड इंडिजिनस पीपल अर्थात आदिवासी दिवस साजरा करण्यात येईल, असे ठरवण्यात आले. ९ ऑगस्ट हाच दिवस निश्चित करण्याचे कारण म्हणजे १९८२ या वर्षी याच दिवशी जिनिव्हा येथे आदिवासी लोकांच्या मानवी हक्क संरक्षण व प्रगती वाढीसाठी काम करणाऱ्या संयुक्त कार्यगटांची पहिली बैठक झाली होती. त्या दिवसाची आठवण म्हणून '९ ऑगस्ट' हा आदिवासी दिवस म्हणून साजरा करण्याचे ठरले.

युनोच्या आमसभेने हे तात्काळ घोषित केले की, १९९४-२००५ हे आदिवासी दशक म्हणून साजरे करण्यात येईल. या दशकाचा उद्देश हाच की, आदिवासी समाजाची संस्कृती, शिक्षण, आरोग्य, मानवाधिकार, पर्यावरण, सामाजिक आणि आर्थिक विकासासंदर्भात जे प्रश्न आहेत ते परस्पर सहयोगाने सोडविण्यासाठी प्रयत्न करणे. प्रथम दशक संपत नाही तोच २२ डिसेंबर, २००४ रोजी युनोने पुन्हा २००५-२०१४ हे दुसरे आदिवासी दशक म्हणून जाहीर केले. या सर्व बाबींवर देखरेख ठेवण्यासाठी आमसभेचा ठराव क्र.२२/२०० जुलै २०/२००० अन्वये एक समितीही स्थापली. १९९३ मध्ये व्हिएन्ना परिषदेत आदिवासी प्रतिनिधींनी केलेल्या प्रयत्नांचेच हे फलित आहे.

**१३ सप्टेंबर, २००७ चा जाहीरनामा**

जागतिक समुदायाच्या दृष्टीने १३ सप्टेंबर, २००७ या दिवसाचे ऐतिहासिक महत्त्व आहे. कारण गेली २५ वर्षे प्रदीर्घ चर्चा-संघर्षानंतर युनोने आदिवासींच्या स्वनिर्णयाचा अधिकार आणि सामूहिक मानवाधिकारविषयक ४६ कलमांचा एक जाहीरनामा घोषित केला. या प्रक्रियेत एकूण १५८ सदस्य राष्ट्रांनी सहभाग घेतला. १४३ सदस्य देशांनी जाहीरनाम्याच्या बाजूने, ४ विरोधात तर ११ देश गैरहजर राहिले. न्यूझीलंड, आस्ट्रेलिया, अमेरिका व कॅनडा या ४ देशांनी विरोधात मतदान केले. भारतात इंडिजिनस पीपल नसल्याचे संभ्रमात असणाऱ्या भारताला मात्र यामुळे स्पष्टता झाली की इंडिजिनस पीपल-देशज लोक म्हणजेच आदिवासी आहेत! या जाहीरनाम्यातील बऱ्याच बाबी भारताच्या संविधानाच्या ५ व्या व ६ व्या अनुसूचीत नमूद केलेल्या आहेत.

**संपर्क : ९४२१९८८९९२** ✱✱

भाऊसाहेब वर्तक यांचा जन्म ९ फेब्रुवारी १९१४ रोजी अण्णासाहेब वर्तक या थोर, निःस्वार्थी स्वातंत्र्यसेनानी व देशभक्ताच्या कुटुंबात झाला. अण्णासाहेबांच्या कार्यपंरपरेचा वारसा भाऊसाहेबांना मिळाला. मुंबई प्रांताचे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी, भाऊसाहेबांनी केलेल्या अविश्रांत कार्याची पावती म्हणून गृहनिर्माण मंडळाच्या अध्यक्षपदी त्यांची नेमणूक केली. भाऊसाहेबांनी अल्पावधीत गृहनिर्माण मंडळाच्या अनेक वसाहती निर्माण करून मंडळाचे कार्य समाजाभिमुख केले. त्याचबरोबर

प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंतच्या संस्था, कृषीविषयक, व्यवस्थापनविषयक प्रशिक्षण संस्था, संगणक शास्त्रातील उच्च शिक्षण, महिला शिक्षण, आदिवासी विभागातील गोरगरिबांच्या झोपडीपर्यंत शिक्षणाची गंगा नेण्याचे कार्य भाऊसाहेब वर्तक यांनी सातत्याने केले. शैक्षणिक कार्यात त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील उत्तम संघटन, आधुनिक संवेदनशील व्यवस्थापन, सात्विक भावनांचा विचार या गुणांचा दुर्मीळ असा संगम प्रकर्षाने आढळतो. राजकारण, समाजकारण, प्रशासन, शिक्षण अशा विविध क्षेत्रात त्यांनी अजोड कामगिरी बजावली. ठाणे जिल्ह्यातील आदिवासींच्या विकासासाठी त्यांनी भरीव कामगिरी केली. अशा या कर्तृत्ववान व्यक्तींच्या जन्मशताब्दीनिमित्त विशेष लेख.



# भाऊसाहेब वर्तक निष्काम कर्मयोगी

झोपडपट्टी निर्मूलनासाठी गोरेगाव व विक्रोळी येथे मुंबईतील दोन मोठ्या योजना कार्यान्वित केल्या.

वसंतराव नाईक यांच्या मंत्रिमंडळात अन्न व नागरी पुरवठामंत्री असताना अन्नटंचाईच्या काळात टीकेचे प्रहार झेलीत मोठ्या धैर्याने त्यांनी या पदाची जबाबदारी सांभाळली. राज्यव्यापी गुंतागुंतीचे अनेक प्रश्न व शासकीय समस्या व्यावहारिक व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून त्यांनी मोठ्या कौशल्याने हाताळल्या.

भाऊसाहेब महसूलमंत्री असताना महाराष्ट्रात बिकट दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली. आपल्या झुंझार वृत्तीतून तीस लाख दुष्काळग्रस्तांना, सतत आठ महिने काम पुरवण्याचा अतिप्रचंड कामाचा व्याप त्यांनी कार्यक्षमतेने सांभाळला.

ठाणे जिल्ह्यात ऊस आणि गहू ही पिके काढण्याचा प्रयोगही त्यांच्या शिकवणीतून साकार झाला. 'सिकॉम'चे अध्यक्ष या नात्याने महाराष्ट्रातील औद्योगिक दृष्ट्या मागासलेल्या जिल्ह्यांवर त्यांनी लक्ष केंद्रित करून भंडारा, चंद्रपूर या औद्योगिक वसाहती निर्माण केल्या. सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, धार्मिक व वैद्यकीय संस्था त्यांनी स्थापन केल्या.

वसई येथील विद्यावर्धिनीची महाविद्यालये व तंत्रविद्यालय,आगाशी, विरार,अर्नाळा येथील शिक्षणसंस्था, नाशिकची ख्यातनाम गोखले एज्युकेशन शिक्षणसंस्था, नेहरू सेंटर, मुंबई वडाळा येथील शारीरिक शिक्षण संस्था, पालघरचे सोनोपंत दांडेकर महाविद्यालय, कणकवलीचे कॉलेज, जव्हार, बोर्डी-कोसबाड भागातील आदिवासी विकाससंस्थांचे जाळे व बोरीवलीचे भाऊसाहेब वर्तक महाविद्यालय आदी संस्थांची बांधणी करून सामाजिक बांधिलकीचा शैक्षणिक आदर्श निर्माण केला.

अंधेरी येथील जीवन केंद्र व रुग्णालय यांची उभारणी काही सहकाऱ्यांच्या मदतीने केली. सांस्कृतिक व आध्यात्मिक मूल्यांची जोपासना करून आधुनिक संघर्षमय जीवनात माणसाला स्वास्थ्य व शांतता लाभावी म्हणून अनेक मंदिरे

**प्रभाकर पाणसरे**

व देवालये, तसेच समाजजागृत स्थाने त्यांनी निर्माण केली. लोकनेते अण्णासाहेब वर्तक स्मारकमंदिर आणि तात्यासाहेब चुरी स्मारक विद्यार्थी वसतिगृह भाऊसाहेबांच्या विधायक दृष्टिकोनातून व पुढाकाराने साकार झाले.

सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्राप्रमाणे क्रीडाक्षेत्रात त्यांनी प्रशंसनीय कार्य केले. त्यांनी मुंबई शारिरीक शिक्षण मंडळाचे स्टेडियम उभारले. विद्यावर्धिनीसारखी शिक्षण संस्था निर्माण केली. गृहनिर्माण मंडळाचे अध्यक्ष या नात्याने झोपडपट्टीत राहणाऱ्या ३००० गाळ्यांची वसाहत निर्माण केली. खार जमिनीची शेती हा कोकण भागाचा प्रश्न अत्यंत समर्थपणे हाताळला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील ९५ टक्के म्हणजे एक लक्ष अडीच हजार एकर जमीन लागवडीखाली आली. त्यांनी खार जमिनीच्या विकासासाठी आर्थिक साहाय्य घेऊन २५८

जंगल खात्याची ४०,००० एकर जमीन आदिवासींसाठी भाऊसाहेबांनी उपलब्ध करून दिली. या हस्तांतरित जमिनी त्यांनी आदिवासींना परत मिळवून दिल्या. या योजनेचा फायदा २४,००० आदिवासींना झाला. त्यांच्या प्रयत्नामुळेच शासनाने बेघर कुटुंबाना घरे देण्याची योजना हाती घेतली. २१,००० मागासवर्गीयांना निवाऱ्याची जागा मिळाली. पालेमोड निर्मूलन योजना यशस्वीरीत्या राबवून आदिवासींना कर्जातून मुक्त केले. आदिवासींना उदरनिर्वाहासाठी जमीन निवाऱ्याची जागा योग्य मजुरी व स्वस्त धान्य अशा विविध प्रकारे शासनाच्या कल्पक योजनांद्वारे साहाय्य करून आदिवासींना नवजीवन प्राप्त करून दिले.

योजना यशस्वीरीत्या पूर्ण केल्या. मत्स्योद्योगाच्या आधुनिकीकरणाला सहकारी तत्त्वावर त्यांनी चालना दिली. या व्यवसायाला त्यांनी सहकाराची बैठक व दृष्टी दिली. त्यांनी वसई येथे चिमाजी अप्पांचे स्मारक उभे केले. संघटनकौशल्य, प्रशासनातील निपुणता, धारदार आवाज, प्रभावी वक्तृत्त्व व अभ्यासूवृत्ती अशा गुणांनी युक्त असलेले त्यांचे चतुरस्त्र व्यक्तिमत्व असंख्य कार्यकर्त्यांना प्रेरणा देत राहील. पद्मश्री भाऊसाहेबांची जीवनज्योत दिनांक ७ ऑगस्ट १९९८ रोजी मालवली.

**संपर्क : ०२२-२४१४२५८१**

**

# सातत्यपूर्ण प्रयत्न

महाराष्ट्रात कातकरी, कोलम आणि माडीया गोंड या तीन प्रमुख आदिम जमातींसह भिल्ल, गोंड, महादेव कोळी, पावरा, ठाकूर, वारली, कोकणा, ठाकूर, काथोडी कोळी, कोरकू आदी आदिवासी जमातींचे वास्तव्य आहे. आदिवासींच्या तब्बल २८६ उपजाती येथे आढळतात. राज्यात एकूण ८५.७७ लाख एवढी आदिवासी लोकसंख्या असून ती एकूण लोकसंख्येच्या ८.८५ टक्के आहे. महाराष्ट्राला पुरोगामित्वाचा वारसा असल्याने आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. त्याचबरोबर आदिवासींच्या विकासाला समाजसेवक ठक्कर बाप्पा, गोदावरी परुळेकर, बाबा आमटे, प्रकाश आमटे, डॉ. अभय व राणी बंग, डॉ. रवींद्र कोल्हे आदींचाही हातभार लागला आहे.

अर्चना शंभरकर

सह्याद्रीच्या डोंगररांगात धुळे, नंदुरबार, जळगांव, नाशिक आणि ठाणे, तर चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, नागपूर, अमरावती आणि यवतमाळ या पूर्वेकडील वनाच्छादित जिल्ह्यात आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणात आहेत. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून निर्जनस्थळी राहणाऱ्या या जमातींना महाराष्ट्र सरकारने क्रांतिकारी पावले उचलत सन्मान मिळवून दिला आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार, निवारा या प्रमुख मूलभूत गरजांसह, पायाभूत सुविधांच्या निर्मितीतून आदिवासींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनस्तरावर विविध उपक्रम राबवले जात आहेत. स्वंतत्र आदिवासी विकास विभाग निर्माण करून या विभागाला स्वतंत्र मंत्रीपदही लाभले आहे. माडा, मिनीमाडा अशी विभागणी करीत आदिवासी उपयोजनांची अंमलबजावणी सुरु आहे.

महाराष्ट्राच्या स्थापनेपासूनच आदिवासी विकासाला राज्य सरकारने प्राधान्य दिले आहे. आदिवासींचा विकास सूत्रबद्ध पद्धतीने व्हावा यासाठी १९९२ मध्ये 'कृती कार्यक्रम' आखून विभागाची पुनर्रचना करण्यात आली. १९९१ मध्ये राज्याचे माजी मुख्य सचिव द. म. सुकथनकर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून आदिवासी कल्याणसाठी नवीन निकष ठरविण्यात आले. सुकथनकर समितीच्या शिफारशींनुसार नियोजन विभाग आता आदिवासी विकास विभागाला आदिवासी उपयोजनेसाठी स्वतंत्र निधी उपलब्ध करून देतो. त्याचबरोबर आदिवासींच्या आर्थिक आणि सामाजिक उन्नतीला वेग यावा यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ आणि शबरी आदिवासी वित्त आणि विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ हे बहुउद्देशीय आदिवासी सहकारी संस्थाची शिखर संस्था म्हणून काम करते. एकाधिकार खरेदी, खावटी कर्ज वाटप, स्वयंरोजगार योजनांची अंमलबजावणी, कर्ज योजना आदींची अंमलबजावणी या महामंडळाच्या माध्यमातून होते.

सहकार चळवळीच्या माध्यमातून आदिवासींचे राहणीमान उंचावण्यास सहकारी चळवळ उपयुक्त ठरू शकते हे लक्षात घेऊन आदिवासी विभागात सहकार चळवळ सुरु करण्याचे महत्वकांक्षी पाऊल सरकारने काही वर्षांपूर्वी उचलले. त्यासाठी जानेवारी १९८४ रोजी मधुकरराव पिचड यांच्या अध्यक्षतेखालील समिती नियुक्त करण्यात आली. अनेक उपयुक्त शिफारसी या समितीने केल्याने आज आदिवासी सहकारी साखर कारखाने, सूतगिरणी यांसारखे उद्योग उभे राहण्यास मदत झाली आहे.



आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभागांद्वारे अनेक योजना राबवल्या जातात, पण नियमित योजनांद्वारे जो लाभ आवश्यक असूनही देता येत नाही, अशा प्रकारचा लाभ देण्यासाठी केंद्रावर्ती अर्थसंकल्प (न्यूक्लिअस बजेट) ही योजना राबवण्यात येत आहे.

आदिवासी लोकांसाठी असलेल्या पाणी पुरवठा, आरोग्य सुविधा आदींसारख्या निरनिराळ्या योजनांची एकात्मिकपणे व समन्वयाने अंमलबजावणी करणे यासाठी 'नवसंजीवन' योजना राबवली जाते. या योजनेत सध्या रोजगार कार्यक्रम, आरोग्य सेवा, पोषण कार्यक्रम, अन्नधान्य पुरवठा, खावटी कर्ज, धान्यकोष आदी घटकांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे ही योजना खऱ्या अर्थाने आदिवासींना संजीवनी देणारी ठरली आहे. थोडक्यात या एकाच योजनेच्या आधिपत्याखाली इतर विविध योजनांची अंमलबजावणी सुरु आहे.

वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी आणि त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण हा सर्वात प्रभावी मार्ग ठरू शकतो. म्हणूनच आदिवासींसाठी राज्यभरात शिक्षणसंस्थांचे जाळे विणण्याच आले आहे. शिक्षणातून समृद्धी आणण्याच्या हेतूने शाळा, महाविद्यालय, आश्रमशाळा यांच्याही पुढे जाऊन इंग्रजी माध्यमांच्या पब्लिक स्कूलची स्थापना राज्यात झाली आहे. विद्यार्थ्यांकरिता विविध शैक्षणिक सवलतींसोबतच शिष्यवृत्ती योजनाही सुरू आहेत.

साक्षरता, आर्थिक विकास, पायाभूत सुविधा, रोजगार या बाबतीत आज आदिवासी समाजाला परिपूर्ण करण्याचे शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. गेली शेकडो वर्षे दुर्गम जंगलात वास्तव्यास असणाऱ्या आदिवासींची मुले आज आधुनिक जगाचा भाग बनत आहेत.

**संपर्क : ९९८७०३७१०३**

* *

# वनवैभव आणि समृद्ध परंपरा




### मार्कंडेश्वर देवस्थान

गडचिरोली जिल्हा मुख्यालयापासून ४५ किमी अंतरावर चामोर्शी तालुक्यात मार्कंडा हे देवस्थान आहे. ते चामोर्शीच्या वायव्य दिशेला असून, वैनगंगा नदीच्या उत्तर वाहिनीच्या डाव्या तीरावर वैभवशाली इतिहासाची साक्ष देत आहे. मंदिरासभोवतालच्या दगडावर वेरूळ, अजिंठा व खजुराहोप्रमाणे कलाकृतींचे नमुने भिंतीवर कोरलेले आढळतात. याला विर्दभाचा खजुराहो म्हणून ओळखले जाते. ब्रिटिश इतिहासकार सर कॅनिंगहॅम यांनी येथे सर्वप्रथम भेट दिली. (सेंट्रल प्रॉव्हिंसेसच्या रिपोर्ट १८७३-७४ व १८७४-७५) त्यावेळी २४ देवळे असल्याचे नमूद आहे.

२४ देवळांपैकी ४ सुरक्षित असून २० देवळे पडण्याच्या अवस्थेत आहेत. या ठिकाणी पर्यटकांसाठी सोयी-सुविधासुध्दा आहेत. महाशिवरात्रीला प्रचंड गर्दीमुळे मंदिर मनसोक्त पाहता येत नाही. परंतु इतर वेळेस पर्यटनप्रेमींना बारीकसारीक निरीक्षण करता येते..

### भामरागड-बिनागुंडा

जिल्हा मुख्यालयापासून १९० कि.मी. व आल्लापलीपासून ७० कि.मी. दूर भामरागड असून भामरागडजवळ इंद्रावती, पर्लकोटा, पामुलगौतम या तीन नद्यांचा संगम आहे. पामूलगौतम नदी खोल असून उन्हाळ्यातसुध्दा नावेने ये-जा करावे लागते. भामरागड येथे लाकडाचे विश्रामगृह आहे.

मारोती हरिश्चंद्र मेश्राम

### लोकबिरादरी प्रकल्प

भामरागडपासून ३ कि.मी. अंतरावर हेमलकसा येथे लोकबिरादरी प्रकल्पाचा दवाखाना असून डॉ. प्रकाश आमटे व डॉ. सौ. मंदाकिनी आमटे १९७३ पासून आदिवासींची सेवा करीत आहेत. त्यांचे प्राणीसंग्रहालय प्रसिध्द आहे.

पावसाळ्यात या तीनही नद्यांना पूर येतो. तेव्हा भामरागडला बेटाचे स्वरूप प्राप्त होते. परंतु पर्लकोटा नदीवरील पूल लहान असल्यामूळे पर्यटकांना पावसाळ्याच्या दिवसात जाता येत नाही.

### कार्तिकस्वामी महाराज मंदिर

जिल्हा मुख्यालयापासून ७० ते ७५ कि.मी. अंतरावरील मुलचेरा तालुक्यातील चपराळा येथे कार्तिकस्वामी महाराज मंदिर आहे. मंदिरापासून जवळच वर्धा-वैनगंगा नदीचा संगम आहे. यालाच प्रशांतधाम असे म्हणतात. मंदिराला लागूनच चपराळा अभयारण्य आहे.

### सोमनूर संगम

गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तालुक्यापासून ४० कि. मी. अंतरावर महाराष्ट्र, आंध्र प्रदेश व छत्तीसगडच्या सीमेवर सोमनूर येथे गोदावरी व इंद्रावती या दोन मोठ्या नद्यांचा हा संगम आहे. संगमाच्या ठिकाणी पावसाळ्यात पाणी तुडुंब भरत असल्याने नदीचे पात्र समुद्रासारखे दिसते.

### वैरागड, जवधर

जवधर वैरागड १५ व्या शतकात येथे हिऱ्याची खाण होती. हे गाव खोब्रागडी व सती नदीच्या संगमावर आहे. गावाला लागून गोलाकार तटबंदी किल्ला आहे. हे गाव आरमोरी तालुक्यात जिल्हा मुख्यालयापासून ५० कि.मी. अंतरावर आहे. सन १,४५० पर्यंत या भागावर नागवंशीय माना जमातीच्या राजाची सत्ता होती. वैरागड किल्याच्या सभोवताल खंदक असून बुरुजांची उंची १० ते २० फूट आहे. किल्याच्या आत एक विहीर असून ती बुजलेल्या अवस्थेत आहे. या विहिरीचे बारकाईने निरीक्षण केले असता गुप्त रस्ता (भुयार वाट ) असल्याचे पाहणारे सांगतात.

### ग्लोरी ऑफ आलापल्ली फॉरेस्ट

गडचिरोली मुख्यालयापासून ११० कि.मी. अंतरावर आणि आलापल्लीपासून १५ कि.मी. अंतरावर वनवैभव (ग्लोरी ऑफ आलापल्ली फॉरेस्ट) नावाचे सागवान झाडांचे दाट जंगल आहे. येथे दोन ते अडीचशे वर्षाची झाडे आहेत. झाडांची सर्वात जास्त गोलाई ६ ते ७ मीटर व लांबी (उंची) ३५ ते ४० मीटर इतकी आहे.





### टिप्पागड

गडचिरोली जिल्ह्याच्या पूर्व टोकावर छत्तीसगड राज्याच्या राजनांदगाव जिल्ह्याच्या सीमेजवळ कोरची तालुक्यात घनदाट टिप्पागड अरण्याचा भूभाग आहे. टिप्पागडचा डोंगर समुद्र सपाटीपासून २००० फूट उंचीवर आहे. डोंगरावर एक प्राचीन किल्ला आहे. हा किल्ला कोणी व केव्हा बांधला याचा पुरावा नाही. टिप्पागडचा किल्ला पूर्व-पश्चिम व उत्तर दक्षिण दिशेला अनुक्रमे १०६६ यार्ड लांब, रूंदी आहे. या किल्याचा घेर अंदाजे ५ कि.मी. आहे. किल्याच्या आत मोठा तलाव असून त्याला पायऱ्या आहेत. शेकडो फुटांच्या उंचीवरील हा तलाव चारही बाजूने डोंगररांगानी वेढलेला आहे. पहाडावरील तलावात बाराही महिने पाणी असते. या ठिकाणी गुरुबाबा ऋषीमुनींचा मठ आहे. या मठापासून भुयारी मार्ग आहे. आत उतरल्यानंतर सभामंडप दृष्टीस पडतो. अशा या प्राचीन टिप्पागडावर गोंड राजा पुरमशहाचे राज्य होते. दरवर्षी गुरुपौर्णिमेला येथे यात्रा भरते.

### सूरजागड

एटापल्ली तालुक्यात सूरजागड किल्ला आहे. सूरजागड टेकड्या या सातपुड्याच्या रांगा आहेत. छत्तीसगड प्रदेशातील टेकडयातून पर्लकोटा, पामूलगौतम, इंद्रावती या नद्या उगम पावल्या आहेत. एटापल्लीकडून गटा या गावाला जाणाऱ्या प्रमुख मार्गाला लागूनच सूरजागड हे छोटेशे गाव आहे. ते एटापल्ली पासून १५ ते १७ कि.मी. अंतरावर आहे. या गावाला लागूनच लोहयुक्त पहाड आहे. या पहाडावर ऐतिहासिक सुरजागडचा किल्ला आहे. हा किल्ला वैरागडचा नागवंशीय माना राजा सूरजत बडवाईक यांनी सन १,७०३ मध्ये बांधला. त्यांच्या नावावरून सूरजागड हे नाव पडले. तेथे माडीयाचे दैवत ठाकूरदेव आहे. या ठिकाणी जानेवारी महिन्यात मोठी यात्रा भरते.

### खोब्रामेंढा

कुरखेडा तालुक्यात खोब्रामेंढा असून तेथे मारुतीचे देवस्थान आहे. कुरखेडा ते धानोरा मार्गावरील मालेवाडा गावापासून इशान्येस १० ते १५ कि.मी. अंतरावर हे देवस्थान आहे. मंदिराच्या पूर्वेस एक डोंगर आहे. डोंगरावर एक पठार आहे. तेथे अर्धवट बांधलेला किल्ला आहे. या डोंगरावर दोन तलाव आहेत. यातील पाणी आटत नाही. डोंगराच्या रांगातून नदी उगम पावते त्यालाच खोब्रागडी नदी म्हणतात. रामनवमी व हनुमान जयंतीला दोनदा मोठी यात्रा भरते.

### अरततोंडी

देसाइगंज(वडसा) या तालुक्याच्या ठिकाणी जाताना गुरनोली या पोच मार्गापासून १५ कि. मी. अंतरावर अरततोंडी गाव आहे. दगडी पहाडावर महादेवाचे शिवलिंग मंदिर आहे. देवस्थान पुरातनकालीन असून दरवर्षी महाशिवरात्रीला यात्रा भरते.

### भोवरागड

गडचिरोलीपासून ३५ कि.मी. आणि धानोरा वरून ४० कि.मी. अंतरावर भोवरागड हे स्थळ आहे. दरवर्षी येथे रंगपंचमीच्या पहिल्या आठवड्यात यात्रा भरते. येथे शिवलिंग असून पायऱ्या चढून जावे लागते. डोंगराच्या कडेला उंच ठिकाणी शिवलिंग असून तेथे नेहमी आग्यामोहाळ असतात. या पहाडीच्या बाजूने कठाणी नदी वाहते.

### लक्का मेंढा, महाभारतातील लाक्षागृह

लक्का मेंढा हे स्थळ अहेरी तालुक्यातील आलापल्ली - सिरोंचा मार्गावर जुन्या रेपनपल्ली गावापासून घनदाट जंगलात ३-४ कि. मी. अंतरावर आहे. अशी आख्यायिका आहे की, वैरागड ही विराट राजाची नगरी , पांडवानी एक वर्षाचा अज्ञातवास येथेच पूर्ण केला. त्याचप्रमाणे लख्खा मेंढा म्हणजे महाभारतातील लाक्षागृह. लाक्षागृह घनदाट जंगलात उंच आणि दुर्गम अशा डोंगरावर बांधल्याचा महाभारतात उल्लेख आहे. यामधील समानता व लाक्षागृहाप्रमाणे दिसणारे गृह पाहून महाभारतकालीन तेच लाक्षागृह असावे, अशी शंका येते. आजही येथे महालाच्या विटांचे अवशेष आणि पांडव ज्या भुयारी मार्गाने बाहेर पडले तो भुयारी मार्ग व तलाव आदी अवशेष अस्तित्वात आहेत.



### बीनागुंडा

बीनागुंडा हे गाव पूर्वेला ४० किमी अंतरावर आहे. राज्याच्या पूर्वसीमेला लागून छत्तीसगढ राज्याच्या पश्चिम सीमेलगत अबूजमाड पहाडाच्या रांगा आहेत. या भागात बडा माडीया ही आदिवासी जमात वास्तव्य करीत आहे. या गावाजवळ एक धबधबा असून त्याला इंद्रसफाल असे म्हणतात. येथे जाण्यासाठी अबूजमाड डोंगराच्या रांगा पार करूनच जावे लागते.

### नैसर्गिक खुले रंगमंच- बोगम दान परपू

अहेरी तालुक्यात आणखी एक महत्वाचे स्थळ म्हणजे महाभारतकालीन नैसर्गिक खुले रंगमंच 'बोगम दान परपु होय. दंतकथा अशी आहे की, पांडवांचे वास्तव्य लक्का मेंढा येथे असताना ते आपल्या मनोरंजनासाठी येथे येत असत. नैसर्गिक खुले रंगमंच म्हणजे 'बोगम दान परपू' होय.

येथे आजही रंगमंचाप्रमाणे सपाट दगड असून येथे नृत्य होत असावे, अशी लोकांची धारणा आहे. रंगमंचासमोरील भाग सपाट दगडांचा असून तेथे फरशी बसविल्याचा भास होतो. या फरशीवर सैन्य किंवा अंगरक्षक बसत असावे. काही अंतरावर मोठे दगड ठेवले आहेत. कदाचित या दगडाचा उपयोग पांडव सिंहासनासारखा करीत असावेत. रंगमंचाच्या अवतीभवती हिरवीगार वनराई, रंगबेरंगी सुवासिक फुले असल्याने हे विलोभनीय स्थळ पर्यटकांना आकर्षित करीत असते.

**संपर्क : ९४२१७३२४४७**

✶✶

वाचू आनंदे


# महाराष्ट्र : भूमी व लोक

स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिश प्रशासक, धर्मप्रसाराचे काम करणारे मिशनरीज व काही प्रमाणात प्रशासकीय सेवेत असलेले अधिकारी यांनी आदिवासी भागात दौरे करून त्यांचे शब्द, गाणी, कथा, जीवनमानविषयक माहिती संकलित करून त्याआधारे ग्रंथरूपाने आदिवासींविषयीच्या माहितीचे जतन केले. यामध्ये आर.सी.टेंपल याच्या 'Papers Relating to the Aboriginal Tribes of the Central Province' सारख्या ग्रंथांना तसेच तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्यांनी जमीन महसुलाकरिता केलेल्या सर्वेक्षण रिपोर्टसना खूप महत्त्व आहे. यामध्ये एल्विन, ग्रिअर्सन, हॅमॅनडॉर्फ सारख्या पाश्चिमात्य अभ्यासकांनी केलेले संशोधन विशेषत्वाने जाणवते.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राच्या संदर्भात डॉ. इरावती कर्वे, डॉ. जी. एस. घुर्ये, डॉ. शैलजा देवगावकर, डॉ. शं. गो. देवगावकर, डॉ.सरोजिनी बाबर यांसारख्या समाजशास्त्रीय संशोधकांनी मानवशास्त्र, समाजशास्त्र, सांस्कृतिक जडणघडण इत्यादी माध्यमातून आदिवासींचे विश्व उलगडण्याचा प्रयत्न केला. शासनाच्या अधिकाऱ्यांमध्ये डॉ.सेतु माधवराव पगडी यांनी देखील कोलाम व गोंडांच्या व्याकरणाबाबत थोडे संशोधन केलेले आढळते.

महाराष्ट्राचा विचार करता स्थूलमानाने आदिवासींची मोठ्या प्रमाणावर वस्ती असलेले सह्याद्रीची पट्टी व गोंडवना पट्टी असे दोन पट्टे पाडण्यात येतात. यामध्ये प्रामुख्याने महादेव कोळी, वारली, ठाकूर, कोकणी, काथोडी, ढोर कोळी, दुबला, गमीट, पारधी, धोडिया, नाईकडा, गोंड, आंध, कोलाम, परधान, हलबा, कोरकू, धनका, रनधवा आणि कंवार हे आदिवासी आढळतात.

सामाजिक व आर्थिकदृष्ट्या विकास साधण्याचे शासनाचे अथक प्रयत्न स्वातंत्र्योत्तर काळापासून चालू असल्याने आदिवासी समाजाने मोठ्या प्रमाणावर प्रगती साधलेली दिसून येते मात्र तरीही मानववंशशास्त्रज्ञांच्या मते अजूनही काही आदिवासी जमाती सांस्कृतीकरणाच्या अत्यंत प्राथमिक अवस्थेत आहेत. आदिवासींचे अगाध निसर्गज्ञान, लोककथा, नृत्यगीते, म्हणी या एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे प्रामुख्याने मौखिक परंपरेनेच हस्तांतरित झालेल्या दिसून येतात. बऱ्याच आदिवासी भाषा ह्या लिपीबद्ध नसल्याने त्यांची सांस्कृतिक समृद्धता ग्रंथस्वरूपात सहजरीत्या शब्दबद्ध करता येत नाही. तरीही महाराष्ट्र शासनाने याबाबतीत काही प्रयत्न केलेले आढळून येतात. सन १९८२ मध्ये महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीद्वारे डॉ. सरोजिनी बाबर यांनी संपादन केलेले 'आदिवासींचे सण व उत्सव' हा ग्रंथ ज्यामध्ये महाराष्ट्रातील विविध विभागांतील आदिवासींचे सण, त्यांचे निसर्गोत्सव त्यांच्याच गीतांमधून उलगडण्यात आले आहेत. चंद्रपूर जिल्ह्यात आढळून येणाऱ्या 'माडिया गोंड' या अतिमागास जमातीच्या बोलीभाषेवर १९९० मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने डॉ.शैलजा देवगांवकर लिखित 'माडिया गोंडांची बोली' या पुस्तकाचे प्रकाशन केले. महाराष्ट्र शासनाच्या दर्शनिका विभागाने सन १९६८ मध्ये समाजशास्त्रज्ञ डॉ. इरावती कर्वे लिखित 'महाराष्ट्र : लॅण्ड ॲण्ड इटस् पिपल' हे गॅझेटिअर प्रकाशित केले. यामध्ये 'महाराष्ट्रातील लोक' या प्रकरणातून डॉ. कर्वे यांनी तत्कालीन मानवशास्त्राच्या महाराष्ट्रातील आदिवासी जमातींवर अभ्यासपूर्ण लेखन केले आहे. नंतरच्या काळात मानवशास्त्र तसेच समाजशास्त्रामध्ये आधुनिक संशोधनानुसार नवीन विचारप्रवाहांना मान्यता मिळाल्यामुळे व




हा ग्रंथ इंग्रजीतून उपलब्ध असल्याने सर्वसामान्य मराठी वाचकांना तो उपलब्ध करून देण्याकरिता १९९६ मध्ये दर्शनिका विभागाद्वारे मूळ इंग्रजी ग्रंथाची 'महाराष्ट्र : भूमि व लोक' ही सुधारित मराठी आवृत्ती तयार करण्यात आली. या ग्रंथामध्ये जातिजमातींवरील विवेचन बहुतांश नव्याने करण्यात आले आहे. याकरिता मोठ्या प्रमाणावर माहितीचे संकलन करण्यात आले.

आदिवासी जमातींच्या अनुषंगाने या ग्रंथामध्ये कातकरी, कोरकू, कोलाम, महादेव कोळी, ढोर कोळी, गोंड, ठाकूर, पारधी, वारली, कोकणा इत्यादी आदिवासी जमातींवर विस्तृतपणे लेखन करण्यात आले आहे.

ज्या संस्कृतींचा भूतकाळाशी संबंध असतो त्यांचा लवकर ऱ्हास होत नाही. आदिवासींची संस्कृती ही त्यापैकीच आहे. मात्र त्यांच्या परिवर्तनाच्या प्रक्रिया कळण्यासाठी

चारुशीला बा. चंदनशिवे

आदिवासींचे मूळ रूप माहीत असणे आवश्यक असते आणि गॅझेटिअरसारखे ग्रंथ यामध्ये मोलाची भूमिका बजावतात. त्यामूळेच हा ग्रंथ समाजशास्त्रज्ञ, इतिहास आणि कला विषयांचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांबरोबर सर्वसामान्य नागरिकांना उपयुक्त ठरेल असा आहे. हे ग्रंथ सहज उपलब्ध व्हावेत या दृष्टिकोनातून शासनाने ते ई-बुक स्वरूपात उपलब्ध करून दिले असून महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ते विनामूल्य उपलब्ध आहेत. (संपादक : डॉ.कि.का.चौधरी.)

**पृष्ठे-४६७ किंमत : रु.१७५/-**
**अधिक माहितीसाठी दू. क्र. २२६९११२४**
**ग्रंथ मिळण्याचे ठिकाण : सर्व शासकीय मुद्रणालये.**

✶✶




मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी' असे करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. याला अनुसरून मराठवाडा कृषी विद्यापीठ अधिनियमात अध्यादेशाद्वारे दुरुस्ती करण्यात येईल.

मराठवाडा कृषी विद्यापीठाची स्थापना १८ मे १९७२ रोजी करण्यात आली असून याच्या कार्यक्षेत्रात मराठवाड्यातील जिल्हे येतात.

## ५० मुलींना आयआयटी-जेईई परीक्षेसाठी मार्गदर्शन

राज्यातील मुलींच्या शैक्षणिक दर्जात सुधारणा होण्यासाठी इयत्ता ११ वी मध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या ५० गुणवत्ताधारक मुलींना आयआयटी, जेईई, एआयईईई आणि इंटरनॅशनल ऑलम्पियाड अशा स्पर्धात्मक परीक्षेसाठी मार्गदर्शन देणाऱ्या नवीन योजनेस मान्यता देण्यात आली. यासाठी एकूण ४७ लाख ५० हजार रुपये इतका खर्च अपेक्षित आहे. मुलींची निवड IITian's PACE या संस्थेमार्फत करण्यात येईल.

राज्यातील ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मागास मुलींना दर्जात्मक उच्च शिक्षण मिळावे या उद्देशाने ही योजना तयार करण्यात आली आहे. १० वी उत्तीर्ण झालेल्या किंवा १० वी परीक्षेस बसलेल्या ५० मुलींना २ वर्षे मार्गदर्शन देण्यात येईल. राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने मान्यता दिलेल्या PACE या संस्थेच्या अंधेरी येथील कनिष्ठ विज्ञान महाविद्यालयात या विद्यार्थिनींना ११ वी विज्ञान शाखेत चालू शैक्षणिक वर्षात विनामूल्य प्रवेश देण्यात येईल. प्रवेशपरीक्षेचा खर्च तसेच निवडीनंतरच्या महाविद्यालय परिसरात राहण्यासाठी वसतीगृह, जेवणाचा खर्च प्रति विद्यार्थी, प्रति महिना ७ हजार ५०० रुपये इतका येईल आणि तो शासनामार्फत भागविला जाईल.

(संदर्भ : मंत्रीमंडळ निर्णय) **




# मुंबईत भाषा भवन

मुंबईत भाषा भवन उभारण्याच्या निर्णयास मंत्रिमंडळाने मान्यता दिली. धोबीतलाव परिसरातील रंगभवन येथील खुल्या नाट्यगृहाच्या जागेवर उभारण्यात येणाऱ्या या इमारतीत मराठी भाषा भवन, सांस्कृतिक कार्य संचालनालय, भाषा संचालनालय, राज्य मराठी विकास संस्था, राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ ही कार्यालये तसेच सुसज्ज ग्रंथालय असेल.

या इमारतीस मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्र असे नाव देण्यात येईल.

देशातील विविध राज्यांनी त्यांच्या मातृभाषेचा विकास, संवर्धन व जतन करण्यासाठी भाषा भवनांची उभारणी केली आहे. महाराष्ट्रात मात्र असे स्वतंत्र भवन नाही. मराठी भाषेशी संबंधित कार्यालये मुंबईत विविध ठिकाणी कार्यरत आहेत. या कार्यालयांमध्ये योग्य तो समन्वय साधण्यासाठी ही कार्यालये एका इमारतीत असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने हे भाषा भवन बांधण्यात येईल.

या इमारतीत एका मजल्यावर सांस्कृतिक कार्य संचालनालय व या संचालनालयाशी संबंधित कार्यालये तसेच मिनी थिएटर राहील. याशिवाय तळमजल्यावर एक सुसज्ज आणि मोठे प्रेक्षागृह असेल. या इमारतीच्या बांधकामासाठी सुमारे ८० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

## कराड आणि यवतमाळ येथे शासकीय कृषी महाविद्यालये





माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक आणि यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त यवतमाळ येथे कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालय आणि कराड येथे कृषी महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला. २०१३-१४ या शैक्षणिक वर्षापासून ही महाविद्यालये स्थापन करण्यात येतील. याशिवाय अद्याप शासकीय कृषी महाविद्यालय नसलेल्या १५ जिल्ह्यांमध्ये देखील प्रत्येक वर्षी ५ याप्रमाणे शासकीय कृषी महाविद्यालये स्थापन करण्यात येतील.

यवतमाळ येथे डॉ.पंजाबराव कृषी विद्यापिठांतर्गत कृषी जैवतंत्रज्ञान महाविद्यालयासाठी शिक्षकांची १६ व शिक्षकेत्तर १७ अशी एकूण ३३ पदे निर्माण करण्यात येतील. कराड येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी अंतर्गत स्थापन करण्यात येणाऱ्या कृषी महाविद्यालयासाठी शिक्षकांची २८ व शिक्षकेतर ३७ अशी एकूण ६५ पदे निर्माण करण्यात येतील.

माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक आणि स्व. यशवंतराव चव्हाण यांनी त्यांच्या कारकिर्दीत राज्यातील कृषी विकासाला चालना दिली. कृषी शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला.

## मराठवाडा कृषी विद्यापीठाला वसंतराव नाईक यांचे नाव

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचे हरित क्रांती व कृषी क्षेत्रातील योगदान लक्षात घेऊन परभणी येथील मराठवाडा कृषी विद्यापीठाचे नाव 'वसंतराव नाईक




# गतिमान कृती आणि मायेचा दिलासा

उत्तरदायित्व, मानवतावादी दृष्टिकोण आणि जबाबदारीचे भान असल्यावर सामान्यांच्या आयुष्यातल्या दु:खावर सहज फुंकर घालता येते याची जाणीव देशाला नुकतीच महाराष्ट्राने घालून दिली. १५ ते १६ जूनच्या ढगफुटीचा अंदाज आल्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी ज्या तत्परतेने दिल्लीच्या निवासी आयुक्त कार्यालयाला उत्तरेचे वेध घेण्याच्या सूचना केल्या, त्यामुळे देशातल्या कोणत्याही अन्य राज्यांपेक्षा महाराष्ट्राच्या बचावकार्याचा हातभार सर्वात आधी उत्तराखंड सरकारला लाभला. दिनांक १८ जून रोजी दिल्लीतील निवासी आयुक्त कार्यालयात दिल्लीतील प्रधान सचिव तथा निवासी आयुक्त बिपीन मल्लिक यांनी कार्यालय बंद होताना तातडीने अधिकाऱ्यांची बैठक बोलविली... जणू उत्तरेतील विदारक परिस्थिती त्यांनी प्रत्यक्ष डोळ्यासमोर पाहिल्याप्रमाणे निर्णय होत होते! अर्ध्या तासाच्या तातडीच्या बैठकीनंतर दोन अधिकारी, दोन वाहन, संगणक आणि अद्यावत साधनसामग्री घेऊन पहिली टीम सायकांळीच उत्तराखंडला रवाना झाली. अतिरिक्त आयुक्त प्रदीपकुमार कार्यालयातूनच डेहराडूनला पोहचले. दुसऱ्या दिवशी उत्तरेतून येणाऱ्या भाविकांसाठी नवी दिल्लीत महाराष्ट्र सदन सज्ज झाले. मुंबईत मदत व पुनर्वसन विभागाने विशेष कक्ष सुरू केला. आपत्कालीन परिस्थितीत काम करण्यास निपुण असणाऱ्या अधिकाऱ्यांना उत्तरेत पाठवण्यात आले. दिल्लीतील सर्व अधिकारी डेहराडून, हरिद्वार, ऋषीकेश आदी ठिकाणी रवाना झाले. दिल्लीमध्ये चारधाम यात्रेत अडकलेल्या प्रवाशांचा ओघ सुरू झाला. महाराष्ट्र सदनातील कर्मचारी, महाराष्ट्र परिचय केंद्र, दिल्लीतील महाराष्ट्राची कार्यालये, कर्मचारी सर्वचं निवासी आयुक्तांच्या नेतृत्वात कामाला लागले होते..... केंद्रात काम केल्यामुळे आणि दिल्ली व उत्तरेतील राज्यांची खडानखडा माहिती असल्याने रात्रंदिवस मुख्यमंत्र्यांची या कामावर निगराणी होती. दिल्लीतील महाराष्ट्र सदनात उघडण्यात आलेल्या मदत केंद्रातील प्रत्येक नागरिकांशी ते आत्मीयतेने बोलत होते.... मुख्यमंत्री रेल्वे तिकीटांच्या आरक्षणासाठी थेट सामान्यांच्या गर्दीतून केंद्रीय रेल्वेमंत्री मल्लिकाअर्जून खरगे यांच्याशी मराठीतून बोलले... मुंबई-पुणे येथील महिलांचे आरक्षण स्वत: सांगितले. त्यांच्या ख्यालीखुशालीची विचारपूस केली. या केंद्रात दिवसरात्र काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांची विचारपूस केली. यावेळी संवादात मुख्यमंत्र्यांच्या हळवेपणासोबतच त्यांच्या कणखरतेची आणि सहृदयतेची जाणीवही अनेकांना झाली... भाविकांपैकी एकाने मुख्यमंत्र्यांना विचारले.... सर अन्य राज्य हेलिकॉप्टर पाठवून फक्त आपल्याच राज्याची माणसं हेरून आणतात.... आपण का नाही असे करत? त्यावर मुख्यमंत्री म्हणाले, बिल्कुल नाही! आपले हेलिकॉप्टर भारतीय सेनेच्या जवानांना मदत करतील. प्रथम ज्येष्ठ नागरिक, आजारी भाविक, त्यानंतर महिला व मुले आणि त्यानंतर अन्य नागरिकांना मदत करतील. मात्र एकही मराठी माणूस मदतीशिवाय राहणार नाही! मुख्यमंत्र्यांनी आपला शब्द पाळला. मराठी माणसं नेमकी कुठे अडकून पडली आहेत याची माहिती मिळवून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविले.



**उत्तराखंड आपत्तीत सापडलेल्या भाविकांना दिलासा देताना मुख्यमंत्री.**

**प्रवीण टाके**

निवासी आयुक्तांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नवी दिल्लीतील महाराष्ट्र परिचय केंद्रावर या भाविकांच्या मदतीची जबाबदारी सोपवली. जनसंपर्क अधिकारी प्रवीण टाके यांच्याकडे मदत, समन्वय व नियंत्रण कक्षाची जबाबदारी दिली. या कार्यालयाने मग पुढचे २० दिवस सामाजिक दायित्वाच्या आपल्या भूमिकेतून दिवसरात्र काम केले. शासनाच्या प्रसिध्दीसोबतच प्रत्यक्ष धोरणाच्या अंमलबजावणीचे कार्य या कार्यालयावर आले. निवास, भोजन, रेल्वेचे आरक्षण, भाविकांची ने-आण, त्यांचा औषधोपचार, विमानाची तिकीटे, भाविकांच्या नावाच्या नोंदी, सानुग्रह निधीचे वाटप... आकडयांच्या बातम्या बनविणाऱ्या विभागावर प्रत्यक्ष हिशेब आणि वाटपाची जबाबदारी होती. ती या कार्यालयाने यशस्वीपणे पार पाडली.



# दिल्लीत महाराष्ट्राची मुद्रा

४ जून २०१३ रोजी नव्या महाराष्ट्र सदनाचे उद्‌घाटन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते झाले. या सोहळ्याला केंद्रीय कृषी मंत्री शरद पवार, गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, महाराष्ट्राचे राज्यपाल के.शंकरनारायण, मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री छगन भुजबळ, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री रणजीत कांबळे व इतर मान्यवर उपस्थित होते. दिल्लीच्या ऐतिहासिक वारशाला समृद्ध करणारी भव्य इमारत 'नवीन महाराष्ट्र सदन' दिल्लीच्या मध्यभागी ल्युटन्स झोनमध्ये डौलाने उभी आहे. बांधकामात धोलपुरी लाल दगडांचा वापर हे दिल्लीतील इमारतींचे वैशिष्ट्य आहे. सह्याद्रीचा कणखर बाणा आपल्या रूपात आत्मसात करीत हिमालयाकडे तोंड करून ही इमारत उभी आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा सिंहासनारूढ राजवैभवी पुतळा या भव्य इमारतीच्या मध्यभागी आहे. महात्मा जोतिबा फुले यांचा पुतळा शिवरायांच्या पुतळ्याच्या उजव्या बाजूला तर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा डाव्या बाजूला उभा आहे. याशिवाय आतील मोक्याच्या दर्शनी भागात छत्रपती शाहू महाराज, यशवंतराव चव्हाण यांचे पूर्णाकृती प्रेरणादायी पुतळे उभारण्यात आले आहेत. नवीन महाराष्ट्र सदन दिल्लीतील सर्व राज्यांच्या विश्रामगृहांना मार्गदर्शक ठरेल अशा हायटेक सुखसुविधांनी सज्ज आहे. या विश्रामगृहाची संकल्पना ऐतिहासिक शनिवारवाडा आणि विश्रामबाग वाडा यांच्या वास्तुरचनेप्रमाणे आहे. सर्व राज्यांच्या भवनांमध्ये ही सर्वात मोठी आणि सर्वाधिक देखणी असून दिल्लीच्या वैभवात भर घालणाऱ्या या इमारतीचे दिल्लीकरांनाही फार कौतुक आहे.

> 'देशाच्या विकासात महाराष्ट्राचे योगदान कायम मार्गदर्शक राहिले आहे. शिवाजी महाराजांनी दिलेला राष्ट्रीय बाणा आणि त्यानंतरच्या महापुरूषांनी दिलेली सामाजिक सुधारणांची चळवळ देशाच्या जडणघडणीचा कायम प्रेरणास्रोत आहे. त्या साऱ्याच कार्यकतृर्त्वाला सलामी देणारे दिल्लीतील महाराष्ट्र सदन ही जागतिक दर्जाची इमारत राजधानीत उभी राहिली आहे'
>
> **– राष्ट्रपती प्रणव मुखर्जी**

इमारतीचे बांधकाम १२ डिसेंबर २००६ ला सुरू झाले आणि १२ जुलै २०१२ला पूर्ण झाले. या इमारतीमध्ये एकूण १३८ कक्ष आहेत. यामध्ये राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्यासाठी बनविलेले अद्ययावत १३ खोल्यांचे विस्तारित कक्ष आहेत. या दोन पदनिहाय आरक्षित कक्षांशिवाय इमारतीमध्ये १३२ कक्ष उपलब्ध आहेत. त्यापैकी आठ कक्ष हे वरिष्ठ मंत्री, १६ कक्ष राज्य मंत्री/ उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती, ६ कक्ष हे मुख्य सचिव व अतिरिक्त मुख्य सचिवांसाठी, २१ कक्ष आमदारांसाठी, ८० कक्ष पाहुण्यांसाठी, २ कक्ष अपंग व्यक्तींसाठी ठेवण्यात आले आहेत.

याशिवाय अद्ययावत असे स्वयंपाक गृह, स्टाफ कॅंटीन, लॉंड्री, आस्थापना विभाग, व शक्तिशाली ए.सी. प्लॅंट आदी आवश्यक बाबींची निर्मिती उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून करण्यात आली आहे. प्रत्येक पाहुण्यांचा कक्ष अटॅच बाथरूम, अद्ययावत बेड, व आवश्यक फर्निचरयुक्त आहे. तसेच संगणक, वायफाय इंटरनेट, इलेक्ट्रॉनिक कुलूप व्यवस्थेने परिपूर्ण आहे. हा संपूर्ण परिसर सीसीटीव्ही कॅमेऱ्याने सुरक्षिततेच्या दृष्टीने कायम निगराणीत असणार आहे.

या इमारतीला पर्यावरणानुकूल ठेवण्यासाठी यामध्ये सिवेज ट्रीटमेंट प्लॅंट, रेनवॉटर हार्वेस्टिंग व्यवस्था आणि वॉटर सॉफ्टनिंग प्लॅन्टचा अंतर्भाव केलेला आहे. इमारतीच्या देखणेपणाला बाधा येऊ नये यासाठी कुठेही छतावर पाण्याच्या टाकीचा वापर नाही. मात्र हायड्रो पेन्युमॅटिक सिस्टमचा वापर करून पाणी खेळते राहील अशी व्यवस्था करण्यात आली आहे. ✶✶

**संपर्क : ०९७१७१४०४९५**

# साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे

■ साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्याद्वारा सामाजिक परिवर्तनाच्या सत्यशोधनाची तसेच माणसाच्या असण्याची जगावेगळी वाट शोधण्याचा एल्गार केला. त्यांनी फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारांचा वसा व सामाजिक व्यवस्थेच्या चिंतनाचा मार्ग अवलंबला. समाजक्रांतीचा झंझावात घेऊन त्यांनी विद्रोही साहित्य जगापुढे आणले.

■ अण्णांच्या साहित्यातील क्रांतीचा धगधगता अंगार वेशीबाहेरच्या बहुजन समाजाला, महाराष्ट्राच्या तसेच जगातील माणुसकीच्या मूल्यावर प्रेम करणाऱ्या विचारवाद्यांना भावला. त्यांचा समाजक्रांतीचा आवाज जगभर पोहोचला. त्यांनी गरिबांच्या, उपेक्षितांच्या शोषणाचे दु:ख व व्यथा उजागर केल्या.



■ त्यांनी लहुजींची कुऱ्हाड, फकीराची तलवार, महात्मा फुलेंचा आसूड, आंबेडकरांचा भीमटोला आणि गाडगेबाबांचा सोटा हे क्रांतिकारी संघर्षाचे शस्त्र सामाजिक दंभाच्या काटेरी वाटेला साफ करण्यासाठी वापरले. माणसाला माणूस म्हणून जगू न देणाऱ्या व्यवस्थेला संपविण्यासाठी अण्णा मानवमुक्तीचा लढा काटेरी वाटेतून शोधीत राहिले. सर्व प्रकारच्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी समाजमनाची तयारी केली. हीच अण्णा भाऊंच्या साहित्याच्या सामाजिक परिवर्तनाच्या तत्त्वज्ञानाची ताकद आहे.

■ अण्णा वाटेगाववरून १९३१ साली मुंबईत आले. त्यांचा साहित्य निर्मितीचा काळ १९३७ ते १९६२ हा आहे. अण्णा हे दलित साहित्यातील पहिल्या पिढीच्या साहित्याचे अग्रणी. दलित साहित्याचा विकास त्यानंतरच्या अनेक साहित्यिकांनी कथा, कविता, आत्मकथनांद्वारे समाजाची पायाभरणी केली.

■ अण्णांचे साहित्य शोषित दलित, सोशित कामगार व बहुजनांचे प्रतिनिधित्व करते. समतेच्या निर्मितीचा संघर्ष चालू ठेवण्यास अण्णांच्या ३२ कादंबऱ्या, ७ कादंबऱ्यावरील चित्रपट, १४ कथासंग्रह आणि एक प्रवास वर्णन, अत्यंत उपयुक्त ठरले आहे. त्यांनी विद्रोही साहित्यातून समाताधिष्ठित मानवी स्वातंत्र्याचा उद्घोष केला.

■ अण्णांची नायिका परिस्थितीशी झुंझणारी, जखमी होणारी पण कधीच पराभूत न होणारी आहे. परिस्थितीशी यशस्वीपणे झुंझणाऱ्या अनेक हिमंतवान व्यक्तिरेखा त्यांच्या साहित्यात आढळतात.

■ अण्णा भाऊ हयात असते तर त्यांनी डफावर हात मारुन गर्जून सांगितले असते की, ''माझी जिवंत पात्रे जी रणरणत्या उन्हातल्या जीवनाचा महासंघर्ष जगत असतात, त्यातून शोकात्मक पण अपराजित अशा जीवननाट्याचे भेदक रसायन माझ्या कलाकृतीस ऊर्जा पुरवीत असतात.''

■ अण्णांनी खडा सवाल केला की, 'दगड विटेतून मजबूत भिंत होते. मग आपण तर जिवंत हाडामासांची माणसे आहोत.' त्यांनी जनतेवर आणि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास ठेवला.

■ अण्णा भाऊ स्वच्छ व निर्मळ मनाचे होते.

■ अण्णा भाऊ यांच्या प्रयत्नांमुळे उतारवयातील शाहीर, तमासगीर, सामाजिक कार्यकर्ते यांना मानधन देण्याची योजना राज्य शासनाने राबवणे सुरू केले.

■ शाहू, फुले, आंबेडकर यांच्या आदर्श विचारांचा वसा घेऊन महाराष्ट्र शासन, निरनिराळ्या योजनांद्वारे सामाजिक न्यायाकडे वाटचाल करीत आहे. सामाजिक योजनांच्या अर्थसंकल्पांचे कोटीकोटीचे दरवर्षी बजेट असते. अण्णा भाऊ साठेंची जन्मभूमी वाटेगाव, पण कर्मभूमी मुंबईतील चिरागनगर आहे. शासनाने चिरागनगरला त्यांचे भव्य स्मारक बांधण्याचे जाहीर केले आहे.

■ महाराष्ट्र शासनाने लोकशाहीर अण्णा भाऊ साठे मातंग विकास महामंडळ समाजाच्या विकासासाठी स्थापन केले आहे. लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या नावाने कार्यकर्त्यांना पुरस्कार देण्याचा उपक्रम राबवण्यात येत आहे.

■ अण्णा आपल्या साहित्याविषयी म्हणतात, 'जो कलावंत जनतेची कदर करतो, त्याचीच कदर जनता करते, हे मी प्रथम शिकून लेखन करीत असतो. माझा माझ्या देशावर, जनतेवर नि तिच्या संघर्षावर अढळ विश्वास आहे. हा देश सुखी आणि समृद्ध व्हावा, इथे समानता नांदावी या महाराष्ट्र भूमीचे नंदनवन व्हावे अशी मला रोज स्वप्न पडत असतात.'

– प्रा. सुरेश दाभाडे
संपर्क : ८०८०५५४७७४

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MH/MR/South - 210/2012-14
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, August 2013.
Date of Publication : 10th of every Month


# स्पर्धापरीक्षांच्या यशाचे शिखर सर करण्यासाठी लोकराज्यला पर्याय नाही!

## अवघ्या १० रुपयात

## वस्तुनिष्ठ माहिती, अचूक आकडेवारी, विस्तृत विश्लेषण


## प्रत्येक अंक संग्राह्य आणि वाचनीय

# लोकराज्य













O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ

लोकराज्य LOKRAJYA

प्रेषक / From

दिगंबर वा. पालवे
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन, बरॅक नं. १९, फ्री प्रेस जर्नल मार्ग, मुंबई ४०० ०२१

प्रति / To :

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक प्रमोद त्र्यं. नलावडे, महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी एच. टी. मीडिया लि. प्लॉट नं. ६, टी. टी. सी. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रियल एरिया, दिघे, ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई - ४०० ७०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक : प्रमोद त्र्यं. नलावडे